सोलापूर
# तरुण भारत
न मे कर्मफले स्पृहा

SOLAPUR TARUN BHARAT

सोलापूर, धाराशिव, लातूर, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना, बीड, अहिल्यानगर व सातारा येथून वितरित

सोलापूर | शुक्रवार, २४ एप्रिल २०२६ । युगाब्द ५१२८ । वर्ष ४२ वे अंक १४६ । पाने १२ । किंमत रु. ८/-

| RNI Regd. No. 46878/87 | Postal Regd No.. SLP/32/2024-2026. Posted daily at Medical college, Solapur.P.O. |

हा आमची ई-पेपर आवृत्ती असून ती 'तरुण भारत'च्या छापील आवृत्तीची प्रतिकृती नाही

dainiktarunbharat.com
epaper.dainiktarunbharat.com


**आजचा सामना**

बंगळुरु वि. गुजरात

वेळ : सायं.७.३० वाजता

ठिकाण : बंगळुरु

## विचारपुष्प



नि केवळ बौद्धिक विचार मनुष्याला शेळ्यामेंढ्यांसारखे दुर्बल बनवील; प्रत्यक्ष तसा व्यवहार करण्याचा निश्चय करून आपण पुरुषश्रेष्ठ, नरसिंह होऊ. नावाप्रमाणे व्यवहार करण्याच्या निश्चयाने आपण आपल्या संघकार्याला पोषक ठरेल असाच व्यवहार करावा.

**- एकनाथ रानडे**
रा. स्व. संघाचे पूर्व सरकार्यवाह, संस्थापक विवेकानंद शिला स्मारक व विवेकानंद केंद्र, कन्याकुमारी

## बंगभूमीत 'खेला होबे'

# पहिल्या टप्प्यात विक्रमी मतदान




**◆ नवी दिल्ली, २३ एप्रिल**

**पश्चिम बंगाल आणि तामिळनाडूमध्ये गुरुवारी स्वातंत्र्यापासूनची आतापर्यंतची सर्वाधिक मतदानाची नोंद झाली. यामध्ये मतदानाचे प्रमाण अनुक्रमे ९१.९१ आणि ८४.४० टक्क्यांपर्यंत पोहोचले, अशी माहिती मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेशकुमार यांनी दिली. पश्चिम बंगालच्या काही भागांत हिंसाचाराच्या घटना घडल्या. तामिळनाडूत सर्वांचे लक्ष वेधून घेणाऱ्या बहुपक्षीय लढतीचा सामना करावा लागला असूनही, या दोन्ही राज्यांतील निवडणूक प्रक्रियेत मतदारांचा प्रचंड सहभाग दिसून आला.**



नंदीग्राम येथील मतदान केंद्रावर मतदारांची झालेली ही गर्दी. येथे चोख सुरक्षा ठेवण्यात आली होती



प. बंगालमध्ये मागील ५० वर्षांच्या निवडणूक इतिहासात, हिंसक घटनांचे प्रमाण किमान पातळीवर ठेवले जाण्याची ही पहिलीच वेळ आहे. विक्रमी मतदानाबाबत मला मिळालेल्या माहितीवरून खात्री पटली की, हा बदल घडवून आणण्याचे बंगालच्या मतदारांनी आधीच ठरवले आहे. त्या बदलाच्या दिशेने हा प्रचंड जनादेश ठरणार आहे.

**- नरेंद्र मोदी,** पंतप्रधान



निवडणुकीच्या पहिल्या टप्प्यात आतापर्यंत झालेल्या मतदानावरून तृणमूल काँग्रेस विजयाच्या मार्गावर अगोदरच वाटचाल करीत असल्याचे संकेत प्राप्त होत आहेत. लोकांच्या मनाचा अंदाज पाहता, आज आतापर्यंत झालेल्या मतदानाच्या आधारे आम्ही विजयाच्या स्थितीत अगोदरच पोहोचलो आहोत.

**- ममता बॅनर्जी,** प. बंगालच्या मुख्यमंत्री



तामिळनाडू विधानसभा निवडणुकीत मोठ्या प्रमाणावर गैरप्रकार झाला. घरोघरी जाऊन चार-चार लोकांनी एका मतासाठी पाच हजार रुपये वाटले. करूर विधानसभा मतदारसंघात मतदारांना अर्धा ग्रॅम सोन्याचे नाणे देण्यात आले. हे सर्व एका दिवसात घडलेले नाही. कुठे तरी लपवून ठेवलेला हा पैसा आला.

**- के. अन्नामलाई,** भाजपा नेते, तामिळनाडू

## मुंबईचा सर्वात मोठा पराभव

**मुंबई :** आयपीएलमध्ये मुंबई इंडियन्सला त्यांच्या सर्वात मोठ्या पराभवाला सामोरे जावे लागले. चेन्नई सुपर किंग्सने या संघाला १०३ धावांनी पराभूत केले. मुंबईचा यापूर्वीचा सर्वात मोठा पराभव २०१३ मध्ये राजस्थान रॉयल्सविरुद्ध ८७ धावांनी झाला होता. वानखेडे स्टेडियमवर खेळल्या गेलेल्या हंगामातील ३३ व्या सामन्यात मुंबईने नाणेफेक जिंकून प्रथम गोलंदाजी करण्याचा निर्णय घेतला. चेन्नईने २०८ धावांचे लक्ष्य ठेवले.



# 'उजनी'तून भीमा नदीत पाणी सोडण्यास सुरुवात

## ● पाणीपुरवठा योजनांना दिलासा

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.२३ एप्रिल-**

उन्हाची तीव्रता वाढली आहे. भीमा नदी कोरडी पडली. भीमा नदीकाठच्या अनेक गावच्या पाणीपुरवठा योजना अडचणीत आल्या. पंढरपूर, सांगोला, मंगळवेढा, दक्षिण सोलापूर तालुक्यातील पाणी प्रश्न ऐरणीवर आला. त्यामुळे पालकमंत्री जयकुमार गोरे यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे-पाटील यांच्याकडे पाठपुरावा केला. त्यास यश आले असून गुरुवारी रात्रीपासून भीमा नदीत पाणी सोडण्याची प्रक्रिया सुरु झाली आहे.



अनेक गावच्या पाणी पुरवठा योजना शेवटच्या घटका मोजत होत्या. त्यामुळे उजनीतून भीमा नदीत पाणी सोडावे, अशी मागणी शेतकरी संघटना, आमदार, खासदारांनी सातत्याने केली होती. यावर पालकमंत्री जयकुमार गोरे यांनी काही दिवसापूर्वी आकस्मिक टंचाईची बैठक घेतली होती. गेल्या १६ एप्रिल रोजी जिल्ह्यातील सर्व आमदार आणि प्रमुख अधिकाऱ्यांची ऑनलाईन बैठक घेवून पाणी टंचाईचा आढावा घेतला होता.

**जलसंपदा विभागाचा प्रस्ताव, गोरेंचा पाठपुरावा**

यंदा उन्हाची तीव्रता अधिक आहे. अलनिनोचा विपरित परिणाम होण्याची शक्यता वर्तविण्यात येत होती. जिल्ह्यातील जलसंपदा अधिकाऱ्यांनी तातडीने प्रस्ताव शासनाला सादर केला होता. तो प्रस्ताव मंजूर व्हावा यासाठी पालकमंत्री जयकुमार गोरे यांनी सातत्याने पाठपुरावा करुन सर्वांची परवानगी मिळवली आहे. त्यामुळे उजनीतून आता भीमा नदीत पाणी सोडण्यची प्रक्रिया सुरु झाली आहे. त्यामुळे सोलापूर जिल्हावासियांना दिलासा मिळाला आहे.

# इराणची 'टोल-ए-जंग' कमाई

## सेंट्रल बँकेत मोठी रक्कम जमा



**◆ तेहरान, २३ एप्रिल**

होर्मुझ सामुद्रधुनीला इराणने आता उत्पन्नाचे साधन बनवले आहे. होर्मुझमधून झालेली पहिली कमाई या देशाने सेंट्रल बँकेत जमा केली. होर्मुझ सामुद्रधुनीवर लावलेल्या टोलचे पहिले उत्पन्न मिळाले असल्याची माहिती इराणी संसदेच्या वरिष्ठ अधिकाऱ्याने गुरुवारी दिली. अमेरिका आणि इस्रायलसोबत सुरू झालेल्या युद्धादरम्यान या धोरणात्मक जलमार्गावर इराणने टोल आकारणी सुरू केली आहे.

होर्मुझमधून जाणाऱ्या प्रत्येक जहाजाकडून इराण टोल वसूल करणार असल्याचे आता अधिकृत झाले आहे. होर्मुझ सामुद्रधुनीतून मिळालेली पहिली कमाई सेंट्रल बँकेच्या खात्यात जमा करण्यात आली, असे संसदेचे उपाध्यक्ष हमीदरेजा हाजीबाबाएई यांनी सांगितल्याचे वृत्त तसनीम या इराणी वृत्तसंस्थेने दिले आहे.

इराणच्या इतर माध्यमांनीही हे वृत्त प्रसारित केले असले, तरी याबाबत तपशीलवार माहिती दिलेली नाही. या महत्त्वपूर्ण जलमार्गासाठी इराण जवळपास २० लाख डॉलर्स म्हणजेच १८ कोटी रुपये शुल्काची मागणी करीत असल्याचे वृत्त काही माध्यमांनी दिले आहे. टोलच्या माध्यमातून नेमकी किती रक्कम जमा करण्यात आली, याची माहिती इराणने दिलेली नाही.

ज्या देशांना मित्र म्हणतो, त्याच देशांना होर्मुझमधून जाण्याची परवानगी दिली जाईल तसेच या मार्गावरून जाणाऱ्या जहाजांना टोल द्यावा लागेल, असे इराणने युद्धबंदीपूर्वी म्हटले होते. मात्र, नेमका किती टोल द्यावा लागेल, हे स्पष्ट केले नव्हते. (वृत्तसंस्था)

**नियम आम्ही ठरवू : इराण**

**जहाजांचा प्रकार कोणता आहे, त्यात कोणत्या प्रकारचे साहित्य आहे, जोखिमीची पातळी किती आहे, यावरून टोल आकारणी ठरवली जाईल. हा टोल कसा आणि किती वसूल करायचा हे आम्हीच ठरवू. याचे सर्व नियम आम्ही ठरवू, असे इराणी संसदेचे खासदार अलिरेजा सलिमी तस्मीन यांनी सांगितले.**

## पाकिस्तानी विमानांसाठी हवाईक्षेत्र २४ मेपर्यंत बंद

**◆ नवी दिल्ली, २३ एप्रिल**

भारताने पाकिस्तानी विमानांना आपली हवाई हद्द वापरण्यावर असलेली बंदी २४ मे पर्यंत वाढवली आहे. या मुदतवाढीमुळे पाकिस्तानी विमानांसाठी भारतीय हवाई हद्द बंद ठेवण्याचा निर्णय आता एक वर्षापेक्षा जास्त काळासाठी लागू राहणार आहे. हा निर्णय सर्वप्रथम २२ एप्रिल २०२५ रोजी झालेल्या पहलगाम दहशतवादी हल्ल्यानंतर काही दिवसांनी घेण्यात आला होता.

मागील वर्षी एप्रिलपासून, दोन्ही देश एकमेकांच्या विमानांसाठी आपली हवाई क्षेत्रे बंद ठेवण्याचा कालावधी वाढवत आले आहेत. मंगळवारी, पाकिस्तानने हवाई क्षेत्र बंद ठेवण्याचा हा कालावधी २४ मे पर्यंत वाढवला. बुधवारी जारी करण्यात आलेल्या नोटामप्रमाणे, पाकिस्तानमध्ये नोंदणीकृत विमाने आणि पाकिस्तानी एअरलाईन्स, ऑपरेटरच्या विमानांना भारतीय हवाईक्षेत्र उपलब्ध राहणार नाही. (वृत्तसंस्था)

## बारामतीत ५८ टक्के मतदान

**पुणे :** सुरुवातीपासून चर्चेत असलेल्या बारामती विधानसभा मतदारसंघाच्या पोटनिवडणुकीसाठी गुरुवारी मतदान झाले. दिवंगत उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या अपघाती निधनानंतर येथे पोटनिवडणूक झाली. निवडणूक जाहीर झाल्यानंतर काँग्रेसने उमेदवारासह अनेक अपक्ष उमेदवार रिंगणात होते. पण अखेर काँग्रेसने आपला उमेदवार मागे घेतला. या निवडणुकीसाठी उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार उभ्या होत्या. त्यासाठी आज मतदान झाले. बारामती विधानसभा मतदारसंघ पोटनिवडणुकीसाठी मतदान शांततेत पार पडले. सकाळी ७ वाजेपासून ते सायंकाळी ६ पर्यंत ५८.२७ टक्के मतदानाची नोंद झाली होती. मात्र अधिकृत अंतिम आकडेवारी रात्री उशिरापर्यंत जाहीर झाली नव्हती. मतदानाच्या टप्प्यांनुसार सकाळी ९ वाजेपर्यंत ८.१ टक्के मतदान झाले होते.




श्रध्देय श्रीमान
भाऊसाहेब गांधी
२४ वा स्मृतिदिन

जन्म : १७ नोव्हेंबर १९२५
स्वर्गवास : २४ एप्रिल २००२

ज्ञान, सत्य, अहिंसा ज्यांनी अखंड जपली,
शिक्षणसेवेची ज्योत सदैव प्रज्वलित केली।
समर्पण, संयम, साधना ज्यांची अमर ओळख,
संस्थेचा वटवृक्ष केला भव्य विस्तारक।
शील, तप, सेवा यांचा अखंड प्रवाह,
जीवनातून दिला प्रेरणेचा अमूल्य ठेवा।
शतप्रेरणेचा संदेश त्यांच्या कार्यात राहो,
स्मृतींना आमुच्या कृतज्ञ वंदनाचा मान राहो।

भाऊसाहेबांचे पुण्यस्मरण,
शिक्षणमहर्षींसाठी प्रेरणादायी ॥

वालचंद शिक्षण समूह, सोलापूर

Soham Ads


# पेट्रोल-डिझेल दरवाढ नाही

## बाजारात पसरवली जातेय् अफवा; मंत्रालयाचे स्पष्टीकरण

**नवी दिल्ली, २३ एप्रिल-**

पेट्रोलियम आणि नैसर्गिक वायू मंत्रालयाने पेट्रोल आणि डिझेलच्या दरवाढीचे वृत्त दिशाभूल करणारे असल्याचे सांगत ते फेटाळून लावले आहे. मंत्रालयाने म्हटले आहे की, काही वृत्तपत्रांमध्ये पेट्रोल आणि डिझेलच्या दरात वाढ होणर असल्याचा दावा केला जात आहे.

सध्या सरकारकडे पेट्रोल आणि डिझेलच्या दरात वाढ करण्याचा कोणताही प्रस्ताव नाही. बाजारात पसरवली जात आहे ती केवळ अफवा आहे, असेही मंत्रालयाने स्पष्ट केले. वास्तवात कोटक इन्स्टिट्यूशनल इक्विटीजच्या एका अहवालानुसार पेट्रोल आणि डिझेलच्या दरात प्रति लिटर २५ ते २८ रुपयांनी वाढ होऊ शकते.

देशात सुरू असलेल्या राज्य निवडणुकांनंतर पेट्रोल आणि डिझेलच्या दरात लक्षणीय वाढ अपेक्षित आहे. सरकारच्या मते, लोकांमध्ये भीती आणि घबराट पसरवण्याच्या उद्देशाने अशा बातम्या पसरवल्या जात आहेत. मंत्रालयाने असेही म्हटले आहे की, भारत हा जगातील एकमेव देश आहे.

# मुंबईत भारत टॅक्सी सुरू; कमिशनचा खेळ संपणार

**नवी दिल्ली, २३ एप्रिल-**

भारत टॅक्सी ऑटो आणि कॅब चालकांसाठीचा ऑनबोर्डिंग कार्यक्रम आणि ॲप गुरुवारी मुंबईत सुरू करण्यात आले. केंद्रीय वाणिज्य मंत्री पियुष गोयल यांच्या हस्ते या कार्यक्रमाचे उद्घाटन करण्यात आले.





या योजनेचा उद्देश चालकांना केवळ कामगार म्हणून नव्हे, तर भागीदार आणि मालक म्हणून सक्षम करणे हा आहे. या कार्यक्रमाचे महत्त्व स्पष्ट करताना, भारत टॅक्सीचे मुख्य कार्यकारी अधिकारी विवेक पांडे म्हणाले, मुंबई आमच्यासाठी एक मोठी संधी आहे.

# महाराष्ट्र जागतिक गुंतवणुकीचे नवे केंद्र

## डेन्मार्कसोबत हरित सागरी भविष्याकडे वाटचाल

**मुंबई, २३ एप्रिल-**

डेन्मार्कसोबत हरित सागरी भविष्याकडे वाटचाल उद्योगस्नेही धोरणे आणि सक्षम पायाभूत सुविधा यामुळे महाराष्ट्र जागतिक गुंतवणूकदारांसाठी आकर्षणाचे केंद्र बनत असून, ग्लोबल इन्व्हेस्टमेंट हब म्हणून राज्याची ओळख अधिक दृढ होत आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी यामागे राज्य सरकारच्या उद्योगपूरक धोरणांचा मोठा वाटा असल्याचे सांगितले.





या वाढत्या आंतरराष्ट्रीय रसाची झलक मुंबईत झालेल्या भेटीत दिसून आली. भारतातील डेन्मार्कचे राजदूत रास्मस अबिल्डगार्ड क्रिस्टेनसेन यांनी मुख्यमंत्री फडणवीस यांची 'वर्षा' या अधिकृत निवासस्थानी भेट घेतली. या भेटीत गुंतवणूक, बंदर विकास, शिपिंग, ऊर्जा आणि जलव्यवस्थापन या क्षेत्रांमध्ये सहकार्याच्या संधींवर सविस्तर चर्चा झाली. याचबरोबर, शाश्वत वाहतूक व्यवस्थेकडेही राज्याचा कल वाढत आहे. पाण्यावर आधारित वाहतूक प्रणाली विकसित करण्यासाठी राज्य सरकार प्रयत्नशील असून वॉटर टॅक्सी प्रकल्पावरही काम सुरू आहे. या उपक्रमामुळे शहरातील वाहतूक कोंडी कमी होण्यास मदत होणार आहे. हरित तंत्रज्ञानाच्या दृष्टीने डेन्मार्कमधील इलेक्ट्रिक फेरी आणि वॉटर टॅक्सी तंत्रज्ञानाचा लाभ घेण्यासाठी सहकार्याच्या शक्यता तपासल्या जात आहेत. डेन्मार्कने किनारपट्टीवरील आणि अल्प अंतराच्या प्रवासासाठी इलेक्ट्रिक फेरी तंत्रज्ञान यशस्वीपणे वापरले असल्याने, मुंबईकोकण किनारपट्टीसाठी ते उपयुक्त ठरू शकते, असे क्रिस्टेन्सन यांनी नमूद केले.

अशा सहकार्यामुळे महाराष्ट्रात हरित पायाभूत सुविधांचा विकास वेगाने होऊ शकतो. भारत-डेन्मार्क 'ग्रीन स्ट्रॅटेजिक पार्टनरशिप' अंतर्गत दोन्ही देशांमधील संबंध अधिक मजबूत होत असून, शाश्वत विकास आणि नवोन्मेष यावर भर दिला जात आहे. महाराष्ट्र या भागीदारीत महत्त्वाची भूमिका बजावण्याच्या स्थितीत आहे.

**डेन्मार्कच्या ६० कंपन्या कार्यरत**

सध्या मुंबई आणि पुणे परिसरात सुमारे ६० डेन्मार्कमधील कंपन्या विविध क्षेत्रांत कार्यरत आहेत. या मजबूत उपस्थितीमुळे भविष्यातील आर्थिक सहकार्याला अधिक गती मिळण्याची शक्यता आहे. एकूणच, आर्थिक विकास, शाश्वतता आणि जागतिक सहकार्य यांचा समतोल साधत महाराष्ट्र जागतिक गुंतवणूक केंद्र म्हणून वेगाने पुढे जात असल्याचे चित्र स्पष्ट होत आहे.

CMYK
सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले. विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.
सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/


## महत्त्वाचे

### ईडीचे पंजाबमध्ये १२ ठिकाणी छापे

**नवी दिल्ली :** अंमलबजावणी संचालनालयाच्या (ईडी) चंदीगड प्रादेशिक कार्यालयाने मनी लॉंडरिंग प्रतिबंधक कायदा (पीएमएलए) २००२ अंतर्गत चंदीगड, पंचकुला, झिराकपूर, डेरा बस्सी आणि राजपुरा (पटियाला) येथील १२ ठिकाणी छापे टाकले. हे छापे आणि शोधमोहीम मनी लॉंडरिंगशी संबंधित आहेत. छाप्यांदरम्यान, खरेदी-विक्री करार आणि मनी लॉंडरिंगशी संबंधित विविध गुन्हेगारी कागदपत्रे आणि पुरावे जप्त करण्यात आले. या प्रकरणात, कोटक महिंद्रा बँकेच्या अधिकाऱ्यांवर हरियाणातील पंचकुला महानगरपालिकेतून १४५ कोटी रुपयांचा अपहार केल्याचा आरोप आहे. बँकेच्या अधिकाऱ्यांनी, महानगरपालिकेचे अधिकारी आणि खाजगी व्यक्तीच्या संगनमताने कायदेशीर खात्यांमध्ये जमा असलेला महानगरपालिकेचा निधी बनावट खात्यांमध्ये हस्तांतरित केला. याप्रकरणी पंचकुला एसीबीने कोटक महिंद्रा बँकेच्या अज्ञात अधिकारी आणि कर्मचाऱ्यांविरुद्ध विविध कलमांन्वये नोंदवलेल्या एफआयआरच्या आधारे अंमलबारी संचालनालयाने (ईडी) या प्रकरणाचा तपास सुरू केला आहे. या एफआयआरमधून असे उघड झाले आहे की, एका सुनियोजित गुन्हेगारी कटाद्वारे बँकेच्या अज्ञात अधिकाऱ्यांनी पंचकुला महानगरपालिकेच्या १४५ कोटींचा अपहार केला होता.

# सुरुंग पेरणाऱ्या बोटी नष्ट करा

## ट्रम्प यांचे आदेश; पुन्हा युद्ध भडकण्याची शक्यता

**◆ वॉशिंग्टन, २३ एप्रिल**

होर्मुझच्या सामुद्रधुनीत सुरुंग पेरणाऱ्या बोटी नष्ट करा, असा आदेश अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी गुरुवारी दिला. ट्रम्प यांच्या या नव्या आदेशामुळे परिस्थिती चिघळून पुन्हा युद्ध भडकण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.



अमेरिका-इराणसोबतच्या संभाव्य दुसऱ्या फेरीच्या चर्चेबाबत सुरू असलेल्या अनिश्चिततेच्या आणि होर्मुझच्या सामुद्रधुनीतील वाढत्या तणावाच्या पार्श्वभूमीवर अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी हा आदेश जारी केला आहे. होर्मुझच्या सामुद्रधुनीमध्ये भूसुरुंग पेरण्याचा प्रयत्न करणाऱ्या कोणत्याही बोटीला तात्काळ नष्ट करा, असा आदेश त्यांनी दिला. अमेरिका आणि इराण यांच्यातील तणाव शिगेला पोहचला असताना ट्रम्प यांच्या नव्या आदेशामुळे जगात चिंता व्यक्त केली जात आहे. यामुळे मध्यपूर्वेतील युद्ध लांबण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.



होर्मुझची सामुद्रधुनी जागतिक तेल पुरवठ्यासाठी अत्यंत महत्त्वाची आहे. त्यामुळे तेथील कोणत्याही लष्करी हालचालीचा आंतरराष्ट्रीय बाजारपेठा आणि प्रादेशिक स्थिरतेवर परिणाम होऊ शकतो. दुसरीकडे, पाकिस्तानचे गृहमंत्री मोहसिन नकवी यांनी गुरुवारी अमेरिकेच्या उपराजदूत नताली बेकर यांची भेट घेतली. इस्लामाबादमध्ये होणाऱ्या अमेरिका-इराण चर्चेच्या दुसऱ्या फेरीसाठी सुरू असलेल्या राजनैतिक प्रयत्नांवर चर्चा करण्यासाठी ही भेट झाली. दोन्ही देशांना लवकरच वाटाघाटीच्या टेबलावर आणण्यासाठी तीव्र राजनैतिक प्रयत्न सुरू असतानाच ही बैठक झाली.

**तणाव कमी करण्याच्या दिशेने सकारात्मक पाऊल**

पाकिस्तानच्या गृह मंत्रालयाच्या एका निवेदनानुसार, दोन्ही नेत्यांनी प्रादेशिक परिस्थितीचा आढावा घेतला आणि प्रस्तावित शांतता चर्चा पुढे नेण्याच्या पर्यायांवर सविस्तर चर्चा केली. बैठकीदरम्यान, नकवी यांनी अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांच्या शस्त्रसंधी वाढवण्याच्या पुढाकाराचे स्वागत केले आणि तणाव कमी करण्याच्या दिशेने हे एक सकारात्मक पाऊल असल्याचे म्हटले. इराणकडूनही अशाच प्रकारच्या विधायक प्रतिसादाची त्यांनी आशा व्यक्त केली. (वृत्तसंस्था)

### शांततेसाठी संवाद सुरू ठेवण्याची गरज

पश्चिम आशियामध्ये चिरस्थायी शांततेसाठी राजनैतिक संवाद सुरू ठेवण्याच्या गरजेवर दोन्ही बाजूंनी भर दिला. नकवी यांनी असेही सांगितले की, पाकिस्तानचे पंतप्रधान शाहबाज शरीफ आणि लष्करप्रमुख आसिम मुनीर शांततापूर्ण तोडगा काढण्यासाठी प्रत्येक स्तरावर प्रयत्न करत आहेत. चर्चेभोवती असलेल्या अनिश्चिततेच्या पार्श्वभूमीवर या आठवड्यातील ही त्यांची दुसरी बैठक होती.

# शरीरसंबंधाचे व्हिडिओ शूट करून ब्लॅकमेल

- दोन लाखांची खंडणी मागणाऱ्या महिला आरोपीसह चौघांना अटक
- सर्व आरोपींना दोन दिवसांची पोलिस कोठडी

**सोलापूर, दि. २३ एप्रिल-**

शरीरसंबंधासाठी प्रवृत्त करून त्याचे चित्रीकरण करत मारहाण व धमकी देत दोन लाख रुपयांची खंडणी उकळण्याचा प्रयत्न करणाऱ्या एका महिला आरोपीसह तिच्या तीन साथीदारांना कुर्डूवाडी पोलिसांनी जेरबंद केले आहे. दरम्यान अटक करण्यात आलेल्या सर्व आरोपींना माढा येथील न्यायालयात हजर करण्यात आले असता त्यांना दोन दिवसांची पोलीस कोठडी सुनावण्यात आली आहे.

दिलीप विश्वनाथ भालके, रणधीर दिलीप भालके, विक्रम सरवदे व संबंधित महिला आरोपी (सर्व रा. अंबाड, ता. माढा) अशी अटक करण्यात आलेल्या आरोपींची नावे असून याबाबत अलिशा शाहबाज खान (वय २०, रा. अंबाड, ता. माढा) यांनी फिर्याद दिली आहे.

यातील फिर्यादी अलिशा खान या २१ एप्रिल रोजी घरी असताना यातील आरोपी महिला व एक इसम त्यांच्या घरी येऊन त्यांना कुठेही जाऊ नये अशी धमकी दिली. भीतीपोटी फिर्यादीने डायल ११२ वर कॉल करून पोलिसांना माहिती दिली. त्यानंतर त्या पोलीस ठाण्याला जाऊन नवरा रात्रीपासून घरातून बेपत्ता असल्याची माहिती दिली. त्यानंतर पोलिस चौकशी सुरू असताना फिर्यादीचा पती व आरोपी हे पोलीस ठाण्याला आले होते. तेव्हा फिर्यादी पत्नीने काय प्रकार आहे याबाबत विचारणा केली असता पतीने सांगितले की यातील आरोपी महिलेने त्याला व त्याच्या मित्राला बोलावून फसवून एका शेतात नेले. तेथे या दोघांना शरीरसंबंध ठेवण्यास भाग पाडून त्याचे एकमेकांकडून मोबाईलमध्ये चित्रीकरण करण्यात आले. त्यानंतर पोलिस ठाण्यात नेतो, असे सांगून त्यांना अंबाड येथील एका बंद दुकानात नेऊन डांबून ठेवण्यात आले. तेथे आरोपींनी त्यांना बांधून लोखंडी रॉड व पाईपने मारहाण केली.यानंतर बलात्काराचा गुन्हा दाखल करू, अशी धमकी देत दोन लाख रुपयांची मागणी करण्यात आली. आणि बलात्काराचा गुन्हा दाखल न करण्यासाठी फिर्यादीच्या पतीला दोन वर्षे विटभट्टीवर तर फिर्यादीला हॉटेलवर जबरदस्तीने काम करावे लागेल अशी धमकी देण्यात आली. या प्रकरणी फिर्यादीने कुर्डुवाडी पोलिस ठाण्यात तक्रार दिल्यानंतर गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

या गुन्ह्याचे गांभीर्य ओळखून पोलीस अधीक्षक अतुल कुलकर्णी, अपर पोलीस अधीक्षक प्रीतम यावलकर, उपविभागीय पोलीस अधिकारी अंजना कृष्णा यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक अतुल मोहिते, सहाय्यक पोलीस निरीक्षक सचिन शिंदे तसेच पोलीस कर्मचारी भोसले, गोरे, शिंदे, देशमुख, पठाण, पवार आदींच्या पथकाने कारवाई करत वरील चारही आरोपींना अटक केली आहे. पुढील तपास सहाय्यक पोलीस निरीक्षक सचिन शिंदे करत आहेत.

# महिलेसह चार भूमिगत कार्यकर्त्यांना अटक

## हँड ग्रेनेड आणि गोळ्या जप्त

**◆ श्रीनगर, २३ एप्रिल**

जम्मू आणि काश्मीरमधील श्रीनगर पोलिसांनी दहशतवाद्यांना मदत करणाऱ्या चार ओव्हर ग्राऊंड वर्कर्सना (ओजीडब्ल्यू) अटक केली आहे. अटक केलेल्यांमध्ये एका महिलेचा समावेश आहे. या महिलेचे नाव शाझिया आहे. इतर आरोपींमध्ये जहूर अहमद मीर, बशीर अहमद भट आणि गुलाम मोहम्मद भट यांचा समावेश आहे. हे सर्व श्रीनगरच्या हजरतबल येथील रहिवासी असून त्यांना बुधवारी रात्री अटक करण्यात आली.

ओव्हर ग्राऊंड वर्कर्स हे लपलेल्या दहशतवाद्यांसाठी डोळे आणि कान म्हणून काम करतात. त्यांना रसद पुरविण्याचे त्यांचे उद्दिष्ट असते. त्यांच्याकडून मोठ्या प्रमाणात शस्त्रे आणि दारूगोळा जप्त करण्यात आला. यात एक हँड ग्रेनेड, अनेक गोळ्या, मोबाईल फोन आणि रोख रकमेचा समावेश आहे.

याप्रकरणी पोलिसांनी आरोपींवर बेकायदेशीर कृत्य प्रतिबंधक कायद्या (यूएपीए) अंतर्गत गुन्हा दाखल केला आहे.

**पंजाबमधून तिघांना घेतले ताब्यात**

जम्मू आणि काश्मीर, पंजाब, हरयाणा आणि राजस्थानमध्ये पसरलेल्या लष्कर-ए-तोयबाच्या एका मोठ्या आंतरराज्यीय मॉड्यूलचा पर्दाफाश करण्याच्या सुरू असलेल्या तपासादरम्यान ही अटक झाली आहे. श्रीनगरचे एसएसपी जी. व्ही. संदीप चक्रवर्ती यांच्या देखरेखीखाली श्रीनगर पोलिसांच्या विशेष पथकांनी वर नमूद केलेल्या चारही राज्यांमध्ये छापे टाकले. या छाप्यांदरम्यान सुरक्षा दलांनी पंजाबमधील मालेरकोटला येथील त्यांच्या लपण्याच्या ठिकाणाहून अब्दुल्ला उर्फ अबू हुरैरा आणि उस्मान उर्फ खुबैब या दोन पाकिस्तानी नागरिकांसह तीन लष्कर दहशतवाद्यांना अटक केली. (वृत्तसंस्था)

### चौथा साथीदार पळून जाण्यात यशस्वी

तपासात असे आढळून आले की, अनेक वर्षांच्या प्रत्यक्ष जमिनीवरील कामामुळे मजबूत झालेल्या या दोघांना भारतावर दहशतवादी कारवाया करण्यासाठी पाकिस्तानातील त्यांच्या तळावरून तैनात केले जात होते. तथापि, नियंत्रण रेषा आणि आंतरराष्ट्रीय सीमेवर वाढलेल्या सुरक्षा निगराणीमुळे देशाबाहेर जाण्यासाठी पासपोर्टसह कागदपत्रे मिळवण्याकरिता त्यांनी बनावट ओळख धारण केली होती. मात्र, त्यांचा चौथा साथीदार, उमर उर्फ खरगोश बनावट कागदपत्रांचा वापर करून भारतातून पळून जाण्यात यशस्वी झाला.



पश्चिम बंगालमध्ये पंतप्रधान नरेंद्र मोदींचा सभाचा धडाका सुरू आहे. सभा संपल्यानंतर मोदींनी गुरुवारी हावडा येथील बेलुर मठाला भेट दिली

## भीम जयंतीनिमित्त रणसम्राट युवारत्न पुरस्कार जाहीर, उद्या वितरण

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २३ एप्रिल-**

रणसम्राट बहुउद्देशीय सामाजिक संस्थेच्या वतीने विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३५ व्या जयंतीनिमित्त 'रणसम्राट युवारत्न २०२६' पुरस्कार जाहीर करण्यात आला आहे. सामाजिक, शैक्षणिक, साहित्य, कला, क्रीडा व विधी क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या व्यक्तींना या पुरस्काराने सन्मानित करण्यात येणार आहे.

हा पुरस्कार वितरण सोहळा शनिवारी २५ एप्रिल रोजी दुपारी १२ वाजता हॉटेल ऐश्वर्या येथे आयोजित करण्यात आला आहे.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी राज्यसभा खासदार प्रा. डॉ. ज्योतीताई वाघमारे असणार असून, खासदार धैर्यशील माने (कोल्हापूर) यांच्या हस्ते पुरस्कार प्रदान करण्यात येणार आहेत. तसेच डॉ. दिपाली काळे (एस.पी.) आणि ॲड. विजय मराठे यांची प्रमुख उपस्थिती लाभणार आहे.

यंदाच्या रणसम्राट युवारत्न २०२६ पुरस्कारासाठी विविध क्षेत्रातील मानकरी जाहीर करण्यात आले असून त्यामध्ये डॉ. औदुंबर मस्के (आरोग्य विभाग), डॉ. जगदीश पाटील (सामाजिक विभाग), प्रा. अंबादास पांढरे (शैक्षणिक विभाग), ॲड. श्रेया सापटणेकर (विधी व न्याय विभाग), इंद्रजीत वर्धन (पोलीस विभाग), प्रतीक्षा जाधव (क्रीडा विभाग), निखिल भालेराव (कलाक्षेत्र) आणि सचिन गाडेकर (पत्रकारिता) यांचा समावेश आहे.

# वाहन दरीत कोसळले; ८ ठार, २ जखमी

**टिहरी गढवाल :** उत्तराखंडच्या टिहरी गढवाल जिल्ह्यात एक भीषण अपघात झाला. चंबा पोलिस ठाण्याच्या हद्दीतील चंबा-कोटी कॉलनी रस्त्यावर नालजवळ एक युटिलिटी पिकअप (मॅक्स) गाडी अनियंत्रित होऊन खोल दरीत कोसळली. या अपघातात आठ जणांचा मृत्यू झाला असून दोघे जखमी झाले आहेत. वाहनात एकूण १० जण होते. अपघातग्रस्त वाहन हृषीकेशहून घणसालीकडे जात असताना हा अपघात झाला. सर्व प्रवासी घणसाली परिसरातील चांगी, थेला आणि चक्रेडा गावांचे रहिवासी होते. ते हरिद्वारमधील एका अंत्यविधीहून परतत होते. वाटेत नालजवळ वाहनावरील नियंत्रण अचानक सुटले आणि ते खोल दरीत कोसळले. स्थानिकांनी तत्काळ घटनास्थळी धाव घेत बचावकार्य सुरू केले. जिल्हा आपत्ती व्यवस्थापन अधिकारी ब्रिजेश भट्ट यांनी आठ जणांच्या मृत्यूची पुष्टी केली. तसेच दोन्ही जखमींना बौरारी येथील जिल्हा रुग्णालयात दाखल करण्यात आले असून त्यांच्यावर उपचार सुरू आहेत.

# खरातला गर्भपातासाठी नामांकित डॉक्टरांची मदत

### वैद्यकीय क्षेत्रात उडाली खळबळ

**◆ मुंबई, २३ एप्रिल**

भोंदू अशोक खरात प्रकरणाचा तपास जसजसा पुढे सरकत आहे, तसतसे नवे धक्कादायक खुलासे समोर येत आहेत. विशेष तपास पथकाच्या (एसआयटी) चौकशीत आता या प्रकरणाला एक वेगळेच वळण मिळाले आहे. खरातने महिलांचे शोषण केल्यानंतर त्यांच्या गर्भपातासाठी काही नामांकित डॉक्टरांची मदत घेतल्याचा संशय व्यक्त केला जात आहे. या नव्या घडामोडींमुळे केवळ गुन्हेगारी नव्हे तर वैद्यकीय क्षेत्रातही खळबळ उडाली आहे.



अशोक खरात स्वतःला 'दैवी शक्ती' असलेला व्यक्ती म्हणून सादर करत महिलांना आपल्या जाळ्यात अडकवत होता. त्यानंतर त्यांचे लैंगिक शोषण केल्याचे तपासात समोर आले आहे. या प्रकरणात एका पीडित महिलेच्या गर्भपाताचा मुद्दा समोर आल्यानंतर तपासाची दिशा बदलली. गर्भपात नेमका कुठे आणि कसा करण्यात आला, याचा शोध घेताना पोलिसांना काही महत्त्वाचे धागेदोरे मिळाले आहेत. (वृत्तसंस्था)

### संपर्कात होते बडे डॉक्टर

तपास यंत्रणेला मिळालेल्या माहितीनुसार, खरातच्या संपर्कात काही बडे डॉक्टर आणि सोनोग्राफी केंद्र चालवणारे व्यक्ती होते. पीडित महिला गरोदर राहिल्यानंतर त्यांना गर्भपातासाठी औषधे देण्यात येत होती. ही औषधे नियमबाह्य पद्धतीने कशी मिळाली, याचा शोध घेतला असता काही डॉक्टरांनीच ती पुरवल्याचा संशय व्यक्त केला जात आहे. त्यामुळे या प्रकरणात वैद्यकीय व्यावसायिकांचा सहभाग असण्याची शक्यता नाकारता येत नाही.



# वसुंधरा दिनी स्मृती वन उद्यानात स्वच्छता मोहीम

**इको फ्रेंडली क्लब, सामाजिक वनीकरण आणि महापालिकेचा उपक्रम**

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २३ एप्रिल-**

'निसर्ग वाचवा, पृथ्वी वाचवा हा केवळ संदेश न राहता ती प्रत्येकाची कृती बनावी, या उद्देशाने जागतिक वसुंधरा दिनानिमित्त स्वच्छता मोहीम राबवण्यात आली. इको फ्रेंडली क्लब, सामाजिक वनीकरण विभाग आणि सोलापूर महापालिका यांच्या संयुक्त विद्यमाने शहरातील स्मृती वन उद्यान परिसरात ही स्वच्छता मोहीम पार पडली

सोलापूरचे फुफ्फुस मानल्या जाणाऱ्या स्मृती वन उद्यान परिसरात बेशिस्त नागरिक आणि मद्यपींमुळे मोठ्या प्रमाणात कचरा साचला आहे. या मोहिमेत युज अँड थ्रो प्लास्टिकचे ग्लास, प्लेट्स, दारू आणि बिअरच्या काचेच्या बाटल्यांसह इतर घातक कचरा मोठ्या प्रमाणात गोळा करण्यात आला. यात उपमहापौर ज्ञानेश्वरी देवकर स्वतः सहभागी झाल्या होत्या.

सामाजिक वनीकरण विभागाचे विभागीय वनाधिकारी लक्ष्मण आवारे सहायक वनसंरक्षक शुभांगी चव्हाण, वनपरिक्षेत्र अधिकारी रघुनाथ कांबळे, गुरुदत्त दाभाडे, धर्मेंद्र राऊत, संदीप शेंडे, सचिन जोशी, शंकर कुताटे, महेश हिरेमठ आणि महापालिकेचे आरोग्य निरीक्षक कार्तिक पवार यांनी सहकार्य केले. या मोहिमेत इको फ्रेंडली क्लबच्या सदस्या डॉ. मधुरा बुरटे, मेघा क्षीरसागर, शोभा पुराणिक, गंगुबाई कोकणे, स्नेहा क्षीरसागर, अस्मय क्षीरसागर, सुनिता पाटील, राजश्री गायकवाड, धनंजय कांबळे, सचिन कांबळे, सनी पाटील, राकेश दिक्षीत, श्री व सौ चिलजवार, अजित चौहान, संतोष धाकपाडे, सटवाजी कोकणे, सुनील मोतेकर, शिल्पा घोडके, सरस्वती कोकणे, आराध्या कोकणे, सुरज रघोजी, महेश पांढरे, मनोज देवकर उपस्थित होते.

# श्रीमान भाऊसाहेब गांधी
## शिक्षणक्षेत्रातील आदर्श व्यक्तिमत्त्व



**श्री ऐलक पन्नालाल दिगंबर जैन पाठशाळा ही संस्था आज भारतात दर्जेदार व गुणवत्तापूर्ण शिक्षण देणारी अग्रगण्य संस्था म्हणून नावाजलेली आहे. सुमारे १३९ वर्षांची गौरवशाली परंपरा लाभलेल्या या संस्थेने "शिक्षण हाच धर्म" हे ब्रीदवाक्य अंगीकारून सर्व समाजघटकांपर्यंत शिक्षण पोहोचवण्याचे कार्य सातत्याने केले आहे. या कार्यामागील प्रमुख प्रेरणास्थान म्हणजे शिक्षणतपस्वी श्रीमान श्रद्धेय भाऊसाहेब गांधी होत.**

भाऊसाहेब गांधी यांनी "उत्तम संस्कार हेच खरे शिक्षण" या तत्त्वावर आधारित कार्य करत संस्थेचा सर्वांगीण विकास घडवून आणला. १९७२ साली त्यांनी संस्थेच्या सचिवपदाची सूत्रे हाती घेतली आणि जवळपास तीन दशके अत्यंत निष्ठेने नेतृत्व करत संस्थेला उंचीवर नेले. त्यांच्या कार्यकाळात शिक्षणातील गुणवत्ता, शिस्त आणि पारदर्शकता यांना सर्वोच्च प्राधान्य देण्यात आले. संस्थेतील प्रत्येक शाळा व महाविद्यालयात उत्कृष्ट शैक्षणिक सुविधा उपलब्ध करून देणे, गुणवत्तापूर्ण शिक्षणावर तडजोड न करणे आणि विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासाकडे लक्ष देणे हे त्यांच्या कार्यशैलीचे वैशिष्ट्य होते. प्रवेश प्रक्रियेत पारदर्शकता राखणे आणि कोणत्याही प्रकारचा हस्तक्षेप टाळणे याबाबत ते अत्यंत ठाम होते.

भाऊसाहेब गांधी यांचे मोठे योगदान म्हणजे त्यांनी शिक्षण समाजाच्या सर्व स्तरांपर्यंत पोहोचवले. विशेषतः बीडी उद्योगातील कामगारांची मुले आणि आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांतील विद्यार्थ्यांना शिक्षणाची संधी उपलब्ध करून दिली. त्यांच्या प्रयत्नांमुळे लाखो विद्यार्थी उच्चशिक्षित होऊन समाजात यशस्वी झाले.त्यांनी समानता, कार्यक्षमता आणि परिणामकारकता या त्रिसूत्रीचा पुरस्कार करत शिक्षण क्षेत्रात नवे आदर्श निर्माण केले. त्यांच्या नेतृत्वाखाली प्राथमिक ते उच्च शिक्षण तसेच व्यावसायिक अभ्यासक्रमांची सुरुवात झाली. बदलत्या काळाची गरज ओळखून त्यांनी व्यावसायाभिमुख शिक्षणाला विशेष महत्त्व दिले. भाऊसाहेब गांधी हे केवळ कुशल प्रशासक नव्हते, तर ते उच्च नैतिक मूल्ये जपणारे व्यक्तिमत्त्व होते. निःस्वार्थपणा, प्रामाणिकपणा, कर्तव्यनिष्ठा, शिस्तबद्धता आणि सर्वधर्मसमभाव या गुणांमुळे ते सर्वांच्या आदरास पात्र ठरले. संस्थेतील शिक्षक, कर्मचारी आणि विद्यार्थ्यांशी त्यांनी जपलेले आत्मीय नाते हे त्यांच्या व्यक्तिमत्वाचे विशेष वैशिष्ट्य होते. कस्तुरबाई कॉलेज ऑफ एज्युकेशन या महाविद्यालयाबाबत त्यांचे एक व्यापक स्वप्न होते. शिक्षक शिक्षणाच्या सर्व स्तरांवरील अभ्यासक्रम एकाच ठिकाणी उपलब्ध व्हावेत. आज डी.एल.एड., बी.एड., एम.एड., एम.फिल., पीएच.डी. तसेच इतर अभ्यासक्रमांच्या माध्यमातून हे स्वप्न साकार झालेले दिसते.

आजही महाराष्ट्रातील विविध शिक्षणतज्ज्ञ आणि अभ्यासक भाऊसाहेब गांधी यांच्या पारदर्शक व दूरदर्शी कार्याचे कौतुक करतात. कोणतीही देणगी न घेता संस्थेचा विकास करता येतो याचे उत्तम उदाहरण म्हणजे ही संस्था होय. दि. २४ एप्रिल २०२६ रोजी त्यांच्या २४ व्या स्मृतिदिनी त्यांचे कार्य स्मरण करताना त्यांच्या योगदानाची जाणीव अधिक ठळकपणे होते. वालचंद शिक्षण समूहाचे "पितामह" म्हणून त्यांचा उल्लेख केला जातो, तो योग्यच आहे. एकंदरीत, श्रीमान भाऊसाहेब गांधी हे शिक्षण क्षेत्रातील एक आदर्श, प्रेरणादायी आणि अनुकरणीय व्यक्तिमत्त्व होते. त्यांच्या कार्यामुळेच संस्थेचा भव्य विकास झाला आणि गुणवत्तापूर्ण शिक्षणाची परंपरा आजही अखंडपणे पुढे चालू आहे. त्यांच्या विचारांचे आणि तत्त्वांचे पालन करत संस्था भविष्यातही शिक्षण क्षेत्रात नवे कीर्तिमान निर्माण करेल, हीच खरी त्यांना श्रद्धांजली ठरेल.

**- प्राचार्य, डॉ. अश्विन बोंदार्डे**
**कस्तुरबाई कॉलेज ऑफ एज्युकेशन, अशोक चौक, सोलापूर**

# माण नदीत उन्हाळी आवर्तन; टेंभू-म्हैसाळ योजनेला गती

**आ. डॉ. बाबासाहेब देशमुख यांच्या प्रयत्नांना यश**

**तभा वृत्तसेवा,**
**सांगोला,दि.२३ एप्रिल-**

जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी टेंभू-म्हैसाळ उपसा सिंचन योजनेअंतर्गत माण नदीमध्ये उन्हाळी आवर्तन सोडण्याचे निर्देश दिले असून त्यामुळे सांगोला तालुक्यातील शेती व पिण्याच्या पाण्याचा प्रश्न काही प्रमाणात मार्गी लागण्याची अपेक्षा व्यक्त होत आहे. या संदर्भात झालेल्या बैठकीत अधिकाऱ्यांनी सांगितले की, सांगोला तालुक्यातील क्र.४ आणि ५ फाट्यामधूनही लवकरच उन्हाळी आवर्तन सोडण्यात येणार आहे.

माण नदीत आवर्तन सोडल्याने नदीकाठच्या गावांतील विहिरी, बोअरवेल्स आणि इतर पाणीस्रोतांची पातळी वाढण्यास मदत होणार आहे. परिणामी खरीपपूर्व शेतीकामांना गती मिळेल तसेच जनावरांच्या पाण्याची टंचाई कमी होईल. काही भागांत आधीच पाणीटंचाई तीव्र झाल्याने या आवर्तनाकडे शेतकऱ्यांचे लक्ष लागले आहे. शेतकऱ्यांनी ठिबक व तुषार सिंचनासारख्या पाण्याची बचत करणाऱ्या आधुनिक पद्धतींचा अवलंब करून उपलब्ध पाण्याचा कार्यक्षम वापर करावा, असे



आवाहन प्रशासनाने केले आहे. टेंभू-म्हैसाळ योजनेच्या माध्यमातून सांगोला तालुक्यातील सिंचनक्षेत्रात वाढ करण्याचा राज्य सरकारचा प्रयत्न असून, अशा उन्हाळी आवर्तनांमुळे या योजनेचा प्रत्यक्ष लाभ तळागाळातील शेतकऱ्यांपर्यंत पोहोचण्यास मदत होत आहे. आगामी काळात पाण्याच्या साठ्याची स्थिती लक्षात घेऊन आणखी आवर्तनांचे नियोजन करण्याबाबतही सकारात्मक संकेत बैठकीत देण्यात आले. या बैठकीत आ.डॉ.बाबासाहेब देशमुख यांनी सक्रिय सहभाग घेतला.

सांगोला तालुक्यातील पाणीटंचाईची गंभीर परिस्थिती लक्षात घेऊन आ.डॉ.बाबासाहेब देशमुख यांनी उन्हाळी आवर्तन तातडीने सोडण्याची मागणी केली होती. या मागणीला सकारात्मक प्रतिसाद देत निर्णय घेतल्याबद्दल त्यांनी जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांचे आभार मानले.

छत्रपती शिवाजी महाराजांचे नाव घेण्याचीदेखील गायकवाड यांची पात्रता नाही. त्यांच्या बोलण्याची पातळी आणि वापरलेली भाषा पाहता महाराष्ट्राच्या संस्कृतीला धक्का पोहोचत आहे. त्यांनी बुलढाण्याचे नाव बदनाम करण्याचा ठेका घेतला काय?
**हर्षवर्धन सपकाळ.** काँग्रेस प्रदेशाध्यक्ष

तरुण भारत
न मे कर्मफले स्पृहा
शुक्रवार, २४ एप्रिल २०२६ 

लोकसभेला आणि विधानसभेला पवार विरुद्ध पवार असं एकमेकांविरुद्ध लढलो त्याचं दुःख आहे. पण, आम्ही कुटुंब म्हणून एकत्र आलेलो आहेत. आता पवार विरुद्ध पवार लढाई नको, तशी आमची इच्छाही नाही.
**युगेंद्र पवार,** नेते, राकॉं.(श.प.)

# बंगालमध्ये १० ठिकाणी निवडणूक हिंसाचार

**मुर्शिदाबाद ते कुचबिहारपर्यंत दगड-विटा ते लाठीपर्यंत सर्वच**

◆ **कोलकाता, २३ एप्रिल**

पश्चिम बंगालमधील विधानसभा निवडणुकीच्या पहिल्या टप्प्यातील गुरुवारी झालेल्या मतदानादरम्यान राज्यात मोठ्या प्रमाणात हिंसाचार झाला. आसनसोल, मालदा, कुचबिहार, सिलिगुडी, मुर्शिदाबादसह १० ठिकाणी हिंसक संघर्ष झाला. उमेदवारांना घेरून मारहाण करण्यात आली. कुठे लाठीमार करण्यात आला, तर काही ठिकाणी दगड-विटांचा जोरदार मारा करण्यात आला.



दक्षिण मिदनापूर जिल्ह्यातील कुमारगंज मतदारसंघात भाजपाचे उमेदवार शुभेंदू अधिकारी यांच्यावर हल्ला करण्यात आला. या व्हिडीओमध्ये शुभेंदू अधिकारी हल्ल्यातून वाचताना पळताना दिसत आहेत. त्यांचा सुरक्षा रक्षक सोबत असतानाही गुंड त्यांना मारहाण करीत असल्याचे व्हिडीओत दिसून आले. आसनसोल येथे भाजपाच्या आमदार अग्निमित्रा पॉल यांच्या वाहनावर अज्ञात लोकांनी हल्ला केला. ही घटना बर्नपूरच्या रहमतनगर परिसरात झाली. मतदान प्रक्रियेचा आढावा घेण्यासाठी मतदान केंद्रांवर त्या भेट देत असताना त्यांच्यावर हल्ल करण्यात आला. परिसरातील एका इमारतीत असलेल्या मतदान केंद्राचे निरीक्षण केल्यानंतर त्या जात असताना त्यांच्या वाहनावर पाठीमागून एक मोठा दगड फेकण्यात आला. त्यामुळे वाहनाची मागील काच फुटली. अग्निमित्रा पॉल यांना कोणतीही दुखापत झाली नसली, तरी मागील आसनांवर बसलेले सुरक्षा कर्मचारी आणि स्वीय सहाय्यक किरकोळ जखणी झाले. अल्पसंख्यक बहूल परिसरात भाजपाच्या प्रतिनिधींवर जाणीवपूर्वक हल्ला केला जात आहे. सुरक्षा व्यवस्थेत ही गंभीर चूक असल्याचा आरोप त्यांनी केला.

केशपूर येथे निवडणूक केंद्रासमोर एका महिलेचा मृत्यू झाला. इशरतन बीबी असे तिचे नाव आहे. ती पश्चिम मेदिनीपूर येथील केशपूर विधानसभा मतदारसंघातील रहिवासी होती. कुटुंबातील चार जणांचे नाव मतदारयादीत नव्हते. माझे नावही त्यात नव्हते. केवळ माझ्या पत्नीचेच नाव त्यात होते. मी तिला मतदानासाठी घेऊन गेलो. मी मतदान केंद्राच्या बाहेर होतो. मतदान केल्यावर माझी पत्नी टोटोत बसली आणि तिचा मृत्यू झाल्याचे तिच्या पतीने सांगितले.

एजेयूपीचे प्रमुख आणि रेजीनगरचे उमेदवार हुमायूं कबीर दौरा करायला गेले असताना मुर्शिदाबादच्या नौदा येथे मोठ्या प्रमाणावर तणाव निर्माण झाला. या भागात तृणमूल काँग्रेस आणि एजेयूपीच्या कार्यकर्त्यांत जोरदार संघर्ष झाला. घटनास्थळी उपस्थित पोलिस कर्मचारी आणि हुमायूं कबीर यांच्यात वादावादी झाल्याची चित्रफीत समोर आली आहे. हल्लेखोरांनी अचानक हुमायूं कबीर यांचे वाहन घेरले. त्याच्या हातात लाठ्या, मोठाले दांडके आणि विटा होत्या. तृणमूलच्या कार्यकर्त्यांनी हुमायूं कबीरच्या विरोधात जोरदार नारेबाजी केल्याचा आरोप आहे. परिस्थिती चिघळत असल्याचे पाहताच सुरक्षा वाढवण्यात आली. येथे केंद्रीय सुरक्षा दलांनी परिस्थिती नियंत्रणात आणली.

मालदा जिल्ह्यातील हरिश्चंद्रपूर विधानसभा मतदारसंघात तृणमूल काँग्रेसच्या दोन गटांत हाणामारी झाली. तणाव वाढल्यानंतर मंत्री ताजमूल हुसैन यांचे मूळ गाव बांगरुआ येथे तृणमूलच्या एका कार्यालयात जोरदार तोडफोड करण्यात आली. हुसैन आणि त्यांचे कार्यकर्ते काँग्रेस उमेदवाराचा प्रचार करीत असल्याचा आरोप स्थानिक नेत्याने केला. हुसेन यांच्या कार्यकर्त्यांनी काँग्रेस कार्यकर्त्यांना सोबत घेत तृणमूलच्या कार्यालयावर हल्ला केल्याचा आरोप या नेत्याने केला. ◀(वृत्तसंस्था)

### सिलिगुडीत तृणमूल-भाजपा कार्यकर्त्यांत संघर्ष

सिलिगुडीच्या जगदीश चंद्र विद्यापीठातील मतदान केंद्राबाहेर तृणमूल काँग्रेस आणि भाजपाच्या कार्यकर्त्यांमध्ये अचानक वाद झाला. त्यानंतर दोन्ही पक्षांच्या कार्यकर्त्यांत संघर्ष सुरू झाला. यावेळी भाजपाचे उमेदवार शंकर घोष घटनास्थळी होते. केंद्रावर तैनात केंद्रीय सशस्त्र दलाच्या जवानांनी लगेच जमावाला पांगवले आणि परिस्थिती नियंत्रणात आणली. ■

### इव्हीएममधील बिघाडामुळे मतदार भडकले

मालदातील मोथाबाडी विधानसभा मतदारसंघात बालुआचारा येथील मतदान केंद्रातील इव्हीएम बिघडल्याने या परिसरात तणाव निर्माण झाला. मतदान केंद्रावर पोहोचण्यास अधिकाऱ्यांना विलंब झाल्याने त्यांना लोकांनी घेराव घातला. लोक त्यांना खेचताना आणि मारहाण करताना व्हिडीओत दिसले. ■

### तुफानगंजमध्ये तणाव

कुचबिहारच्या तुफानगंज येथील मतदान केंद्रावर मोठ्या प्रमाणात गर्दी झाल्याने तणाव निर्माण झाला. परिस्थिती नियंत्रणात आणण्यासाठी केंद्रीय सशस्त्र पोलिस दलाला सौम्य लाठीमार करावा लागला. काही असामाजिक तत्त्व मतदात्यांना घाबरवण्याचा प्रयत्न करीत होते. त्यामुळे बळाचा वापर करावा लागल्यानचे अधिकाऱ्यांनी सांगितले. ■



गोंधळी कार्यकर्त्यांना ताब्यात घेताना जवान



नंदिग्राम येथील केंद्रावर बजावला मतदानाचा हक्क




मुर्शिदाबाद : ओळखपत्राची पाहणी करताना सुरक्षा जवान



पश्चिम बंगालमधील मिदनापूर येथील केंद्रांवर मतदानासाठी लागलेली महिलांची रांग



मतदानानंतर विजयी खूण दाखविताना भाजपाचे शुभेंदु अधिकारी







चेन्नई येथील विविध मतदान केंद्रांवर अभिनेते रजनीकांत, कमल हसन, श्रुति हसन, थलपती विजय यांनी मतदानाचा हक्क बजावला



अभिनेता धनुष



तामिळनाडूतील एका केंद्रावर मतदानासाठी लागलेली रांग



मुख्यमंत्री एम. के. स्टॅलिन

## चित्रपट वार्ता


### आमचे नाते वैयक्तिक आयुष्यातही घट्ट

**मुंबई:** प्रसिद्ध दिग्दर्शक डेविड धवन आणि सलमान खान यांनी अनेक यशस्वी चित्रपट दिग्दर्शित केले असून, त्यांची जोडी ही बॉलिवूडमधील सर्वात लक्षात राहणाऱ्या अभिनेता-दिग्दर्शक जोड्यांपैकी एक मानली जाते. मात्र, त्यांचे नाते फक्त चित्रपटांपुरते मर्यादित नाही. अलीकडेच, डेविड धवन यांनी या खास नात्याबद्दल सविस्तर बोलताना सलमान खान यांचे कौतुक केले . त्यांनी सांगितलं की, सलमान फक्त सुपरस्टार नाहीत, तर अत्यंत मोठ्या मनाचे आणि भावनिक व्यक्ती आहेत. त्यांचे नाते चित्रपटांपलीकडे जाऊन वैयक्तिक आयुष्यातही घट्ट आहे. डेविड धवन म्हणाले, आमचं नातं खूप जुनं आहे. आम्ही एकत्र ८-९ चित्रपट केले आहेत. त्यांनी नेहमी प्रत्येक गोष्टीत साथ दिली आहे. कुटुंबाचा विषय आला तर ते फक्त एका व्यक्तीसाठी नाही, तर सगळ्यांसाठी उभे राहतात. आमचे एकमेकांशी खूप छान जमते. ■




### 'तुंबाडची मंजुळा'चा टीझर प्रदर्शित

**मुंबई:** झी स्टुडिओज निर्मित 'तुंबाडची मंजुळा' या आगामी चित्रपटाचा टीझर प्रदर्शित झाल्यापासून चित्रपटाची सर्वत्र जोरदार चर्चा सुरू आहे. टीझरमधील गावकऱ्यांची हटके झलक पाहून प्रेक्षकांची उत्सुकता चांगलीच वाढली आहे. या गावात नेमके काय वेगळे आहे, हे जाणून घेण्याची उत्सुकता निर्माण झालेली असतानाच आता चित्रपटातील 'असं वेगळं गाव' हे गाणे प्रेक्षकांच्या भेटीस आले आहे. या गाण्याचं वैशिष्ट्ये म्हणजे शास्त्रीय आणि सुगम संगीतातील सुप्रसिद्ध नाव राहुल देशपांडे आणि गोड गळ्याची गायिका आर्या आंबेकर यांच्या सुरांतून या गावाचं दर्शन होणार आहे. या दोघांच्या आवाजातील भावपूर्णता आणि सहजता गाण्याला एक वेगळीच उंची देते. या गाण्याच्या निमित्ताने ही दोन नावे प्रथमच एकत्र आली असून त्यामुळे त्यांच्या चाहत्यांमध्ये या गाण्याबद्दलची उत्कंठा वाढली आहे. ■



### 'भूत बंगला'ने केले 'धुरंधर-२'ला ओव्हरटेक



**मुंबई:** बॉलिवूड अभिनेता अक्षय कुमार याचा बहुचर्चित 'भूत बंगला' हा चित्रपट १७ एप्रिल रोजी प्रदर्शित झाल्यानंतर बॉक्स ऑफिसवर दमदार कामगिरी करताना दिसत आहे. सहा दिवसांतच चित्रपटाने उल्लेखनीय कमाई करत प्रेक्षकांचा चांगला प्रतिसाद मिळवला असून, अक्षय कुमारच्या अलीकडील चित्रपटांतील मंदीला या चित्रपटाने ब्रेक दिल्याची चर्चा रंगली आहे. प्रदर्शनाच्या पहिल्याच वीकेंडमध्ये 'भूत बंगला'ने ५० कोटी रुपयांहून अधिक गल्ला जमवला. इतकेच नव्हे तर अवघ्या चार दिवसांत चित्रपटाने जागतिक स्तरावर १०० कोटी रुपयांचा टप्पा पार केला. त्यामुळे चित्रपटाच्या यशाची नोंद उद्योगात ठळकपणे घेतली जात आहे. चित्रपटाच्या दैनंदिन कमाईकडे पाहिल्यास, पहिल्या दिवशी १२.२५ कोटी, दुसऱ्या दिवशी १९ कोटी आणि तिसऱ्या दिवशी २३ कोटी रुपयांची कमाई झाली. ■

## पाच वर्षांनंतर भारत चिनी पर्यटकांना देणार व्हिसा

◆ **नवी दिल्ली, २३ एप्रिल**

भारत सरकार चिनी नागरिकांसाठी पर्यटक व्हिसा पुन्हा सुरू करण्याच्या तयारीत आहे. गलवान खोऱ्यातील हिंसक संघर्षानंतर सुमारे पाच वर्षांपूर्वी ही सेवा बंद करण्यात आली होती. दोन्ही देशांमधील संबंधांमधील तणाव आता हळूहळू निवळत असून संबंध हळूहळू सुधारत असताना हे पाऊल उचलण्यात आले आहे.

अलीकडेच, भारत आणि चीनने थेट विमानसेवा पुन्हा सुरू करण्याचा निर्णय घेतला आहे. दीर्घकाळ रखडलेली कैलास मानसरोवर यात्राही पुन्हा सुरू करण्यात आली आहे. नवीन व्हिसा नियम चीन, हाँगकाँग आणि मकाऊ येथून येणाऱ्या प्रवाशांना लागू होतील. पर्यटन, व्यापार आणि लोकांमधील देवाणघेवाण पुन्हा सुरू करण्याच्या सरकारच्या प्रयत्नांचा हा एक भाग आहे. दोन्ही देशांमधील तणावामुळे गेल्या काही वर्षांपासून हे उपक्रम थांबले होते. व्हिसासाठी सामान्य प्रक्रिया पाळली जाईल, तरीही सुरक्षेच्या कारणास्तव काही निर्बंध लागू राहतील.

**दोन्ही देशांमधील संबंध अधिक दृढ होतील**

तज्ज्ञांच्या मते, या निर्णयामुळे दोन्ही देशांमधील आर्थिक आणि सांस्कृतिक संबंध अधिक दृढ होतील. व्यावसायिक समुदायानेही या निर्णयाचे स्वागत केले आहे. सध्या, दोन्ही देश त्यांचे पूर्वीचे मतभेद मागे टाकून हळूहळू सहकार्याच्या दिशेने वाटचाल करत आहेत. ◀(वृत्तसंस्था)

## बलुचिस्तानमधून सोने, तांबे चोरण्याचा प्रयत्न फसला

### बंडखोरांच्या हल्ल्यात नऊ खाण कामगार ठार

◆ **इस्लामाबाद, २३ एप्रिल**

बलुचिस्तानमधून तांबे आणि सोने चोरण्याचा पाकिस्तानचा प्रयत्न महागात पडत आहे. या प्रांतातील चगाई जिल्ह्यातील एका खाणीत अज्ञात हल्लेखोरांनी केलेल्या हल्ल्यात नऊ खाण कामगार ठार झाले. हे सर्वजण सोने आणि तांब्याच्या खाणकामात गुंतलेले होते.

खाण चालवणाऱ्या नॅशनल रिसोर्सेस लिमिटेड (एनआरएल) या खाण कंपनीने सांगितले की, हा हल्ला बुधवारी सायंकाळी झाला. कंपनीने पुढे सांगितले की, फ्रंटियर कॉर्प्ससह सुरक्षा दलांनी तात्काळ प्रतिसाद देत परिसर सुरक्षित केला आणि शोधमोहीम सुरू केली. बंडखोरांच्या हल्ल्यात ९ जण ठार झाले असतानाही कंपनीने आपल्या निवेदनात मृतांची संख्या लपवण्याचा प्रयत्न केला. तथापि, स्थानिक अधिकाऱ्यांनी या हल्ल्यात नऊ जणांच्या मृत्यूची पुष्टी केली. ◀(वृत्तसंस्था)

### कंपनी बलुचिस्तानच्या लोकांचे रक्षण करते

एनआरएलने आपल्या निवेदनात म्हटले आहे की, आम्ही बलुचिस्तानमधील स्थानिक समुदायांचा विकास आणि सक्षमीकरणासाठी पूर्णपणे वचनबद्ध आहोत. ज्यामध्ये उपजीविका सुधारणे आणि आर्थिक उन्नतीमध्ये योगदान देण्यावर प्रामुख्याने लक्ष केंद्रित केले आहे. कंपनीने दावा केला की, दारिगवान साइटवर काम करणाऱ्या ९० टक्क्यांहून अधिक व्यक्ती बलुचिस्तानच्या आहेत. एनआरएलने सांगितले की, आपल्या कर्मचाऱ्यांची व कामकाजाची सुरक्षा हे त्यांचे सर्वोच्च प्राधान्य आहे. ■

## ट्रॅक्टर-ट्रॉली उलटल्याने पाच जणांचा मृत्यू, ३० जखमी

◆ **लखीमपूर खेरी, २३ एप्रिल**

उत्तर प्रदेशातील लखीमपूर खेरी येथे गुरुवारी झालेल्या एका भीषण अपघातामुळे आनंदाचे रूपांतर शोकात झाले. मुंडन समारंभासाठी निघालेल्या लोकांना घेऊन जाणारी ट्रॅक्टर-ट्रॉली अचानक अनियंत्रित होऊन उलटली. यात पाच जणांचा जागीच मृत्यू झाला तर सुमारे ३० जण जखमी झाले. जखमींपैकी पंधरा जणांची प्रकृती गंभीर असल्याचे सांगण्यात येत आहे.

शारदानगर पोलिस ठाण्याच्या हद्दीतील सुमारे ५० लोक बहराइच जिल्ह्यातील करिकोट मंदिरात होणाऱ्या मुंडन समारंभासाठी दोन ट्रॅक्टर-ट्रॉलीमधून प्रवास करत होते. हा भीषण अपघात पढुआ पोलिस ठाण्याच्या हद्दीतील बोझिया पंप आणि गढ बाबा मंदिरादरम्यान घडला. अति वेग आणि असंतुलनामुळे ट्रॉली उलटली. ट्रॉलीखाली प्रवाशी अडकल्यामुळे सर्वत्र किंकाळ्या ऐकू येत होत्या. अपघातानंतर स्थानिक रहिवाशांनी तात्काळ बचावकार्य सुरू केले आणि जखमींना बाहेर काढले. ◀(वृत्तसंस्था)

## चार वाहनांचा अपघात; ११ जण जिवंत जळाले

### ट्रकचे ब्रेक निकामी झाल्याचा संशय

◆ **मिर्झापूर, २३ एप्रिल**

उत्तर प्रदेशातील मिर्झापूर जिल्ह्यात ट्रक, ट्रेलर, स्विफ्ट कार आणि बोलेरो एकमेकांना धडकल्याने मोठा स्फोट आणि आग लागली. या अपघातात दोन निष्पाप मुलांसह ११ जणांचा मृत्यू झाला. ही हृदयद्रावक घटना बुधवारी रात्री ८.३० च्या सुमारास रेवा-मिर्झापूर महामार्गावरील ड्रमंडगंज खोऱ्यात घडली. उतारावर ट्रकचे ब्रेक निकामी झाल्यामुळे हा अपघात झाला, असे सांगण्यात येत आहे.

प्रत्यक्षदर्शींनी दिलेल्या माहितीनुसार, अपघातानंतर लगेचच गाड्यांमधील लोक किंचाळू आणि आरडाओरडा करू लागले. त्यानंतर, एका मोठ्या स्फोटासह स्विफ्ट कार आणि बोलेरोला आग लागली. आग इतकी भीषण होती की, बचावकार्य सुरू होईपर्यंत गाड्यांमधील लोकांच्या किंकाळ्या थांबल्या होत्या. माहिती मिळताच पोलिस आणि अग्निशमन दलाची पथके तातडीने घटनास्थळी दाखल झाली. त्यांनी स्थानिक लोकांच्या मदतीने बचावकार्य सुरू केले. या अपघातात ११ जणांचा घटनास्थळीच मृत्यू झाला. तर अझीझ खान यांना रुग्णालयात उपचारादरम्यान मृत्यू झाला.



पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, खडीने भरलेला एक ट्रेलर ड्रमंडगंज खोऱ्यातून खाली उतरत होता. त्याच्यामागे एक स्विफ्ट कार होती. त्या कारच्या मागे डाळींनी भरलेला एक ट्रक आणि त्याच्याही मागे एक बोलेरो होती. दरम्यान, डाळींनी भरलेल्या एका ट्रकचे ब्रेक अचानक निकामी झाले आणि तो पुढे जाणाऱ्या स्विफ्ट कारला धडकला. धडकेनंतर, स्विफ्ट कार पुढच्या ट्रेलरला धडकली. मागून येणाऱ्या बोलेरो चालकाचेही नियंत्रण सुटले आणि ती ट्रकला धडकली. धडक इतकी जोरदार होती की, बोलेरोला तात्काळ आग लागली. बोलेरोला आगीच्या ज्वाळांनी वेढल्यामुळे आत प्रवासी अडकले. ट्रकचालक बाहेर पडण्यात यशस्वी झाला, परंतु बोलेरोमधील प्रवासी बाहेर पडू शकले नाहीत.

**मृतांमध्ये एकाच कुटुंबातील लोकांचा समावेश**

जिल्हाधिकारी पवन गंगवार यांनी दिलेल्या माहितीनुसार अपघातात मृत्युमुखी पडलेल्यांपैकी सात जण मिर्झापूर जिल्ह्यातील होते, तीन जण मध्य प्रदेशातील तर एक व्यक्ती सोनभद्र जिल्ह्यातील होती. मिर्झापूरच्या शिवा सिंग, सोनम सिंग, पियुष सिंग, पंकज सिंग, वंदना सिंग, विष्णू सिंग आणि वीणा सिंग यांचा समावेश आहे. तर मध्य प्रदेशातील सतना येथील कार्तिकेय सिंग आणि प्रियांका सिंग, सागर येथील विकास शर्मा आणि सोनभद्र येथील जय प्रकाश यांचा समावेश आहे. ◀(वृत्तसंस्था)

## 'व्हॉट्सअ‍ॅप युनिव्हर्सिटी' वगळता सर्व मतांचा आदर

### शबरीमला प्रकरणी सर्वोच्च न्यायालयाची टिप्पणी

◆ **नवी दिल्ली, २३ एप्रिल**

सर्व नामवंत लेखक आणि विचारवंतांच्या मतांचा आपण आदर करतो. परंतु, 'व्हॉट्सअ‍ॅप युनिव्हर्सिटी'कडून आलेली माहिती आपण स्वीकारू शकत नाही, अशी टिप्पणी सर्वोच्च न्यायालयाने गुरुवारी केली.



केरळमधील शबरीमला मंदिरासह विविध धार्मिक स्थळांवर महिलांवर होणारा भेदभाव तसेच अनेक पंथांकडून आचरणात आणल्या जाणाऱ्या धार्मिक स्वातंत्र्याची व्याप्ती व कक्षा यासंबंधिच्या याचिकांवर सुनावणी करताना नऊ न्यायमूर्तींचा समावेश असलेल्या घटनापीठाने हे निरीक्षण नोंदवले.



या घटनापीठात सरन्यायाधीश सूर्य कांत, न्या. बी. व्ही. नागरत्ना, न्या. एम. एम. सुंदरेश, न्या. अहसानुद्दीन अमनुल्ला, न्या. अरविंद कुमार, न्या. ऑगस्टिन जॉर्ज मसिह, न्या. प्रसन्न बी. वराळे, न्या. आर. महादेवन् आणि न्या. जॉयमाल्या बागची यांचा समावेश आहे.

दाऊदी बोहरा समाजाच्या प्रमुखांच्या वतीने बाजू मांडताना, ज्येष्ठ वकील नीरज किशन कौल यांनी काँग्रेस नेते शशी थरूर यांनी लिहिलेल्या एका लेखाचा संदर्भ दिला. या लेखात धार्मिक दिलाशाशी संबंधित बाबींमध्ये न्यायिक संयमाची चर्चा करण्यात आली होती. आम्ही नामवंत व्यक्ती, कायदेतज्ज्ञ इत्यादींचा आधर करतो. परंतु, वैयक्तिक मत हे वैयक्तिकच असते, असे सरन्यायाधीश सूर्य कांत यांनी या टप्प्यावर म्हटले. कोणतेही विद्यापीठ चांगले किंवा वाईट, या भानगडीत पडत नाही. या चर्चेच्या दृष्टीने ती बाब खरोखरीच नगण्य आहे. मुद्दा केवळ इतकाच आहे की, ज्ञान आणि माहिती मग कुठूनही येत असो, त्याचा स्वीकार केला पाहिजे, असे कौल म्हणाले. ◀(वृत्तसंस्था)

### सर्व स्रोतांकडून ज्ञान ग्रहण करण्यात हरकत नाही

सर्व स्रोतांकडून ज्ञान ग्रहण करण्यात काहीच हरकत नाही, असे कौल म्हणाले. जर ज्ञान आणि शहाणपण कोणत्याही स्रोताकडून, कोणत्याही देशाकडून किंवा कोणत्याही विद्यापीठाकडून येत असेल, तर त्याचे स्वागतच केले पाहिजे. एक संस्कृती म्हणून आपण इतके समृद्ध आहोत की, ज्ञानाचे आणि माहितीचे सर्व प्रकार स्वीकारण्यात आपण मागे राहता कामा नये, असे कौल म्हणाले. न्या. नागरत्ना यांनी त्यावर हलक्या-फुलक्या शैलीत म्हटले की, पण व्हॉट्सअ‍ॅप युनिव्हर्सिटीकडून नाही. त्यावर कौल यांनी आपण त्या भानगडीत पडणार नसल्याचे सांगितले. ■



'ए नाईट विथ रनवे: दि डेव्हिल विअर्स प्राडा' या चित्रपटाचा प्रिमियर शो लंडनमधील 'नॅशनल गॅलरी'मध्ये पार पडला. 'फोटो कॉल' या सत्रात सहभागी झालेल्या अभिनेत्री एमिली ब्लंट आणि ॲनी हॅथवे. चित्रपट १ मे २०२६ रोजी प्रदर्शित होणार आहे

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



## अग्रलेख...

# ‘सामूहिकते’कडून ‘वैयक्तिकते’कडे

शहरांच्या गजबजाटात एक दृश्य अलिकडे वारंवार दिसू लागले आहे. रस्त्यावरील आंदोलने, त्यामुळे ठप्प झालेली वाहतूक आणि त्या कोंडीत अडकलेला संतप्त नागरिक. मुंबईत अलिकडेच ते पाहावयास मिळाले. भारतीय जनता पार्टीच्या महिला कार्यकर्त्यांनी आंदोलन केले. संसदेत महिला आरक्षणासंबंधीच्या एका घटनादुरुस्ती प्रस्तावास विरोधकांच्या इंडिया आघाडीने विरोध केल्यामुळे दोन तृतीयांश बहुमताचे संख्याबळ प्रस्तावाच्या बाजूने उभे करण्यात सत्तारूढ भाजपला यश आले नाही आणि तो प्रस्ताव नामंजूर झाला. विरोधकांचा निषेध करण्यासाठी महाराष्ट्रात भाजपप्रणीत महायुतीच्या वतीने जागोजागी आंदोलने करण्याचे स्वतः मुख्यमंत्र्यांनी जाहीर केले होते. मुंबईतील या आंदोलनाला अनपेक्षित कारणामुळे वेगळेच वळण लागले. आंदोलनामुळे निर्माण झालेल्या वाहतूक कोंडीत अडकलेल्या एका महिलेने संतापाच्या भरात असंसदीय शब्दांचा वापर करत संतप्त प्रतिक्रिया दिली. व्यक्तिगत समस्येत वाहतूक कोंडीची भर पडल्यामुळे काहीशा त्रस्त झालेल्या त्या महिलेचा संताप रास्त असेलही, परंतु सार्वजनिक ठिकाणी एका महिलेकडून सरकार किंवा आंदोलनकर्त्यांबाबत उघडपणे व्यक्त होणाऱ्या विचारांची सभ्यता हा प्रश्न मात्र उरतोच. याआधी मुंबईत आणि इतरत्रही वेगवेगळ्या प्रश्नांवर तीव्र सामाजिक प्रतिक्रिया उमटल्या आहेत. प्रसंगी रस्त्यावर उतरून आपल्या भावनांना वाट करून देणे हा लोकशाहीने दिलेला सामाजिक हक्क आहेच. याआधी असे असंख्य मोर्चे, आंदोलने यामुळे वाहतूक कोंडीचा अनुभवही अनेकदा येतच होता आणि त्यामुळे होणाऱ्या गैरसोयींचादेखील मुंबईच्या जनजीवनाने अनेकदा अनुभव घेतलेला आहे. कोणत्याही समस्येबाबत जनतेचे किंवा सरकारांचे लक्ष वेधून घेण्यासाठी केली जाणारी आंदोलने ही समाज जागृत असल्याची लक्षणे असतात. त्यामुळे अशा आंदोलनांत प्रत्यक्षपणे सहभागी होणे किंवा सहभागी न होता आंदोलनकर्त्यांच्या भावना समजून घेत त्यास पाठिंबा देणे हे सजग समाजाचे कर्तव्यच मानले जाते. मात्र, रस्त्यावरील आंदोलनांच्या प्रदीर्घ इतिहासात बहुधा पहिल्यांदाच एका व्यक्तीने थेट रस्त्यावर उतरून आंदोलनाविषयीच व्यक्त केलेल्या निषेधाच्या भावनांमुळे आता या घटनेमागच्या काही पैलूंचा आढावा घेणे आवश्यक आहे.

महाराष्ट्रात आंदोलनांची परंपरा जुनी आहे. मुंबई, पुणे, नागपूर यासारख्या शहरांनी मोर्चे, बंद, रास्ता रोको या लोकशाही मार्गाने व्यक्त होणाऱ्या अभिव्यक्तीचे आविष्कार वारंवार अनुभवले आहेत. एकेकाळी अशा आंदोलनांकडे सहानुभूतीने पाहिले जात असे. कारण आंदोलन करणारे आणि त्रास सहन करणारे, दोघेही कुठल्या तरी व्यापक सामाजिक किंवा राजकीय उद्दिष्टाचे भागीदार असत. ‘आपल्यासाठीच हा लढा’ ही भावना त्या काळात ठळक होती. ही भावना काळासोबत बदलत गेली. कोणे एके काळी, मुंबईच्या रस्त्यांवरून गिरणी कामगारांचे लाखोंचे मोर्चे निघत असत. या मोर्चातील मागण्यांशी या वर्गापलीकडच्या समाजाचे तसे काहीच देणेघेणे नव्हते. तरीही गिरणी कामगार हा समाजाचाच एक घटक असल्याने त्याच्या अडचणीच्या काळात समाजही त्याच्यासोबत असल्याची भावना अशा अप्रत्यक्ष सहभागातून व्यक्त होत असे. उदारीकरणानंतर मात्र हे चित्र बदलत गेले आणि भारतातील समाजजीवनाची दिशादेखील बदलत गेली. वेग, स्पर्धा, वेळेचे महत्त्व या सर्वांचा मेळ घालत घड्याळाच्या काट्यासोबत धावण्याचा वेगवान स्पर्धेत शहरी जीवनशैली पुरती बदलली. रोजच्या धकाधकीत वेळेचे नियोजन हाच जीवनाचा केंद्रबिंदू बनला आणि समाजकेंद्रित जीवनशैली नकळत व्यक्तिकेंद्रित होऊ लागली. अशा परिस्थितीत, अचानक उभे राहणारे आंदोलन आणि त्यातून निर्माण होणाऱ्या वाहतूक कोंडीसारख्या समस्येचा विचार करताना, ती केवळ व्यक्तीच्या दैनंदिन आयुष्यावर परिणाम करणारी घटना आहे, असा विचार रुजत चालला आहे. त्यामागच्या सामूहिक भावनांचे महत्त्व कमी होत आहे. वस्तुतः, मुंबईत वाहतूक कोंडी ही काही अपवादात्मक स्थितीतच उद्भवणारी समस्या नाही. जवळपास रोजच मुंबईत आणि आता तर राज्यातील अन्य अनेक महानगरांत वा शहरांत ही समस्या उग्र होत आहे. अशा वेळी त्यात फसलेल्या ताटकळणाऱ्या माणसाला सहनशील राहावेच लागते. त्याच्या व्यक्तिगत समस्या कितीही तीव्र असल्या, तरी नेहमीच्या कोंडीत गुरफटल्यावर त्याला नाईलाजाने त्यास तोंड द्यावे लागते. आंदोलनांसारख्या कारणांमुळे होणाऱ्या वाहतूक कोंडीला मात्र वेगळे रंग चिकटतात आणि जी समस्या सहसा सामाजिक जाणिवांच्या भावनेने समजून घेतली जाते, त्याचेही राजकारण सुरू होते. याच सामाजिक बदलत्या संदर्भात, मुंबईतील त्या आंदोलनामुळे झालेल्या वाहतूक कोंडीमुळे संतप्त होऊन थेट असंसदीय शब्दांत आंदोलकांवर-नेत्यांवर-पोलिसांवर शाब्दिक चिखलफेक करणाऱ्या त्या महिलेची भावनाही समजून घ्यावीच लागेल. कोणत्याही प्रश्नावर आंदोलन करण्याचा समाजाचा हक्क मान्य असला, तरी त्याची किंमत सामान्य नागरिकाने का मोजावी, हा प्रश्न आता अधिक तीव्रतेने पुढे येत असल्याचे हे लक्षण आहे. सरकारच्या वतीने या मोर्चाशी संबंधित असलेल्या नेत्यांनी याच जाणिवेने तिच्या संतप्त भावना समजून घेतल्या आणि या महिलेस सहन कराव्या लागलेल्या गैरसोयीबद्दल दिलगिरीदेखील व्यक्त केली. समाजाच्या जाणिवांबाबतचा असा समंजसपणा सहसा अभावानेच दाखविला जाण्याचा जमाना असताना, मंत्री गिरीश महाजन आणि मुंबईच्या महापौर रितू तावडे यांनी दिलगिरी व्यक्त करून त्या महिलेची माफीदेखील मागितली. पण प्रश्न तेवढ्यापुरताच मर्यादित नाही. या घटनेतून उमटणारा सामाजिक अन्वयार्थ अंतर्मुख करावयास लावणारा आहे. सामूहिक समस्यांचा सामना करताना संघटितपणे एकमेकांसोबत जाण्याची संस्कृती असलेला समाज ‘सामूहिकते’कडून ‘वैयक्तिकते’कडे सरकत आहे, असे ही घटना सांगते. पूर्वी व्यापक हितासाठी वैयक्तिक त्रास सहन करण्याची लोकांची तयारी होती; आता वैयक्तिक सोय आणि वेळ यांना प्राधान्य दिले जाते. ही बदलती प्राधान्ये आंदोलनांच्या स्वीकारार्हतेवर परिणाम करत आहेत. कोणताही राजकीय पक्ष असो किंवा सामाजिक, धार्मिक समाजसमूह असो, रस्ते अडवून, जनजीवन विस्कळीत करून लोकांचे लक्ष वेधून घेण्याची पारंपरिक पद्धत आता उलट परिणाम करू शकते, हा देखील या घटनेचा सांगावा. लोकांचे समर्थन मिळवण्याऐवजी त्यांचा रोष ओढवून घेण्याचा धोका वाढतो आहे. अशा रोषाची ताकद आंदोलनांहून अधिक असेल तर ते आंदोलनच लोकविरोधी ठरविले जाऊ शकते. त्याचा तोटादेखील होऊ शकतो.

भाजपने आयोजित केलेल्या या आंदोलनाच्या निमित्ताने आणखी काही बाबीदेखील समोर आल्या आहेत. अशा आंदोलनांकरिता रीतसर परवानगी घ्यावी लागते आणि परवानगी देणाऱ्या यंत्रणांना त्यानुसार मार्ग, वेळ, पर्याय यांचे नेमके नियोजन करावे लागते. आंदोलनांना परवानगी देताना, पर्यायी मार्गांची आखणी, वाहतूक व्यवस्थापन आणि नागरिकांना पूर्वसूचना या बाबी काटेकोरपणे राबवणे आवश्यक आहे. तसे करणे ही जबाबदारी संबंधित प्रशासकीय यंत्रणांना टाळता येत नाही. ते झाले नाही, तर मात्र लोकशाही हक्क आणि नागरिकांचे दैनंदिन हक्क यांच्यातील संघर्ष तीव्र होण्याचे प्रसंग निर्माण होऊ शकतात. भाजपच्या आंदोलनावेळी असेच काही झाले असेल, तर संबंधित यंत्रणांच्या जबाबदारीवर प्रश्नचिन्हे उमटणे अपरिहार्य आहे. आंदोलकांनी त्यासाठी समाजाची माफी मागितली आहे. संबंधित महिलेसमोर दिलगिरीही व्यक्त केली आहे. आता आयोजनातील त्रुटींबाबत संबंधित यंत्रणांना नेमका आढावा घ्यावा लागेल आणि तशा त्रुटी स्पष्ट झाल्यास त्याची जबाबदारीदेखील घ्यावी लागेल. असे केल्यास समाज आणि संबंधित यंत्रणा यांच्यातील परस्पर विश्वासाचे नाते अधिक मजबूत होण्यास मदतच होईल. कारण अशी कोणतीही घटना ही यापुढच्या काळात केवळ एका क्षणिक संतापाची नोंद असणार नाही. ती बदलत्या शहरी जीवनशैलीचे प्रतिबिंब असणार आहे. आंदोलनांची गरज आणि नागरिकांची सोय या दोन टोकांमध्ये संतुलन साधणे हे यापुढे मोठे आव्हान ठरणार आहे. हे संतुलन साधले नाही, तर आंदोलनांची धार बोथट होईल आणि समाज व व्यवस्था हाताळणाऱ्या यंत्रणा यांमधील दुरावा मात्र, नाहक वाढीस लागेल.

---

## अर्थविशेष

**हितेश पारसे**

# नातेवाईकांकडून मिळालेल्या भेटवस्तू करमुक्त की करपात्र?

भारतीय कुटुंब व्यवस्थेमध्ये ‘भेट देणे’ ही केवळ आर्थिक देवाणघेवाण नसून प्रेम, विश्वास आणि नात्यांची अभिव्यक्ती आहे. मुलांच्या शिक्षणासाठी पालकांकडून मदत, विवाहाच्या वेळी मिळणाऱ्या भेटी किंवा कुटुंबामध्ये मालमत्तेचे हस्तांतरण हे सर्व व्यवहार आपल्याला अगदी नैसर्गिक वाटतात. मात्र, आयकर कायद्याच्या दृष्टीने पाहिले तर ही बाब इतकी सोपी नाही. अनेक वेळा लोक ‘घरगुती व्यवहार आहेत’ या समजुतीतून दुर्लक्ष करतात आणि नंतर मोठ्या करदायित्वाला सामोरे जावे लागते. म्हणूनच ‘निर्दिष्ट नातेवाईक’ ही संकल्पना समजून घेणे अत्यावश्यक आहे.

‘निर्दिष्ट नातेवाईक’- काय सांगतो आयकर कायदा?

आयकर कायद्याच्या कलम ५६(२)(X) नुसार, जर एखाद्या व्यक्तीला रोख रक्कम, दागिने, शेअर्स किंवा मालमत्ता भेट म्हणून मिळाली, तर ती रक्कम साधारणपणे ‘इतर स्रोतांकडून मिळणारे उत्पन्न’ म्हणून करपात्र ठरते. परंतु, यामध्ये एक महत्त्वाचा अपवाद आहे- जर ही भेट ‘निर्दिष्ट नातेवाईक’कडून मिळाली असेल, तर ती पूर्णपणे करमुक्त असते, रक्कम कितीही असो.

**कोण आहेत हे ‘निर्दिष्ट नातेवाईक’?**

कायद्यानुसार खालील नातेवाईकांकडून मिळालेल्या भेटींवर कर लागत नाही : पती किंवा पत्नी, आई-वडील, भाऊ-बहीण, मुलगा-मुलगी, सून-जावई, नातू-नात, तसेच आजी-आजोबा हे सर्व यात येतात. याशिवाय सासरे-सासू, तसेच आई-वडिलांच्या बाजूचे नाते- जसे काका, मामा, मावशी, आत्या-यांचाही यात समावेश आहे. म्हणजेच, या नातेवाईकांकडून मिळालेली भेट- ती रोख, ज्वेलरी किंवा प्रॉपर्टी असो- करमुक्त आहे.

**पण सर्व नातेवाईक यात येत नाहीत!**

इथेच सर्वांत मोठी चूक होते. चुलत भाऊ-बहीण, मित्र, दूरचे नातेवाईक किंवा व्यावसायिक संबंध- हे ‘निर्दिष्ट नातेवाईक’मध्ये येत नाहीत. अशा व्यक्तीकडून एका वर्षात रु. ५०,००० पेक्षा जास्त भेट मिळाली, तर : संपूर्ण रक्कम करपात्र होते. ही बाब अनेकांना माहीत नसते आणि नंतर नोटीस येते.



**मालमत्ता व्यवहारात विशेष नियम**

प्रॉपर्टी व्यवहारात कर परिणाम अधिक गंभीर असतात. जर तुम्ही प्रॉपर्टी कमी किमतीत घेतली आणि तिची मुद्रांक शुल्क मूल्य जास्त असेल, तर त्या फरकावर आयकर लागू होतो. उदाहरणार्थ, रु. ६० लाख किमतीची प्रॉपर्टी रु. ४० लाखांत घेतली, तर रु. २० लाख हा फरक करपात्र ठरू शकतो- जोपर्यंत व्यवहार निर्दिष्ट नातेवाईक सोबत नाही.

**गिफ्ट डीड- का आणि कधी आवश्यक?**

कायद्याने प्रत्येक भेटीसाठी गिफ्ट डीड- आवश्यक नसले तरी प्रत्यक्षात ते अत्यंत महत्त्वाचे आहे. प्रॉपर्टीच्या बाबतीत तर गिफ्ट डीड- आणि त्याची नोंदणी अनिवार्य आहे. रोख किंवा इतर भेटींमध्येही, मोठ्या रकमेच्या व्यवहारासाठी गिफ्ट डीड- केल्यास भविष्यातील कर वाद टाळता येतात. योग्य दस्तावेज नसल्यास आयकर विभाग व्यवहाराला ‘उत्पन्न’ किंवा ‘कर्ज’ मानू शकतो.

**क्लबिंग तरतुदी - दुर्लक्षित पण महत्त्वाचा मुद्दा**

भेट करमुक्त असली तरी त्यातून निर्माण होणारे उत्पन्न करमुक्त असेलच असे नाही. उदाहरणार्थ, पतीने पत्नीला पैसे दिले आणि त्या पैशातून व्याज किंवा नफा मिळाला, तर ते उत्पन्न पतीच्या नावावर करपात्र होऊ शकते. यामुळे ‘कर नियोजन’ करताना ही बाब लक्षात घेणे अत्यावश्यक आहे.

**सर्वसाधारण चुका**

- सर्व नातेवाईक करमुक्त आहेत असा गैरसमज
- गिफ्ट डीड न करणे, - रोख व्यवहार करणे
- कमी किमतीत प्रॉपर्टी व्यवहार करून कर दुर्लक्ष करणे
- आय. टी. आर. मध्ये योग्य प्रकटीकरण न करणे

**वारंवार विचारले जाणारे प्रश्न**

१. मित्राकडून रु. १ लाख भेट मिळाली तर काय? रु. ५०,००० पेक्षा जास्त असल्याने पूर्ण रु. १ लाख करपात्र

२. वडिलांकडून रु. १० लाख मिळाले तर? पूर्णपणे करमुक्त, कारण ते निर्दिष्ट नातेवाईक आहेत

३. चुलत भावाकडून पैसे मिळाले तर? चुलत भाऊ हा निर्दिष्ट नातेवाईक नाही रु. ५०,००० पेक्षा जास्त असल्यास करपात्र

४. विवाहात मिळालेल्या भेटींवर कर लागतो का? नाही, विवाहाच्या वेळी मिळालेल्या सर्व भेटी करमुक्त

५. गिफ्ट डीड नसल्यास काय समस्या होऊ शकते? आयकर सूचना आल्यास स्रोत सिद्ध करणे कठीण. व्यवहार उत्पन्न म्हणून कर होऊ शकतो

६. मालमत्ता भेट केल्यास कर लागतो का? निर्दिष्ट नातेवाईकाकडून असल्यास करमुक्त. अन्यथा मुद्रांक शुल्क मूल्य लागू

७. पत्नीला पैसे दिल्यास कर लागतो का? भेट करमुक्त, पण त्यातून मिळणारे उत्पन्न पतीच्या नावावर कर होऊ शकते

**निष्कर्ष** : नातेवाईकांमधील व्यवहार हे भावनिक असले तरी आयकर कायद्यात ते अत्यंत तांत्रिक पद्धतीने पाहिले जातात. योग्य माहिती असल्यास आपण कायदेशीररीत्या कर वाचवू शकतो, परंतु चुकीची समजूत मोठ्या आर्थिक नुकसानीचे कारण ठरू शकते. त्यामुळे प्रत्येक व्यवहारापूर्वी एकच गोष्ट तपासा- ‘ही व्यक्ती निर्दिष्ट नातेवाईक आहे का?’

९०९६३३२३५३

(लेखक कर व मालमत्ता हस्तांतरण सल्लागार आहेत.)

---

## वेध

**प्रफुल्ल व्यास**

# शाळा आणि अवकळा

गेल्या दोन दशकांत शिक्षण क्षेत्रात एक मोठा बदल घडत गेला आहे. गावातील जिल्हा परिषद शाळांपासून पालकांचा कल शहरात वा गावातील खाजगी शाळांकडे वळू लागला. खाजगी शाळांची चकाकी, इंग्रजी माध्यमाचा गवगवा, आधुनिक सुविधांमुळे त्या आकर्षण ठरत गेल्या. या सर्व घडामोडीत शिक्षणाचे मूळ ध्येय कुठेतरी हरवत चालले आहे. खाजगी शाळांची वाढ ही केवळ शिक्षणाच्या गरजेतून झाली नाही तर त्याला व्यावसायिकतेची किनार लागल्याचे वास्तव नाकारता येत नाही. ‘शिक्षण’ आणि ‘सेवाभाव’ हे सूत्र आता बदलून गेले आहे. प्रवेश फी, डोनेशन, वार्षिक शुल्क, वह्या-पुस्तकांचे बंडल, युनिफॉर्म, ट्रान्सपोर्ट□या खर्चाने सामान्य पालकांचे कंबरडे मोडते. त्या बदल्यात मिळणाऱ्या शिक्षणाची गुणवत्ता तितकीच उच्च असते असे नाही. (त्याला काही शाळा नक्कीच अपवादही आहेत.) शाळाही आता पालकांसाठी ‘स्टेटस’ झाल्या आहेत. काही खाजगी शाळा आपले संस्कृतिमूल्य अबाधित ठेवण्याचा कसोशीने प्रयत्न करीत आहेत. विद्या भारतीसोबत संलग्न असलेल्या शाळांनी सेवाभाव जोपासला आहे. इंग्रजी म्हणजेच गुणवत्ता, असा एक गैरसमज पालकांच्या मनात पेरला गेला. व्हॅनने जाणारी लहान मुले हे आजचे सामान्य दृश्य झाले आहे.

जवळपास २५ वर्षांपूर्वी जिल्हा परिषदेच्या शाळांना उतरती कळा लागली होती. त्याकाळी धरून बांधून शिक्षक झालेले त्याला कारणीभूत होते. ते आता निवृत्त होत आहेत. आता ‘गुरुजी’पासून ‘सर’ झालेल्या पिढीने चमत्कारिक बदल घडवलेला आहे. जिल्हा परिषदेच्या शाळांनी कात टाकली आहे. ‘मुख्यमंत्री माझी शाळा’ अभियानात अनेक शाळांनी प्रथम क्रमांक पटकावला आहे. वर्धा जिल्ह्यातील एका जिल्हा परिषदेच्या एकाच शाळेतील तब्बल ९ विद्यार्थ्यांची नवोदय विद्यालयात स्पर्धा परीक्षेच्या माध्यमातून निवड झाली आहे. वर्धा जिल्ह्यातील काही जिल्हा परिषद शाळांतील विद्यार्थी इस्रोची सहल करून आले आहेत. पुढील वर्षीपासून राज्यातील जिल्हा परिषदेच्या शाळांतील विद्यार्थी ‘नासा’त जातील असा विश्वास शिक्षण राज्यमंत्री डॉ. पंकज भोयर यांनी दिला. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी त्यासाठी भरघोस निधीचीही तरतूद केली आहे. मात्र, खाजगी शाळेतील काचेच्या लखलखत्या इमारतींना पाहून पालकाही बळी पडत आहेत. दुसरीकडे जि. प.च्या शाळांकडे अजूनही शासनाचे पाहिजे त्या प्रमाणात लक्ष नाही. कोणत्याही गोष्टीत स्पर्धा असावी लागते. काही वर्षांपूर्वीपर्यंत जि. प.च्या शाळांना स्पर्धाच नव्हती. त्यामुळे खाजगी शाळांचे भाव वधारले होते. आता जि. प.च्या शाळांची परिस्थिती सुधरली आहे. पण, पालकांचा या शाळांवर विश्वास बसायला असून वेळ लागेल. त्यासाठी शिक्षकांनी स्वतःची मुलं, जिल्हाधिकारी, पोलिस अधीक्षक, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी, न. प.चे अधिकारी, डॉक्टर, इंजिनीअर, लोकप्रतिनिधींची मुलं, एकंदरीत सरसकट शासकीय अधिकाऱ्यांची मुलं जिल्हा परिषदेच्या शाळांमध्ये प्रवेश घेते होणार नाहीत तोपर्यंत सामान्य नागरिकांचा जि. प. शाळांवरचा विश्वास दृढ होणार नाही. शाळांच्या इमारतीही खाजगीच्या तुलनेत प्रशस्त कराव्या लागतील. काही ठिकाणी शिक्षक स्वतःच्या खिशातून पैसे खर्च करून शाळेचे रूपडे पालटताना दिसतात. मात्र, या सगळ्या सकारात्मक बदलांवर एक मोठी सावली आहे □ती म्हणजे शिक्षकांवर लादले जाणारे अतिरिक्त काम. त्यामुळे जि. प.च्या शाळांतील शिक्षकांना शिकवायला वेळ कमी मिळतो. अनेक शाळांमध्ये आजही शिक्षकही नाहीत. अगदी गुरुवारचे ताजे उदाहरण घेतल्यास येत्या रविवारी शिष्यवृत्ती परीक्षा असल्याने जि. प.चा एक शिक्षक सकाळी शाळेत पोहोचला. गावातील विद्यार्थ्यांचा सराव घेऊन दुपारी जनगणनेच्या प्रशिक्षणासाठी गेला. शिक्षकांकडून करवून घेतली जाणारी कामे ही भारतीयत्वाचेच आहेत, यात शंका नाही. परंतु, विद्यादानाला त्यांना वेळ पुरेसा नाही. मात्र, ज्या शाळेत मुख्याध्यापक नाही त्या जि. प.च्या शाळा चांगल्या सुरू असल्याचा अनुभव अनेक शिक्षकांनी व्यक्त केला. अलिकडच्या काळात लोकप्रतिनिधी शाळांना शैक्षणिक साहित्य भेट देतात. परंतु, काही जि. प.च्या शाळांमध्ये शैक्षणिक साहित्य धूळ खात पडले आहे. खाजगी शाळांच्या आकर्षक इमारती, स्मार्ट क्लासरूम, एसी बस, विविध ॲक्टिव्हिटी□या सगळ्यांचा मोठा गाजावाजा केला जातो. पण शिक्षणाच्या गुणवत्तेचा मापदंड सुविधा ठरत नाहीत. खाजगी शाळा पूर्णपणे वाईट आणि जि. प.च्या शाळा पूर्णपणे चांगल्या असं सरसकट म्हणता येणार नाही. दाबून शिक्षण शुल्क घेणाऱ्या खाजगी शाळांवर नियंत्रणही ठेवण्याची गरज आहे. खाजगी शाळांमध्ये बालकांच्या शिक्षणाच्या हक्क अंतर्गत विद्यार्थ्यांना प्रवेश दिला. मात्र, त्याचे करोडोच्या घरात असलेले पैसे खाजगी शाळांना मिळालेच नाहीत. ‘मार्क’ आणि ‘गुण’ असाच फरक खाजगी ‘शाळा’ आणि ‘शासकीय’मध्ये आहे. दोन्ही शाळांमधून देशाच्या उज्ज्वल भविष्याचा वेध घेणारे विद्यार्थी घडावे...

९८८१९०३७६५

---

## प्रासंगिक

**प्रा. डॉ. सुधाकर इंगळे**

# संत रविदास समरसतेचे प्रतीक

भारतभूमीला संत परंपरेचा अमूल्य वारसा लाभलेला आहे. संत रविदास १४-१५ व्या शतकातील, भारतातील एक महान संत कवी व समाज सुधारक होते. १ फेब्रुवारी २६ ला त्यांचे ६५० वे जयंती वर्षं सुरू झाले आहे. हा दिवस केवळ जयंती साजरी करण्याचा नाही तर मानवतेचा, समतेचा, समरसतेचा पुनरुच्चार करण्याचा दिवस आहे. कारण आपण सर्व स्मरण करीत आहोत अशा मानवाचे जे संत रविदास, समरसतेचे जिवंत प्रतीक आहेत.

संत रविदास यांचा जन्म वाराणसी जवळील मांडुर या गावात झाला त्यांच्या आईचे नाव करमादेवी व वडील रघुराम. संत रविदास महाराज यांचा १ फेब्रुवारी हा दिवस जयंतीचा तर तिथीनुसार माघ पौर्णिमा. त्या काळात जन्मतारखेची नोंद केली जात नसे. त्यामुळे जन्मतारखेच्या बाबतीत मतभिन्नता आहे. संत करमदासजी यांनी संत रविदास यांचा जन्म माघ पौर्णिमा संवत १४३३ इसवी सन १३७६ निश्चित केलेला आहे. श्री रामचंद्र कुरील यांनी जन्म संवत १४७१ इसवी सन १४१४ निश्चित केला आहे. कारण त्यावर्षी माघ पौर्णिमेला रविवार आला आहे. परंतु चर्मकार संतांचे सांगण्यानुसार संत रविदासांची जन्मतिथी १४३३, माघ पौर्णिमा मानली जाते व त्या तिथीला रविदासांची जयंती साजरी केली जाते. संत करमदासजी यांनी याचा उल्लेख पुढील दोह्यात केला आहे.

**चौदासौ तैतीस की । माघ सुदी पंदरस।**
**दुखियन के कल्याण हित, प्रगटे श्री रविदास।**

या तिथीच्या आधारावर देशभरातील संत रविदास मंदिरांमध्ये, धार्मिक स्थळांवर दरवर्षी उत्सव साजरे केले जातात. संत रविदास यांनी विविध प्रदेशात भ्रमण केले आहे. त्यामुळे वेगवेगळ्या भागात त्यांच्या नावाची विविध रूपे प्रचलित झालीत. रविदास, रेदास, रामदास, रोहिदास, रुद्रास, हरिदास इत्यादी. महाराष्ट्रात त्यांना रोहिदास तर प्रयाग परिसरात रेदास या नावाने ओळखले जाते. संत अभ्यासकांच्या मते त्यांचे मूळ नाव रविदास हेच आहे.

रविदासांचे आई, वडील व परिवारातील लोक सात्त्विक वृत्तीचे होते. अशा परिवारात, वातावरणात पालनपोषण झाल्याने त्यांचे मन भक्तिमार्गाकडे वळले. त्यांना भक्तीचे वेड लागले, त्यामुळे आई, वडील चिंताग्रस्त झाले. तेव्हा त्यांनी रविदासांना आपल्या वडिलोपार्जित व्यवसायाच्या कामात गुंतविले. परंतु रविदासाचे परमेश्वरभक्तीचे वेड कमी न होता वाढतच गेले. बालपणी रविदासांच्या विचारांना आकाराला होता. त्यामुळे उच्च-नीच, जात-पात विषमता या गोष्टी रविदासांना खटकू लागल्या होत्या.



वयाच्या तेराव्या वर्षी रविदास यांचा विवाह लोना नावाच्या मुलीशी झाला. पुढे त्यांना विजयदास नावाचा मुलगा झाला. रविदास गृहस्थ धर्मात होते. पण त्यांनी स्वार्थ कधीचाच सोडला होता. हाताने चप्पल बनवत असताना मुखाने रामनामाचा जप चालू असायचा. एखाद्या साधुसंताकडे पैसे नसतील तर रविदास फुकट चपलेचा जोड त्यांना देऊन टाकायचे .त्यामुळे संसार आणि व्यवसाय दोन्ही उघड्यावर येतील अशी परिस्थिती निर्माण झाली. रविदासांच्या वडिलांनी त्यांना घरातून काढून दिले. पण म्हणून रविदासांनी भक्तिमार्ग सोडून दिला नाही.

रविदास म्हणतात-

**अब कैसे छूटे राम नाम रट लागी।**
**प्रभु जी, तुम चंदन हम पानी जाकी, अंग अंग बास समानी।**
**प्रभु जी, तुम घन बन मोरा जैसे, चितवत चंद चकोरा।**
**प्रभुजी, तुम दीपक हम बाती जाकी, ज्योति बरे दीन राती।**
**प्रभुजी तुम मोती हम धागा, जैसे सोनाहे मिलत सुहागा।**
**प्रभुजी, तुम स्वामी हम हम दासा, ऐसी भक्ती करे रेदासा।**

भक्तिमार्ग हा ईश्वरांच्या थेट जवळ जातो म्हणून संत रविदासांच्या प्रत्येक वाक्यात ते थेट देवाशी संवाद करतात.

संत रविदास यांनी स्वतः स्पष्टपणे स्वीकारले होते की, ते चर्मकार जातीचे आहेत. त्यांनी आपल्या वाणीतून ते ठामपणे मांडले आहे. त्यांच्या एका रचनेत ते म्हणतात.

**सूरसी जल किया क्रीत बारूनी, रे, जिसे संत जन कर नहीं पान ।**
**सुर अपवित्र नीति गंगा जल मानिऐ, सुरसरी मिलत नही होत आन ॥**
**तर तारी अपवित्र करि मानिऐ, जैसे कागरा करत विचार ॥**
**भगत भगवंत जब ऊपर लेखीए, तब पुजीए करी नमस्कार ॥**
**अनेक अधम जीव नावं गुनी उधारि, पतित पावल भए परसी सार ॥**
**भनत रेदास ररंकार गुण गावत, संत साधू भऐ सहजी पार ॥**

ते स्पष्टपणे सांगतात की सर्व मानव एकाच देह धर्माने बनलेले आहेत. त्वचा, मांस, रक्त यामुळे कोणीही जन्मतः श्रेष्ठ-कनिष्ठ ठरत नाही.

गुरू ग्रंथ साहिबमध्ये संत रविदासांची चाळीस पदे आहेत. ते हिंदू संत असतानाही शिखांच्या धर्मग्रंथात त्यांच्या रचनांना मानाचे स्थान मिळाले, याचाच अर्थ त्यांच्या दोह्यांमधला भावार्थ हा हिंदू धर्मापुरता संकुचित नव्हता. ते मानवतावादी संत होते. त्यामुळेच गुरुनानक हे संत रविदासांची गीत भजने म्हणत असल्याचे संदर्भ आढळतात. संत रविदास संत कबीरांचे गुरुबंधू होते, स्वामी रामानंद त्यांचे गुरू. संत रविदासांच्या विचारांनी प्रेरित होऊन डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी ‘द अनटचेबल’ हा ग्रंथ संत रविदासांच्या चरणी अर्पण केलेला आहे.

संत रविदास महाराज यांचा जन्म समाजातील वंचित घटकांमध्ये झाला. तरीही त्यांनी कधीही परिस्थितीला दोष न देता मानवतेचा संदेश दिला. ‘‘मन चंगा तो कठौती मे गंगा’’, या त्यांच्या विचारातून अंत:करणाची शुद्धता हीच खरी भक्ती असल्याचे त्यांनी सांगितले. देवभक्ती ही केवळ कर्मकांडात नसून माणुसकीत आहे, हा संदेश त्यांनी समाजाला दिला. त्यांच्या भक्तांमध्ये समाजातील सर्व लोक होते. त्यात कोणताही भेद नव्हता. त्यामुळे संत रविदास महाराजांनी सामाजिक समरसतेचा पाया मजबूत केला.

सर्व माणसे समान आहेत. त्यांचा जन्म वंचित समाजात झाला होता, पण त्यांचे विचार संपूर्ण मानवजातीसाठी होते. त्यांनी देव मंदिरात नाही, तर माणसाच्या अंत:करणात आहे हे ठामपणे सांगितले. विषमतेमुळे देशाचे नुकसान होते व ते पाहूनच त्यांनी एकीचा संदेश दिला. ते कर्मकांडात अडकले नाहीत. कुठल्याही अंधश्रद्धेला ते बळी पडले नाहीत. ते म्हणतात- लहान मोठ्यांना अन्न, वस्त्र, निवारा समप्रमाणात मिळाला तर मी प्रसन्न होईल. स्वातंत्र्य, समता, बंधुता आणि समाजात एकी निर्माण व्हावी हेच विचार त्यांनी आयुष्यभर मांडलेत.

संत रविदास महाराज यांची ६५० वी जयंती साजरी करताना त्यांच्या विचारांचे पालन करणे हीच त्यांना खरी श्रद्धांजली ठरेल. जात, धर्म, भाषा या पलीकडे जाऊन माणूस म्हणून माणसाशी वागणे हाच संत रविदास महाराजांचा संदेश आहे. एक प्रार्थना आहे, ‘‘माणसाने माणसाशी माणसासम वागावे’’ हाच संदेश ते देतात म्हणून ते आजही आणि सदैव समरसतेचे प्रतीक राहतील. संत रविदास यांचा मृत्यू चितोडगड येथे इसवी सन १५२७ मध्ये झाला. काही लोक त्यांचा मृत्यू बनारस येथे झाला असे म्हणतात. त्यांच्या विचारांना कृतीत आणून आपण एक समताधिष्ठित समरस आणि मानवतावादी समाज घडवूया.

नागपूर

---

## समाधानी वृत्ती कमी झाली

समाधान ही वृत्ती असून, आपण ती स्वीकारली तर आयुष्य सुखी होते. परंतु या उलट असमाधानी वृत्ती संकटांना निमंत्रण देतेच पण आपण आपले आरोग्य, मानसिक शांती हरवून बसतो. प्रत्येक जण स्वतः आहे, त्या परिस्थितीत समाधानी नाही. प्रत्येकालाच सारखे काही ना काही हवे आहे. त्यासाठीच हा सर्व आटापिटा आणि शेवटी निराशाच पदरी पडते. गाडी, बंगला, पैसा असूनही लोक असमाधानी आहेत. प्रत्येकाला दुसऱ्यापेक्षा माझ्याकडे जास्त असावे असा हव्यास आहे. दोन भावंडात वारसा हक्काच्या संपत्तीवरून भांडणे आहेत. तुला जास्त, मला कमी यासाठी लाखो खटले न्यायालयात पडून आहेत. नात्यापेक्षा पैसा, संपत्ती महत्त्वाची झाली आहे. एवढ्यावरच हे थांबत नाही, तर दुसऱ्यांचे ओरबाडून घेण्यातही तात्पुरते समाधान मानणारेही महाभाग आहेत. आणि यातूनच जन्माला येते ती ईर्ष्या, द्वेष, हिंसा. जे दुसऱ्या जवळ आहे ते मलाच हवे अशी मानसिकता समाजाची झाली आहे. अशी कितीतरी उदाहरणे देता येतील की अशा असमाधानी मुलांनी पैशासाठी, संपत्तीसाठी आपल्या आई-वडिलांना ठार मारले किंवा घराबाहेर काढले. दुसऱ्या पक्षातील नेते आपल्याकडेच हवे, दुसरा पक्षच असू नये, आमचीच कायम सत्ता असावी. त्यासाठी दुसऱ्यांचे ओरबाडणे, त्यासाठी युक्त्या, क्लृप्त्या करणे. राज्या-राज्यांमधील पाण्यासाठीचे तंटे, सीमावाद ही सर्व असमाधानी वृत्तीची उदाहरणे आहेत. सध्या चालू असलेले अमेरिकन- इराण युद्ध हे देखील असमाधानी वृत्तीचे उत्तम उदाहरण आहे. क्षेत्रफळ मोठ्या असलेल्या अमेरिकेची लोकसंख्या मात्र भारताच्या तुलनेत अगदीच कमी आहे. अमेरिका अतिशय संपन्न देश आहे. सगळ्या जगाचा ओघ अमेरिकेकडे वाहतो आहे. सगळ्या क्षेत्रात प्रगती करूनही अमेरिका असमाधानी आहे. आखाती देशातील तेलावर नियंत्रण मिळवण्यासाठी इराणवर आक्रमण केले आणि स्वतःची पाठ थोपटून घेतली. इराण नमते घेत नाही म्हणून संपूर्ण इराणच नष्ट करू अशी धमकी सतत दिली जाते. म्हणजे अमेरिकेजवळ सर्व असूनही असमाधानी वृत्ती यातून दिसते आणि त्यासाठी कोणतेही क्रौर्य करण्याची मानसिकताही यातून दिसून येते आणि याचे परिणाम मात्र भयंकर होतील. म्हणजे माझं ते माझं आणि तुझं तेही माझं यामुळे संपूर्ण मानवी समाजच आपला आनंद, आपली आत्मशांती गमावून बसला आहे असे वाटते.

**माधवी पत्की**/नागपूर

## वाचक पत्रे

### फूटपाथवरची अतिक्रमणे

मुळात फूटपाथवर अतिक्रमणे महापालिका अधिकाऱ्यांच्या डोळ्यासमोर होतातच कशी, हा एक चिंतेचा विषय आहे. शहरातील रस्ते आज वाढत्या वाहतुकीला कमी पडतात, त्यात वाहनांची संख्या सारखी दरवर्षी वाढत आहे. भारतात ‘गरीबी’ वाढल्यामुळे बिचारे सायकलस्वार स्कूटर व दुचाकीचालक, कार (!) वापरायला लागले आहे.



त्यातच फूटपाथवर दुकाने सुरू झाल्यामुळे पायी चालणाऱ्यांची पंचाईत होते. फूटपाथवरच्या दुकानासमोर वाहने पार्क असल्यामुळे पायी जाणाऱ्यांना जीव मुठीत धरून रस्त्यावरून जावे लागते. अशातच स्कूटरवर जाणारे ‘बाईक बहाद्दर’ केव्हा ‘चाटून’ जातील सांगता येत नाही. ‘पायी चालणाऱ्यांचा रस्त्यावर पहिला हक्क असतो’, हे आपल्या देशात कुणी शिकवत नाही. यामुळे रस्त्यावरच्या अपघातात नाहक निर्दोष जीव जातात. सध्या नागपूर महापालिकेने अतिक्रमणाविषयी गंभीरतेने कारवाया सुरू केल्या आहेत, हे स्वागतार्ह आहे. पण अशा कारवाया नियमित सुरू असाव्यात, जेणेकरून ‘अतिक्रमणे हटविणे’, हे कालांतराने (बेपर्वाईचा काळ गेल्यावर) ‘कठीण कार्य’ होणार नाही. एखाद्या अतिक्रमणावर लगेच कारवाई झाली तरच बाकी नियम तोडणाऱ्यांना वचक बसेल. दुसरे अतिक्रमणाची वाट पाहत असणारे नियम तोडायची हिंमत करणार नाहीत व महापालिकेचे काम सोपे होईल.

अतिक्रमणे हटविण्याची मोहीम सुरू केल्याबद्दल नागपूरच्या महापौर व महापालिका आयुक्त यांचे अभिनंदन नागरिकांनी करायलाच हवे!

**गणेश हजारे**/८६९८८१५५५९

## प्रदूषणावरील अग्रलेख उत्तम

हवेच्या प्रदूषणासंदर्भात ‘खुर्च्या उबवणाऱ्यांचे प्रदूषण’ हा २३ एप्रिल रोजीचा अग्रलेख वाचला. तो मनापासून आवडला. अग्रलेखातून संबंधित अधिकारी, पुढाऱ्यांचे कान टोचले, हे उचित म्हणता येईल. आज प्रत्येक शहर प्रदूषणामुळे पूर्णपणे काळवंडलेले आहे. रस्त्याने ये-जा करताना वृद्ध मंडळी, रुग्ण यांना जीव मुठीत घेऊन चालावे लागते. श्वास घ्यायला अडचण होते. सध्या हवेतला मोकळेपणा कुठे राहिलाच नाही. महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाने वेळीच पुढचा अनर्थ ओळखून उपाययोजना करायला हव्यात. नागरिकांचा जगण्याचा हक्क हिरावून घेऊ नका. प्रदूषण रोखण्यासाठी राज्य सरकारने दखल घ्यावी.

**डॉ. राहुल भोसले**/पुणे. ९८९०४६१८८६

वाचक पत्रे पाठविण्यासाठी ईमेल ॲड्रेस
tbedit2016@gmail.com
तसेच **कुठलाही लेख** पाठवायचा असल्यास ९८५०७५३२८१ या व्हॉट्स ॲप क्रमांकावर पाठवावा.

## महत्वाचे...



## कुंभारीच्या गेनसिद्ध महाराज मंदीराला जनरेटर अर्पण

**शिखर पहारिया फाउंडेशनचा उपक्रम**

**सोलापूर, दि.२३ एप्रिल-**

कुंभारी (ता. दक्षिण सोलापूर) येथील गेनसिद्ध महाराज मंदिरासाठी शिखर पहारिया फाउंडेशनच्या वतीने सुमारे ९ लाख किंमतीचा ५८.५ केव्हीए क्षमतेचा किर्लोस्कर जनरेटर अर्पण करण्यात आले. या उपक्रमामुळे मंदिरातील दैनंदिन पूजा, धार्मिक विधी तसेच भाविकांच्या भेटीदरम्यान अखंड वीजपुरवठा सुनिश्चित होणार आहे. मंदिरात होणाऱ्या विविध धार्मिक कार्यक्रमांदरम्यान वारंवार भेडसावणाऱ्या वीजपुरवठ्याच्या अडचणी लक्षात घेऊन हा उपक्रम राबविण्यात आला. नव्याने बसविण्यात आलेला जनरेटर मंदिराच्या दीर्घकालीन गरजा पूर्ण करणार असून, विशेषतः सण-उत्सव आणि जत्रेच्या काळात भाविकांना मोठा दिलासा मिळणार आहे.प्रारंभी गेनसिद्ध महाराजांच्या प्रतिमेसमोर विधीवत पूजा करण्यात आली. यावेळी फाउंडेशनचे राज सलगर, तन्वीर शेख, धर्मराज गुंडे, शंकर नरोटे आदी उपस्थित होते.



## शेळगावच्या (आर) उपक्रमशील शिक्षिका वैशाली नावगुडे यांचा गौरव

**वैराग, दि. २३ एप्रिल-**

तालुक्यातील जिल्हा परिषद प्राथमिक शाळा शेळगाव (आर) येथील उपक्रमशील शिक्षिका वैशाली नावगुडे यांनी राबवलेल्या विविध शैक्षणिक उपक्रमांची आणि त्यांच्या वर्गातील विद्यार्थ्यांनी मिळवलेल्या देदीप्यमान यशाची दखल घेत त्यांचा विशेष सत्कार करण्यात आला. बार्शी तालुका कृषी उत्पन्न बाजार समितीचे उपसभापती बाबा गायकवाड यांच्या हस्ते नावगुडे यांना सन्मानित करण्यात आले. या सोहळ्याप्रसंगी श्री गाढवे व बाबा गायकवाड यांनी शाळेच्या एकूणच प्रगतीबद्दल समाधान व्यक्त केले. कार्यक्रमाचे स्वागत आणि आभार प्रदर्शन सहशिक्षक रंगनाथ काकडे यांनी केले. या गौरव सोहळ्याला शेळगाव शिक्षण प्रसारक मंडळातील सर्व शिक्षक बांधव, शाळेतील सहशिक्षक युवराज यादव, दत्तात्रय सावंत, सहशिक्षिका स्वाती चव्हाण, सुषमा मिटकरी आदी उपस्थित होते.

# डिजिटल जनगणना २०२७ ची रंगीत तालीम

### हुतात्मा स्मृती मंदिरात प्रगणक-पर्यवेक्षकांना प्रशिक्षण

### अचूक व विश्वासार्ह माहिती हेच विकास नियोजनाचे अधिष्ठान : डॉ. ओम्बासे

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २३ एप्रिल -**

अचूक व विश्वासार्ह माहिती हेच विकास नियोजनाचे अधिष्ठान आहे. अधिकाऱ्यांनी प्रामाणिकपणे काम करावे, नागरिकांशी सौजन्याने वागावे आणि कोणतीही माहिती अपूर्ण राहणार नाही याची दक्षता घेण्याचे आदेश महापालिका आयुक्त तथा प्रधान जनगणना अधिकारी डॉ. सचिन ओम्बासे यांनी दिले.

आगामी 'जनगणना २०२७'च्या तयारीला सोलापूर शहरात वेग आला असून, प्रगणक (कर्मचारी) आणि पर्यवेक्षकांसाठी हुतात्मा स्मृती मंदिर येथे प्रशिक्षण शिबिर घेण्यात आले. डिजिटल पद्धतीने होणाऱ्या या जनगणनेच्या कामकाजाची सखोल माहिती यावेळी देण्यात आली. त्या प्रसंगी ते बोलत होते. भारताच्या १५५ वर्षांच्या जनगणना परंपरेतील ही १६ वी जनगणना असून, २०११ नंतर प्रथमच ही प्रक्रिया



राबवली जाणार आहे. २०२१ मध्ये होणारी जनगणना कोरोना महामारीमुळे पुढे ढकलण्यात आली होती. त्यामुळे आता २०२६-२७ या कालावधीत जनगणना पार पडणार आहे. यंदा जनगणना पूर्णतः डिजिटल माध्यमातून होणार असून 'एचएलओ' (कङ्ज) ॲपच्या माध्यमातून माहिती संकलन केले जाणार आहे. १ मे ते १५ मे दरम्यान नागरिकांना स्वतः माहिती भरता येणार आहे, तर १६ मे ते १५ जून या कालावधीत प्रगणक घराघरात जाऊन माहिती नोंदवणार आहेत.

प्रशिक्षणात जनगणनेची प्रक्रिया, आवश्यक कागदपत्रे, माहिती संकलनाची पद्धत आणि उद्भवणाऱ्या अडचणींवरील उपाय याबाबत मार्गदर्शन करण्यात आले. नागरिकांनीही जनगणना अधिकाऱ्यांना सहकार्य करून अचूक माहिती द्यावी, असे आवाहन करण्यात आले.

यावेळी अतिरिक्त आयुक्त तथा नियंत्रण अधिकारी संदीप कारंजे, उपायुक्त तथा शहर जनगणना अधिकारी आशिष लोकरे, सहायक आयुक्त गिरीश पंडित, शशिकांत भोसले, जिल्हा जनगणना समन्वयक अजित बांड (मुंबई), तसेच सुनिता हिबारे आदी उपस्थित होते. सूत्रसंचालन रूथ भंडारे यांनी केले.

## अक्कलकोट मंदिर परिसरातील अतिक्रमणे काढली

### नगरपालिकेची दोन दिवस सर्वात मोठी मोहीम

**तभा वृत्तसेवा,**
**अक्कलकोट, दि. २३ फेब्रुवारी-**

अक्कलकोट तीर्थक्षेत्र श्री वटवृक्ष स्वामी महाराज देवस्थान मंदिर परिसर अन्नछत्र मंडळ परिसरात बुधवारी व गुरुवारी सर्वात मोठी अतिक्रमण विरोधी मोहिम राबविण्यात आली. वटवृक्ष मंदिर परिसरातील न्यायप्रविष्ठ लॉज पत्राशेड घरे वगळता अनधिकृत बांधकाम, हत्ती तलाव व माणिक पेठ परिसरातील रस्त्यावरील अडथळा असलेले अतिक्रमणे गुरुवारी काढण्यात आली .

बुधवार व गुरुवार दोन दिवस अतिक्रमण व अनधिकृत बांधकाम नगर पालिकेच्या रडारवर होते. मंगरूळे हायस्कुल चौक येथून हत्ती तलाव अन्नछत्र मंडळाकडे जाणाऱ्या प्रगतीपथावर असलेल्या ३० मीटर रस्त्यावरील अनधिकृत बांधकाम अतिक्रमणे गुरुवारीही काढण्यात आली. माणिक पेठ या भागातील पन्नास ते साठ रस्त्यावरील अनधिकृत बांधकाम अतिक्रमण काढण्यात आली .

अतिक्रमण केलीली दुकाने 'बाह्य वळण रस्त्यावरील अनधिकृत रहिवाशी घरे जेसीबीने जमीनदोस्त करण्यात आली. पोलीस निरिक्षक दिपक भिताडे,



मुख्याधिकारी रमाकांत डाके यांच्या नेतृत्वाखाली पोलीस नगरपालिकेचे ३० कर्मचारी अधिकारी व ७० सफाई कर्मचारी विद्युत अभियंता धनंजय शेळके, पाणी पुरवठा अभियंता मनोजकुमार ईश्वरकट्टी, सहाय्यक रचनाकार नगर पालिका अककलकोटचे शुभम मागुरे, नगर अभियंता अभिषेक काकडे, रचना सहाय्यक उत्कर्ष उकरंडे सहभागी झाले होते.

जनाजा मज्जीद ' माणिक पेठ येथील रहिवाशी घरे ' मलनिःसारण प्रकल्प बाजूजवळील अतिक्रमणेही गुरुवारी काढण्यात आली.

## सीईओ कुशल जैन यांचा पहिल्याच दिवशी दणका

### उशिरा येणाऱ्या ४३ कर्मचाऱ्यांना नोटिसा

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.२३ एप्रिल -**



सोलापूर जिल्हा परिषदेचे नूतन मुख्य कार्यकारी अधिकारी (सीईओ) कुशल जैन यांनी पदभार स्वीकारताच प्रशासनात शिस्त आणण्यास सुरुवात केली आहे. गुरुवार, दि. २३ एप्रिल रोजी सकाळी त्यांनी आपल्या निजी कक्षातील सीसीटीव्ही कॅमेऱ्याद्वारे कार्यालयात उशिरा येणाऱ्या कर्मचाऱ्यांची थेट नोंद घेतली.

त्यानंतर संबंधित विभागांकडून हजेरी मस्टर मागवून उशिरा हजर झालेल्या ४३ कर्मचाऱ्यांना कारणे दाखवा नोटिसा बजावण्याचे आदेश प्रशासन विभागाच्या उपमुख्य कार्यकारी अधिकारी स्मिता पाटील यांना दिले.यापुढे सर्व कर्मचाऱ्यांनी कार्यालयीन वेळेत उपस्थित राहावे, असे स्पष्ट निर्देश सीईओ जैन यांनी दिले आहेत. तसेच कार्यालयीन वेळ उलटल्यानंतर सलग तीन दिवस उशिरा येणाऱ्या कर्मचाऱ्यांची एक दिवसाची गैरहजेरी नोंदविण्यात येईल, अशा सूचना संबंधित विभाग प्रमुखांना देण्यात आल्या आहेत.

सीईओ जैन यांच्या या कठोर भूमिकेमुळे उशिरा येणाऱ्या कर्मचाऱ्यांमध्ये खळबळ उडाली असून, जिल्हा परिषदेत शिस्तीचे वातावरण निर्माण होण्याची चर्चा सुरू आहे.

**विभागनिहाय उशिरा येणाऱ्या कर्मचाऱ्यांची संख्या**

| | |
|---|---|
| शिक्षण योजना | - ०१ |
| प्राथमिक शिक्षण | - ०८ |
| स्वच्छ भारत मिशन | - ०७ |
| लघुपाटबंधारे | - ०२ |
| कृषी | - ०३ |
| ग्रामीण पाणीपुरवठा | - ०६ |
| बांधकाम (क्रमांक २) | - ०१ |
| पशुसंवर्धन | - ०२ |
| माध्यमिक शिक्षण | - ०२ |
| समाज कल्याण | - ०२ |
| बांधकाम (क्रमांक १) | - ०३ |
| आरोग्य विभाग | - ०१ |
| ग्रामपंचायत | - ०४ |
| अर्थ विभाग | - ०१ |
| **एकूण कर्मचारी** | **- ४३** |



## वारकऱ्यांच्या सुविधांसाठी ग्रामपंचायतींनी दक्ष राहावे

### सीईओ कुशल जैन; वेळापूर पालखी तळाची केली पाहणी

**तभा वृत्तसेवा,**
**वेळापूर, दि. २३ एप्रिल-**

आषाढी वारीतील पालखी सोहळा काही महिन्यांवर येऊन ठेपला असून या काळात लाखो वारकरी पंढरपूरच्या दिशेने मार्गस्थ होत असतात. या पार्श्वभूमीवर वारकऱ्यांना कोणतीही अडचण भासू नये तसेच आवश्यक सुविधा वेळेवर उपलब्ध व्हाव्यात, अशा सूचना सोलापूर जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी कुशल जैन यांनी दिल्या.

वेळापूर येथील संत ज्ञानेश्वर महाराज पालखी तळाची पाहणी केल्यानंतर त्यांनी या सूचना संबंधित अधिकाऱ्यांना दिल्या. यावेळी अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी संदीप कोहनिकर, उपमुख्य कार्यकारी अधिकारी स्मिता पाटील, माळिशरस पंचायत समितीचे गटविकास अधिकारी रघुनाथ पांढरे, जिल्हा कक्षातील वैभव आहाळे वा अनेक अधिकारी यावेळी उपस्थित होते.

सीईओ कुशल जैन यांनी पालखी सोहळ्याच्या तयारीबाबत ग्रामपंचायत तसेच संबंधित यंत्रणांनी समन्वय ठेवून नियोजनबद्ध काम करण्याचे आवाहन केले. यावेळी वेळापूर ग्रामपंचायतीचे सरपंच रजनीश बनसोडे यांनी मुख्य कार्यकारी अधिकारी कुशल जैन व उपस्थित अधिकारी वर्गाचे स्वागत करून त्यांचा सन्मान केला.

तसेच रिपाई आठवले माळिशरस तालुका अध्यक्ष मिलिंद सरतापे उपसरपंच नानासाहेब मुंगुस्कर, ग्रामपंचायत अधिकारी कैलास सुरवसे, विजय बनसोडे, शंकर आडत , प्रियंका आडत, सीमा खाडे तसेच ग्रामपंचायत कर्मचारी उपस्थित होते.

## मंदिरातील हक्काबाबत उत्पात यांचा खटला दाखल करून घेण्याचे आदेश

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि.२३ एप्रिल -**

येथील श्री विठ्ठल रूक्मिणी मंदिरातील उत्पात समाजाच्या अधिकाराबाबत कनिष्ठ न्यायालयात दावा दाखल करून घेण्याचे आदेश जिल्हा सत्र न्यायालयाचे न्यायाधीश ओंकार देशमुख यांनी दिले आहेत.

दरम्यान सर्वोच्च न्यायालयाने बारा वर्षा पूर्वी दिलेल्या निकालानंतर पुन्हा बडवे व उत्पात यांची न्यायालयीन लढाई सुरू झाली आहे. बडवे यांची सदर याचिका यापूर्वीच कनिष्ठ दिवाणी न्यायालयात दाखल करण्यात आली आहे.

पंढरपूरच्या श्री विठ्ठल रूक्मिणी मंदिरात बडवे, उत्पात व सेवाधारी यांचे वंश परंपरागत सेवेच हक्क सर्वोच्च न्यायालयाने काढून घेतले असून मंदिराचे व्यवस्थापन राज्य शासनाकडे सोपविले आहे. याबाबत चाळीस वर्षे सरकार विरूध्द बडवे, उत्पात व सेवाधारी न्यायालयीन लढाई सुरू होती. सदर हक्क काढून टाकण्यासाठी १९६८-६९ साली नाडकर्णी समिती स्थापन करण्यात आली. यानंतर राज्य शासनाने १९७३ साली पंढरपूरच्या मंदिरासाठी स्वतंत्र कायदा केला होता.तेव्हांपासून ते २०१४ साला पर्यंत न्यायालयीन लढाई नंतर वरील तीनही समाजाचे मंदिरातील हक्क काढून टाकण्यात आले होते. सदर निकालाचा अभ्यास करून ॲड. धनंजय रानडे व ॲड.आशितोष बडवे यांनी मंदिरातील बडवे, उत्पात व सेवाधारी यांचे अधिकार काढून घेण्याबाबत न्यायालयाचा आदेश नसल्याचा निष्कर्श काढला आहे. याच्या आधारावर बडवे यांच्या हक्का विषयी काही वर्षा पूर्वी कनिष्ठ न्यायालयात खटला दाखल करण्यात आला होता. तरीही उत्पात यांचा खटला न्यायालयाने फेटाळला होता. मात्र गुरूवारी या विषयी जिल्हा सत्र न्यायालयात सुनावणी होऊन अखेर उत्पात यांच्या हक्का विषयी कनिष्ठ न्यायालयात खटला दाखल करून घेण्याचे आदेश न्या.देशमुख यांनी दिले आहेत. सदर खटला वीरेंद्रसिंह उत्पात विरूध्द मंदिर समितीचे कार्यकारी अधिकारी असा असून यावेळी ॲड.धनंजय रानडे व ॲड.आशितोष बडवे यांनी बाजू मांडली.

सर्वोच्च न्यायालयाने एखाद्या खटल्याचा निकाल दिल्यानंतर पुन्हा याच विषयावर कनिष्ठ न्यायालयात प्रकरण दाखल होणे ही दुमिळ घटना मानली जात आहे. या विषयी माजी खासदार सुब्रमण्यम स्वामी यांनी देखील मुंबई उच्च न्यायालयात खटला दाखल केला आहे.

**WANTED**

Ex-Servicemen at Valsung toll plaza.
**Pls Contact-**
- Mr.M.B.Patil
7558547787

Classifieds

**विकणे आहे**

'मारुती अपार्टमेंट' रुबी नगर सिध्देश्वर ज्वेलर्स समोर बॉम्बे पार्क रोड, जुळे सोलापूर येथील दुसऱ्या मजल्यावरील २ बीएचके प्लॅट लमसम रकमेवर भाडेवर अथवा योग्य किंमतीस विकणे आहे.
मो. ९६७३१६१६९०/ ८१८०८६१०३८/ ९२२५७४९०४०

दै. सोलापूर तरुण भारत मध्ये प्रसिद्ध होणाऱ्या सर्व प्रकारच्या जाहिरातींमधील मजकूर जाहिरातदाराने दिल्या नुसारच प्रसिद्ध केला जातो. यातील कोणत्याही मजकुराच्या सत्यतेबाबत दै. सोलापूर तरुण भारत हमी घेऊ शकत नाही, याची वाचकांनी नोंद घ्यावी.

**IDFC FIRST Bank Limited**
IDFC FIRST Bank
(erstwhile Capital First Limited, amalgamated with IDFC Bank Limited and presently known as IDFC First Bank Limited) | CIN : L65110TN2014PLC097792
Registered Office: - KRM Towers, 8th Floor, Harrington Road, Chetpet, Chennai- 600031.
Tel : +91 44 4564 4000 | Fax: +91 44 4564 4022

**'वित्तीय मालमत्तेचे सिक्युरिटायझेशन आणि पुनर्रचना आणि सुरक्षा हितसंबंधांची अंमलबजावणी अधिनियम, २००२' च्या कलम १३ (२) अन्वये सूचना.**

खाली नमूद केलेल्या कर्जदार आणि सह-कर्जदारांनी **आयडीएफसी फर्स्ट बँक लिमिटेड** (पूर्वीची **कॅपिटल फर्स्ट बँक लिमिटेड** जी **आयडीएफसी बँक बँक लिमिटेडमध्ये** विलीन झाली असून सध्या **आयडीएफसी फर्स्ट बँक लिमिटेड** म्हणून ओळखली जाते) कडून खालीलप्रमाणे सुरक्षित कर्जे घेतली आहेत. खाली नमूद केलेल्या कर्जदार आणि सहकर्जदारांची ही कर्जे त्यांच्या संबंधित मालमत्तेच्या गहाणाद्वारे सुरक्षित करण्यात आली आहेत. संबंधित कर्ज करारांमधील अटी व शर्तींचे पालन करण्यात ते अपयशी ठरल्यामुळे आणि त्यांच्या कर्जफेडीमध्ये अनियमितता निर्माण झाल्यामुळे, रिझर्व्ह बँकेच्या मार्गदर्शक तत्त्वांनुसार त्यांची कर्जे 'अनुत्पादक मालमत्ता' म्हणून वर्गीकृत करण्यात आली आहेत. **आयडीएफसी फर्स्ट बँक लिमिटेड** (पूर्वीची **कॅपिटल फर्स्ट लिमिटेड** जी **आयडीएफसी बँक लिमिटेडमध्ये** विलीन झाली असून सध्या **आयडीएफसी फर्स्ट बँक लिमिटेड** म्हणून ओळखली जाते) कडे त्यांच्याकडून येणे असलेली रक्कम, त्यांना जारी करण्यात आलेल्या संबंधित सूचनांनुसार खालील तक्त्यामध्ये सविस्तरपणे नमूद करण्यात आली आहे; तसेच सदर रकमेवर पुढील व्याज देखील लागू होईल आणि हे व्याज संबंधित तारखांपासून करारातील दराप्रमाणे आकारले जाईल.

| अं. क्र. | कर्ज खाते क्र. | कर्जाचा प्रकार | कर्जदार आणि सह-कर्जदारांची नावे | कलम १३ (२) सूचना दिनांक | कलम १३ (२) सूचनेनुसार थकबाकीची रक्कम |
|---|---|---|---|---|---|
| 1 | 165884890 | मालमत्तेवर कर्ज | 1. अमोल चंद्रकांत खताळ<br>2. कृशाबाई चंद्रकांत खताळ | 14/03/2026 | INR 8,75,267.82/- |
| **मालमत्तेचा पत्ता :** ग्रामपंचायत मिळकत क्रमांक ७१२ असलेले आर.सी.सी. निवासी घर, ज्याचे क्षेत्रफळ ११५५ चौ. फूट (३३*३५) आहे, ते संपूर्ण भूखंड. हे घर गाव: एकशिव, तालुका: माळशिरस, जिल्हा: सोलापूर, महाराष्ट्र-४१३१०९ येथे स्थित असून, त्याच्या सीमा खालीलप्रमाणे आहेत: पूर्व: रंजना हरी खताल यांची मालमत्ता, पश्चिम: नितीन शंकर जावळे यांची मालमत्ता, उत्तर: सरजेराव मल्हारी खताल यांची मालमत्ता, दक्षिण: कळंबोली एकशिव रस्ता. | | | | | |
| 1 | 128544114 | मालमत्तेवर कर्ज | 1. विश्वजीत अण्णासाहेब पाटील<br>2. वैभव अण्णासाहेब पाटील | 26/02/2026 | INR 7,60,522.25/- |
| **मालमत्तेचा पत्ता :** १९८७.५० चौरस फूट (१८४.६ चौरस मीटर) क्षेत्रफळापैकी, ग्रामपंचायत मालमत्ता क्रमांक ९९ असलेली, ९३.९९ चौ. मीटर (१०१२.५० चौ. फूट) क्षेत्रफळाची निवासी घराची संपूर्ण जागा, जी गाव: आहे, तालुका: माढा, जिल्हा: सोलापूर, महाराष्ट्र-४१३२११ येथे स्थित आहे आणि जिच्या सीमा: पूर्व: रस्ता, पश्चिम: श्री. माने यांची जमीन, उत्तर: श्री. मोतीराम पाटील यांची जमीन, दक्षिण: रघुनाथ शिवाजी पाटील यांच्या मालकीची ग्रामपंचायत मिलकट क्रमांक ९९. | | | | | |

तुम्हाला याद्वारे आवाहन करण्यात येत आहे की, तुम्ही आयडीएफसी फर्स्ट बँक लिमिटेडला (पूर्वीची कॅपिटल फर्स्ट लिमिटेड, जी आयडीएफसी बँक लिमिटेडमध्ये विलीन झाली आहे आणि आता आयडीएफसी फर्स्ट बँक लिमिटेड म्हणून ओळखली जाते) वरील तक्त्यात दर्शविलेल्या तपशिलानुसार रक्कम, त्यावरील व्याजदर आणि इतर खर्च, शुल्क इत्यादींसह, संबंधित तारखांनुसार, या प्रकाशनाच्या तारखेपासून ६० दिवसांच्या आत अदा करावी. असे करण्यात अयशस्वी झाल्यास, आयडीएफसी फर्स्ट बँक लिमिटेडला (पूर्वीची कॅपिटल फर्स्ट लिमिटेड, जी आयडीएफसी बँक लिमिटेडमध्ये विलीन झाली आहे आणि आता आयडीएफसी फर्स्ट बँक लिमिटेड म्हणून ओळखली जाते) देय असलेली रक्कम वसूल करण्यासाठी, सरफेसी कायद्याच्या कलम १३(४) आणि कलम १४ अन्वये उपरोक्त गहाण ठेवलेल्या मालमत्तांविरुद्ध कार्यवाही सुरू करण्याचा अधिकार अधोस्वाक्षरीकर्त्यास असेल. याव्यतिरिक्त, उक्त कायद्याच्या कलम १३(१३) अन्वये, तुम्हाला उपरोक्त तारण ठेवलेल्या मालमत्ता विकण्यास/भाड्याने देण्यास किंवा अन्यथा हस्तांतरित करण्यास मनाई

स्वाक्षरी/-
प्राधिकृत अधिकारी
आयडीएफसी फर्स्ट बँक लिमिटेड (पूर्वीची कॅपिटल फर्स्ट लिमिटेड, जी आयडीएफसी बँक लिमिटेडमध्ये विलीन झाली आहे आणि आता आयडीएफसी फर्स्ट बँक लिमिटेड म्हणून ओळखली जाते)

दिनांक : 24/04/2026
स्थळ : सोलापूर, महाराष्ट्र

## विद्यार्थ्यांनी उच्च ध्येय ठेवून सातत्याने प्रयत्न करावेत : प्राचार्य डॉ. जाधव

**कर्मवीर भाऊराव पाटील महाविद्यालयात पारितोषिक वितरण समारंभ उत्साहात**

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि. २३ एप्रिल -**

पारितोषिक वितरण हा केवळ कार्यक्रम नसून विद्यार्थ्यांच्या वर्षभरातील कष्टांचा उत्सव आहे. विद्यार्थ्यांनी उच्च ध्येय ठेवून सातत्याने प्रयत्न करावेत, अपयशाची भीती न बाळगता पुढे वाटचाल करावी. लहान ध्येय ठेवणे हीच खरी चूक असून मोठ्या उद्दिष्टांसाठी प्रयत्न करत राहणे आवश्यक आहे, असे प्रतिपादन संस्थेचे माजी सचिव तथा सेवानिवृत्त प्राचार्य डॉ. जे. जी. जाधव यांनी केले.



रयत शिक्षण संस्था संचलित कर्मवीर भाऊराव पाटील स्वायत्त महाविद्यालयात पारितोषिक वितरण समारंभप्रसंगी ते बोलत होते. अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. बी. टी. जाधव होते. यावेळी जनरल बॉडी सदस्य अमरजीत पाटील, ॲड. गणेश पाटील, ज्योतीराम भायगुडे, उपप्राचार्य डॉ. भगवान नाईकनवरे, डॉ. राजेश कवडे, डॉ. सुशीलकुमार शिंदे, अधिष्ठाता डॉ. समाधान माने, डॉ. अनिल चोपडे, सांस्कृतिक विभाग प्रमुख डॉ. रमेश शिंदे व प्रा. विठ्ठल फुले आदी मान्यवर उपस्थित होते.

या कार्यक्रमाचे प्रास्ताविक पदव्युत्तर विभागाचे अधिष्ठाता डॉ. बाळासाहेब बळवंत यांनी केले. प्रमुख पाहुण्यांचा परिचय जिमखाना समितीचे प्रमुख डॉ. उमेश साळुंखे यांनी करून दिला. या समारंभात राष्ट्रीय, विभागीय व विद्यापीठ स्तरावर विविध कला व क्रीडा स्पर्धांमध्ये उल्लेखनीय यश मिळविणाऱ्या विद्यार्थ्यांचा सन्मान करण्यात आला. तसेच पीएच.डी., पेटंट व विविध पुरस्कार प्राप्त विद्यार्थी व शिक्षकांचा गौरव करण्यात आला.

या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. कुबेर गायकवाड व प्रा. रोहिणी बावचकर यांनी केले. प्रा. डॉ अमर कांबळे यांनी आभार केले.

**विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी महाविद्यालय कटिबद्ध**

प्राचार्य डॉ. बी. टी. जाधव यांनी महाविद्यालयातील ऊर्जावान वातावरण, सक्षम शिक्षकवर्ग व विद्यार्थ्यांचा उत्साही सहभाग यामुळे संस्थेची प्रगती होत असल्याचे सांगितले. महाविद्यालयात कला, वाणिज्य, विज्ञान, क्रीडा व वाङ्मय महोत्सवांचे आयोजन करून विद्यार्थ्यांना व्यापक संधी उपलब्ध करून दिल्या जात असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. प्रत्येक विद्यार्थ्याचा सर्वांगीण विकास साधण्यासाठी महाविद्यालय कटिबद्ध असून शिक्षणासोबत कौशल्यविकास व रोजगाराच्या संधी निर्माण करण्यावर भर दिला जात आहे, असेही त्यांनी सांगितले.

## बार्शीत गांजा विक्री करताना दोन आरोपी अटकेत, तिघे फरार

**तभा वृत्तसेवा,**
**बार्शी दि.२३ एप्रिल-**

बार्शी शहरातील विट भट्टी परीसर ताडसौंदणे रोड, सुभाषनगर, बार्शी या ठिकाणी गोपनीय माहितीच्या आधारे अंमली पदार्थाविरोधात मोठी कारवाई करत पोलिसांनी गांजाविक्री प्रकरणाचा पर्दाफाश केला आहे. सोलापूर ग्रामीण पोलीस विशेष पथक व बार्शी शहर पोलीस ठाण्याचे पथकाने संयुक्त कारवाई केली. या प्रकरणात दोन आरोपींना अटक करण्यात आली असून तीन आरोपी अद्याप फरार आहेत.

बार्शी शहर पोलीस ठाण्यात पाच आरोपींविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या प्रकरणाचा तपास पोलीस निरीक्षक बालाजी कुकडे करत आहेत. २२ एप्रिल रोजी रात्री १०:१० वाजण्यापूर्वी ही कारवाई करण्यात आली असून, दि. २३ एप्रिल रोजी पहाटे ५:१६ वाजता गुन्हा नोंद करण्यात आला. पोलिसांनी आरोपी किरण अनिल जाधव (वय २६, रा. पांगरी) आणि रोहित बापू खंडागळे (वय २५, रा. पांगरी) यांना अटक केली आहे. त्यांना पहाटे ६ वाजता ताब्यात घेण्यात आले.

अटक केलेल्या आरोपींकडून सुमारे ५२२.७७ ग्रॅम गांजा जप्त करण्यात आला असून त्याची किंमत अंदाजे २६,१३८ रुपये आहे. हा गांजा पारदर्शक प्लास्टिक पाउच व निळ्या रंगाच्या पिशवीत ठेवलेला होता. पंचांसमक्ष तो जप्त करून सील करण्यात आला. तपासादरम्यान अटक आरोपींनी दिलेल्या कबुलीनुसार, हा गांजा सचिन कुमार मिरगणे, राजेश कुमार मिरगणे (दोघे रा. सुभाषनगर, बार्शी) तसेच पांडुरंग सोम नाथ सोनवणे (रा. मांडेगाव) यांनी विक्रीसाठी पुरवला होता. त्यामुळे या तिघांना या गुन्ह्यात फरार आरोपी म्हणून शोध घेतला जात आहे. यातील फरार आरोपींच्या शोधासाठी पोलीस निरीक्षक बालाजी कुकडे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस पथक कार्यरत आहेत.





## महत्त्वाचे

### पर्पल कॅपच्या यादीत प्रिन्स यादव अव्वल



**नवी दिल्ली** : १९ व्या इंडियन प्रीमियर लीग हंगामात बुधवारी राजस्थान रॉयल्सविरुद्ध लखनौ सुपर जायण्ट्सकडून खेळताना प्रिन्स यादवने दोन बळी घेतले, तर राजस्थान रॉयल्सच्या जोफ्रा आर्चरने तीन बळी मिळविले. या कामगिरीमुळे, या हंगामातील आतापर्यंतच्या सर्वात चर्चेतील खेळाडूंपैकी एक असलेल्या प्रिन्स यादवने आता पर्पल कॅपच्या यादीत अव्वल स्थान गाठले आहे. त्याच्या नावावर १३ बळी जमा आहेत. चेन्नई सुपर किंग्जच्या अंशुल कंबोजचेही तितकेच बळी आहेत. मात्र, ८.३८ च्या तुलनेत ९.७३ जरी प्रिन्सने कंबोजपेक्षा एक डाव अधिक गोलंदाजी केली असली तरी प्रिन्सचा इकोनॉमी रेट (धावा देण्याचे प्रमाण) कंबोजपेक्षा सरस आहे. या टप्प्यावर आर्चर आघाडीच्या खेळाडूंच्या तुलनेत थोडा मागे आहे. सनरायझर्स हैदराबादचा ईशान मलिंगा आणि गुजरात टायटन्सचा प्रसिध कृष्णा यांच्या नावावर प्रत्येकी १२ बळी आहेत आणि ते प्रिन्स व कम्बोज यांच्या अगदी खाली आहेत. मात्र, ११ बळींसह आर्चर सध्या पाचव्या क्रमांकावर आहे. ऑरेंज कॅपच्या यादीत फारसा बदल झालेला नाही. सनरायझर्स हैदराबादचा अभिषेक शर्मा (३२३ धावा) आणि हेनरिक क्लासेन (३२० धावा) हे अनुक्रमे पहिल्या आणि दुसऱ्या क्रमांकावर कायम आहेत, तर गुजरात टायटन्सचा शुभमन गिल (२६५ धावा) तिसऱ्या क्रमांकावर आहे.

### प्रियनुज, ऋत्विक गुप्ता राष्ट्रीय टेबल टेनिस विजेते

**डेहराडून** : गुरुवारी येथे पार पडलेल्या ज्युनियर आणि युथ राष्ट्रीय टेबल टेनिस अजिंक्यपद स्पर्धेच्या १९ वर्षांखालील मुलांच्या एकेरीच्या अंतिम फेरीत आसामच्या प्रियनुज भट्टाचार्यने तामिळनाडूच्या पी. बी. अभिनंदचा ४-२ असा पराभव केला. या विजयासह त्याने आपल्या प्रतिस्पर्ध्याला स्पर्धेतील तिसरे सुवर्णपदक जिंकण्यापासून रोखले. उपांत्य फेरीच्या सामन्यात प्रियनुजने तामिळनाडूच्या एम. आर. बालमुरुगनविरुद्ध सात गेमची एक नाट्यमय लढत जिंकली होती. १७ वर्षांखालील मुलांच्या एकेरी गटातील अत्यंत चुरशीच्या अंतिम सामन्यात जम्मू-काश्मीरच्या ऋत्विक गुप्ताने ओडिशाच्या सार्थक आर्याचा सात गेमपर्यंत चाललेल्या कडव्या लढतीत ४-३ ने पराभव करीत विजेतेपदाचा मान मिळविला. तामिळनाडूच्या पी.बी. अभिनंद आणि एम.आर. बालमुरुगन या जोडीने आपल्या वर्चस्वपूर्ण कामगिरी करीत दुहेरी गटात सुवर्णपदक पटकावले. या जोडीने अंतिम फेरीत आपल्याच राज्यातील एस.के. मेहान आणि उमेश कुमार या प्रतिस्पर्ध्यांवर ३-१ असा दणदणीत विजय मिळवून विजेतेपद पटकावले.

### परिस्थितीशी जुळवून घेणे हीच आमची ताकद : पाटीदार

**बंगळुरू** : वर्चस्व ही आमची मानसिकता आहे, पण परिस्थितीशी जुळवून घेणे ही आमची ताकद आहे, असे रॉयल चॅलेंजर्स बंगळुरूचा (आरसीबी) कर्णधार रजत पाटीदार म्हणाला. आक्रमक वृत्ती आणि परिस्थितीनुसार जुळवून घेण्याच्या क्षमतेमधील संतुलनामुळे आमच्या संघाने दमदार सुरुवात केली, असेही तो म्हणाला. गतविजेत्या संघाने सहा सामन्यांतून आठ गुण मिळवून आपली विजयी घोडदौड कायम ठेवली आहे. वर्चस्व ही आमची मानसिकता आहे, पण आम्हाला ताठर व्हायचे नाही. आम्हाला परिस्थितीचे मूल्यांकन करून त्यानुसार जुळवून घ्यायचे आहे. एक फलंदाजी विभाग म्हणून ती लवचिकता आमच्यासाठी खूप महत्त्वाची आहे, हीच आमच्या यशाची गुरुकिल्ली आहे, असे तो म्हणाला. पाटीदारने उत्कृष्ट स्ट्राइक रेटने २३० धावा केल्या आहेत.

### कनिष्ठ विश्वचषक नेमबाजीत प्राची गायकवाडला सुवर्णपदक



**कैरो** : येथे आयोजित आयएसएसएफ कनिष्ठ गट विश्वचषक नेमबाजी स्पर्धेत गुरुवारी भारताच्या प्राची गायकवाडने आपल्या असाधारण कौशल्याचे प्रदर्शन करीत महिलांच्या ५० मीटर रायफल ३-पोझिशन्स प्रकारात सुवर्णपदक पटकावले; तर नारायन प्रणवने पुरुषांच्या १० मीटर एअर रायफल प्रकारात कांस्यपदक जिंकून भारताच्या पदकांच्या संख्येत आणखी भर घातली. त्यामुळे स्पर्धेत भारताचे वर्चस्व कायम राहिले. स्पर्धेच्या पहिल्याच दिवशी पुरुषांच्या १० मीटर एअर पिस्तूल प्रकारात शिवा नरवालने मिळवलेल्या विजयानंतर, भारताचे हे या स्पर्धेतील दुसरे सुवर्णपदक ठरले. यामुळे देशाच्या एकूण पदकांची संख्या नऊवर पोहोचली असून यात चार रौप्य व तीन कांस्यपदकांचा समावेश आहे.

# संजू सॅमसनचे दुसरे शतक

**चेन्नई सुपर किंग्स**
**६ बाद २०७**




**◆ मुंबई, २३ एप्रिल**

इंडियन प्रीमियर लीग हंगामात वानखेडे स्टेडियमवर गुरुवारी पाच वेळच्या विजेत्या संघांदरम्यानच्या सामन्यात चेन्नई सुपर किंग्सचा सलामीवीर संजू सॅमसनने पुन्हा एकदा बहारदार फलंदाजी केली. अखेरच्या चेंडूवर चौकार ठोकून त्याने डावाची सांगता केली आणि आपले शतक साजरे केले. सॅमसनचे हे या हंगामातील दुसरे शतक ठरले. सीएसकेसाठीचे दुसरे शतक आणि आयपीएलमधील पाचवे शतक ठरले आहे. संजू सॅमसनच्या या शानदार शतकाच्या बळावर चेन्नई सुपर किंग्सने मुंबई इंडियन्सविरुद्ध २० षटकांत ६ बाद २०७ धावा उभारल्या. आता मुंबई इंडियन्सला विजयासाठी २०८ धावा काढण्याची गरज आहे.

मुंबई इंडियन्सचा कर्णधार हार्दिक पांड्याने नाणेफेक जिंकून प्रथम क्षेत्ररक्षण करण्याचा निर्णय घेतला.

संजू सॅमसन व ऋतुराज गायकवाड या सलामी जोडीने स्वैर फलंदाजी करीत सीएसकेच्या डावाची चांगली सुरुवात केली. सीएसकेच्या ३२ धावा झाल्या असताना गायकवाड एएम गझनफरच्या फिरकीवर आक्रमक फटका खेळण्याच्या प्रयत्नात बाद झाला. गायकवाड २२ धावांवर तिलक वर्माकडून झेलबाद झाला. सीएसकेच्या कर्णधाराने पुन्हा एकदा अगदीच कमी धावसंख्येवर आपली विकेट गमावली आहे.

संजू सॅमसन एका टोकावरून सीएसकेसाठी किल्ला लढवित असताना दुसऱ्या टोकावरून त्याचे सहकारी निमित अंतराने तंबूत परतत होते. मिचेल सॅण्टनरने सरफराज खानचा (१४) त्रिफळा उडविला. त्यानंतर गझनफरने शिवम दुबेला (५) आपल्या फिरकीच्या जाळ्यात अडकवून आपला दुसरा बळी घेतला. तोपर्यंत सीएसकेने ८.१ षटकांत ३ बाद ९१ धावांचा टप्पा गाठला होता. संजू सॅमसनला डेव्हाल्ड ब्रेव्हिसची उत्तम साथ मिळाली. अकराव्या षटकादरम्यान सॅमसनने अश्वनी कुमारच्या चेंडूवर चौकार हाणत आपले अर्धशतक पूर्ण केले. मात्र या षटकांतील अखेरच्या चेंडूवर अश्वनी कुमारने ब्रेव्हिसला बुमराहकडे झेल सोपविण्यास भाग पाडले. ब्रेव्हिसने ११ चेंडूंत २१ धावांची भर घातली. या दोघांनी चौथ्या गड्यासाठी ३१ धावांची भागीदारी केली व सीएसकेला ११ षटकांत ४ बाद १२२ धावांपर्यंत मजल मारून दिली.

पुढे संजू सॅमसनने एकाकी किल्ला लढवित कार्तिक शर्मा (१८), जॅमी ओव्हर्टन (१५) व अकिल हुसेनच्या (नाबाद २) सहकार्याने सीएसकेची धावसंख्या दोनशेपेक्षा अधिक वाढविण्याचा चांगला प्रयत्न केला. संजू सॅमसनने अखेरच्या षटकांत कृश भगतच्या गोलंदाजीवर दोन षट्कार व अखेरच्या चेंडूवर एक चौकार हाणत आपले शतक पूर्ण केले. संजू सॅमसनने अवघ्या ५४ चेंडूंत १० चौकार व ६ षट्कारांसह नाबाद १०१ धावांची शतकी खेळी केली.

मुंबई इंडियन्सकडून एएम गझनफर व अश्वनी कुमारने प्रत्येकी २ बळी, तर जसप्रीत बुमराह व मिचेल सॅण्टनरने प्रत्येकी १ बळी मिळविला.

◂(वृत्तसंस्था)

# गुजरात टायटन्स मुसंडी मारण्यास उत्सुक

**◆ बंगळुरू, २३ एप्रिल**

१९ व्या इंडियन प्रीमियर लीग २०२६ च्या ३३ व्या सामन्यात, बंगळुरू येथील एम. चिन्नास्वामी स्टेडियमवर रॉयल चॅलेंजर्स बंगळुरू (आरसीबी) आणि गुजरात टायटन्स (जीटी) यांच्यारम्यान साखळी सामना खेळला जाणार आहे, तेव्हा गुजरात टायटन्स पुन्हा जोरदार मुसंडी मारून आपला विजयी सूर परत मिळविण्याचे लक्ष्य बाळगून असेल.

आरसीबीने आतापर्यंत सहापैकी चार सामने जिंकले व ते ८ गुणांसह तिसऱ्या स्थानावर आहे, तर गुजरातने सहापैकी ३ सामने जिंकले असून ते ६ गुणांसह सहाव्या स्थानावर आहे.

या स्पर्धेत आतापर्यंत गुजरात टायटन्सचा प्रवास संमिश्र स्वरूपाचा राहिला आहे. त्यांनी काही प्रसंगी उत्कृष्ट खेळाची झलक दाखवली असली, तरी सातत्य राखण्यात त्यांना संघर्ष करावा लागला आहे. शुभमन गिलच्या नेतृत्वाखालील हा संघ धावा काढण्यासाठी प्रामुख्याने आपल्या आघाडीच्या फळीवर अवलंबून राहिला आहे, तर मधल्या फळीला



रजत पाटीदार



शुभमन गिल

अद्याप एकत्रितपणे आपली कामगिरी सिद्ध करता आलेली नाही. मुंबई इंडियन्सविरुद्धच्या गत सामन्यात ९९ धावांनी झालेल्या मोठ्या पराभवानंतर, प्ले-ऑफमधील स्थानासाठीची चुरस वाढत असताना, गुजरातचा संघ लवकरात लवकर सावरत आपल्या मोहिमेला पुन्हा योग्य मार्गावर आणण्यासाठी उत्सुक असेल.

दुसरीकडे, आरसीबी आपल्या घरच्या मैदानावर मिळणाऱ्या फायद्याचा पुरेपूर लाभ उठवून, गुणतालिकेत आपली आगेकूच कायम राखण्याच्या प्रयत्नात असेल. भक्कम फलंदाजी फळी आणि चिन्नास्वामी स्टेडियमवरील परिस्थितीची असलेली सखोल जाण याच्या जोरावर, आरसीबीचा संघ पाहुण्या संघावर सुरुवातीपासूनच दबाव निर्माण करून गुणतालिकेतील आपले स्थान अधिक बळकट करण्याचे ध्येय बाळगून असेल. बंगळुरू येथील चिन्नास्वामी स्टेडियमची खेळपट्टी फलंदाजांसाठी नंदनवन मानली जाते व ती फलंदाजांना मोठ्या प्रमाणावर अनुकूल ठरते. सीमारेषा जवळ असल्यामुळे, गत काही वर्षांत गोलंदाजांसाठी हे मैदान एक आव्हानात्मक ठिकाण ठरले आहे. या हंगामात, या मैदानावर आतापर्यंत चार सामने खेळवले गेले आहेत आणि हे सर्व सामने भरपूर धावांचे, अत्यंत थरारक सामने ठरले आहेत.

◂(वृत्तसंस्था)

**आजचा सामना**

**रॉयल चॅलेंजर्स बंगळुरू**
**वि. गुजरात टायटन्स**
**स्थळ** : एम. चिन्नास्वामी स्टेडियम, बंगळुरू
**वेळ** : सायकाळी ७.३० वाजतापासून
**थेट प्रसारण** : स्टार स्पोर्ट्सवर

# इराणच्या जागी इटलीचा समावेश करा

## राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांच्या विशेष दूताची फिफाकडे मागणी

**◆ नवी दिल्ली, २३ एप्रिल**

आगामी ११ जूनपासून सुरू होणाऱ्या आगामी फिफा फुटबॉल विश्वचषकात इराणच्या जागी इटलीचा समावेश करण्यात यावा, अशी मागणी अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांच्या एका विशेष दूताने जागतिक फुटबॉल सस्था- फिफाकडे अशी मागणी केल्याचे वृत्त आहे.




ट्रम्प यांनी एका समाज माध्यम पोस्टद्वारे पोप लिओ १४ यांच्यावर जोरदार टीका केल्यानंतर, ट्रम्प यांच्या एका विशेष दूताने ही मागणी केली आहे.

मी ट्रम्प आणि फिफा अध्यक्ष जियानी इन्फँटिनो यांना अशी सूचना केली आहे की, विश्वचषकात इराणच्या जागी इटलीचा समावेश करण्यात यावा; या गोष्टीला मी दुजोरा देतो. मी मूळचा इटालियन आहे आणि अमेरिकेत आयोजित होणाऱ्या या स्पर्धेत अझुरी (इटलीचा संघ) ला खेळताना पाहणे हे माझ्यासाठी एक स्वप्नच ठरेल. चार विश्वचषक विजेतेपदे नावावर असल्याने, या स्पर्धेत समावेश होण्यास पात्र ठरण्याइतका दमदार इतिहास त्यांच्याकडे नक्कीच आहे, असे अमेरिकेचे विशेष दूत पाओलो झॅम्पोली यांनी एका वृत्तात म्हटले आहे.

अमेरिकेच्या स्थलांतर धोरणाला आणि इराणमधील युद्धाला पोप लिओ यांनी केलेल्या विरोधावरून, ट्रम्प यांनी त्यांच्यावर एक असाधारण व अत्यंत कडक टीकास्त्र सोडले आहे. त्यांनी या पहिल्या अमेरिकन पोपवर 'गुन्हेगारीच्या बाबतीत कमकुवत आणि परराष्ट्र धोरणाच्या दृष्टीने अत्यंत वाईट' असल्याचा आरोप केला. यामुळे राजकीय वर्तुळातील सर्वच स्तरांतून त्यांच्यावर टीका झाली. इटलीच्या पंतप्रधान जॉर्जिया मेलोनी यांनी ट्रम्प यांनी पोप लिओ १४ यांच्यावर केलेली टीका 'अस्वीकार्य' असल्याचे म्हटले आहे.

◂(वृत्तसंस्था)

# भारतीय पुरुषांची कॅनडाशी, महिलांची डेन्मार्कशी सलामीची लढत

**थॉमस, उबर चषक**
**बॅडमिंटन आजपासून**

**◆ नवी दिल्ली, २३ एप्रिल**

थॉमस चषक व उबर चषक बॅडमिंटन स्पर्धेत भारतीय पुरुष आणि महिला संघ आपल्या मोहिमेची सुरुवात करण्यास सज्ज झाले आहेत. डेन्मार्कच्या हॉर्सेन्स शहरात होणाऱ्या या स्पर्धेच्या पहिल्याच दिवसावर सर्वांचे लक्ष केंद्रित झाले आहे. २०२२ मध्ये ऐतिहासिक विजेतेपद पटकावणाऱ्या भारतीय पुरुष संघाची मोहीम २४ एप्रिल रोजी भारतीय प्रमाणवेळेनुसार दुपारी १२ वाजता कॅनडाविरुद्ध सुरू होणार आहे. त्यानंतर त्याच दिवशी, यजमान डेन्मार्कच्या संघाशी भारतीय महिला संघ दोन हात करेल. हे सर्व सामने फोरम हॉर्सेन्स येथे खेळले जातील.

गट साखळी फेरीत भारताला सुरुवातीच्या टप्प्यातच एका आव्हानात्मक वेळापत्रकाचा सामना करावा लागणार आहे. पुरुष संघ आपला पुढील सामना २७ एप्रिल रोजी (दुपारी १२ वाजता) ऑस्ट्रेलियाविरुद्ध खेळेल व त्यानंतर २९ एप्रिल रोजी (दुपारी १.३० वाजता ) चीनविरुद्ध एका अत्यंत महत्त्वाच्या आणि अटीतटीच्या लढतीसाठी सज्ज होईल. दुसरीकडे, महिला संघ आपली मोहीम २५ एप्रिल रोजी युक्रेनविरुद्ध व २७ एप्रिल रोजी चीनविरुद्ध पुढे नेईल; हे दोन्ही सामने रात्री १० वाजता () खेळले जातील. प्रत्येक गटातून केवळ अव्वल दोन संघच बाद फेरीत प्रवेश करतात, त्यामुळे स्पर्धेची सुरुवातच दमदार करण्यावर विशेष भर दिला जात आहे. या स्पर्धेतील सर्व सामने जिओहॉटस्टार वर थेट प्रक्षेपित केले जातील.



एच. एस. प्रणॉय



लक्ष्य सेन



पी. व्ही. सिंधू

गत काही आठवड्यांपासून आम्ही एक संघ म्हणून कठोर सराव करत आहोत. आमचे सांघिक संयोजन योग्य रितीने जुळवणे आणि संघाच्या सर्व विभागांमध्ये एक लय निर्माण करणे, यावर आमचे मुख्य लक्ष केंद्रित आहे, असे भारतीय पुरुष संघातील अनुभवी खेळाडू एच. एस. प्रणॉय याने सांगितले. थॉमस कप ही स्पर्धा नेहमीच अत्यंत आव्हानात्मक असते. गट फेरीत समोर तीन कठीण सामने असल्याने, आम्ही पूर्णपणे सज्ज आणि एकाग्र राहण्यावर भर देत आहोत. तसेच एका वेळी एकाच सामन्यावर लक्ष केंद्रित करून पुढे जाण्याचा आमचा प्रयत्न आहे, असेही तो म्हणाला. भारतीय महिला संघ यावेळी एका नव्या आणि ताज्या दमाच्या मिश्रणासह स्पर्धेत उतरला आहे. या संघात नवोदित गुणवान खेळाडू आणि अनुभवी, नावाजलेल्या खेळाडूंचा सुरेख मेळ साधण्यात आला आहे. दुखापतग्रस्त त्रिशा जॉली व गायत्री गोपीचंद यांच्या जागी श्रुती मिश्रा आणि प्रिया कोन्जेंगबाम या जोडीला संघात स्थान देण्यात आले आहे. या सुवर्णसंधीचा पुरेपूर फायदा उठवण्यावर आमचे संपूर्ण लक्ष केंद्रित आहे, असे महिला संघातील खेळाडू उन्नती हुडा हिने सांगितले.

◂(वृत्तसंस्था)

# राजस्थान रॉयल्सच्या नांद्रे बर्गरला दंड

**◆ मुंबई, २३ एप्रिल**



राजस्थान रॉयल्सचा वेगवान गोलंदाज नांद्रे बर्गरला, लखनौ सुपर जायण्ट्सविरुद्धच्या अलीकडील सामन्यादरम्यान आयपीएलच्या आचारसंहितेचे उल्लंघन केल्याप्रकरणी, त्याच्या सामन्याच्या मानधनाच्या १० टक्के दंड ठोठावण्यात आला असून त्याला एक डिमेरिट पॉइंटही देण्यात आला आहे.

१६० धावांच्या लक्ष्याचा पाठलाग करताना, ऋषभ पंतच्या नेतृत्वाखालील संघाला १८ षटकांत ११९ धावांवर रोखून राजस्थान रॉयल्सने ४० धावांनी दणदणीत विजय मिळविला.

या दक्षिण आफ्रिकन आंतरराष्ट्रीय खेळाडूने अनुच्छेद २.५ अंतर्गत येणारा स्तर १ दर्जाचा गुन्हा केल्याचे मान्य केले आहे. हा अनुच्छेद सामन्यादरम्यान अशा प्रकारची भाषा, कृती किंवा हावभाव वापरण्याशी संबंधित आहे, ज्यामुळे दुसऱ्या खेळाडूचा अपमान होऊ शकतो किंवा त्याला आक्रमक प्रतिक्रिया देण्यास प्रवृत्त केले जाऊ शकते.

बुधवारी झालेल्या सामन्यादरम्यान, बर्गरने लखनौचा कर्णधार पंतला शून्यावर बाद केल्यानंतर त्याच्या दिशेने आक्रमक हावभाव केले आणि त्याला शिवीगाळ करतानाही तो दिसून आला. ◂(वृत्तसंस्था)

# स्टार्कला आयपीएलमध्ये खेळण्यासाठी हिरवा कंदील

## मे महिन्यात दिल्ली कॅपिटल्सकडून खेळण्याची आशा

**◆ सिडनी, २३ एप्रिल**

ऑस्ट्रेलियाचा आघाडीचा वेगवान गोलंदाज मिचेल स्टार्क खांदा आणि कोपराच्या दुखापतींतून पूर्णपणे सावरला असून, आयपीएल २०२६ मध्ये सहभागी होण्यासाठी वैद्यकीय मंजुरी मिळाली आहे. १ मे रोजी दिल्ली कॅपिटल्सकडून खेळण्यासाठी उपलब्ध राहण्याच्या आशेने तो शुक्रवारी भारताकडे रवाना होणार आहे.

१ मे रोजी राजस्थान रॉयल्सविरुद्ध होणाऱ्या सामन्यापूर्वी, दिल्ली कॅपिटल्स संघासाठी उपलब्ध होण्याची त्याला आशा आहे. ३६ वर्षीय स्टार्कने जानेवारीच्या अखेरपासून कोणताही क्रिकेट सामना खेळलेला नाही. ॲशेस मालिकेत त्याच्यावर कामाचा प्रचंड ताण होता. या मालिकेत त्याने १९.९३ च्या सरासरीने ३१ बळी घेत मालिकावीर किताब पटकावला होता आणि पाच कसोटी सामन्यांमध्ये मिळून १५३.१ षटके गोलंदाजी केली होती. त्यानंतर जानेवारीच्या अखेरीस त्याने सिडनी सिक्सर्स



संघाकडून पाच सामने खेळले आणि संघाला अंतिम फेरीत पोहोचण्यास मदत केली; मात्र, पर्थ स्कॉर्चर्स विरुद्धच्या एका सामन्यात, झेल घेण्यासाठी झेप घेत असताना तो मैदानावर आपल्या डाव्या खांद्यावर व कोपरावर जोरात पडला होता. फेब्रुवारीतील विश्रांतीनंतर, जेव्हा तो गोलंदाजी करण्यासाठी परतला, तेव्हा त्याला काहीशी वेदना जाणवली; त्यामुळे त्याचे आयपीएलमधील आगमन लांबले.

◂(वृत्तसंस्था)

### श्रीलंका क्रिकेटविरुद्धचा खटला नुवान थुसाराने घेतला मागे

**◆ कोलंबो, २३ एप्रिल**



श्रीलंकेचा वेगवान गोलंदाज नुवान थुसाराने, श्रीलंका क्रिकेट संघटनेविरुद्ध दाखल केलेला खटला मागे घेतला आहे. आयपीएल २०२६ मध्ये खेळण्यासाठी श्रीलंका क्रिकेटने त्याला ना-हरकत प्रमाणपत्र (एनओसी) नाकारल्यानंतर काही आठवड्यांतच त्याने हा खटला दाखल केला होता. तो रॉयल चॅलेंजर्स बंगळुरू संघाचा (आरसीबी) भाग आहे. आरसीबीने अद्याप या ३१ वर्षीय गोलंदाजाच्या जागी बदली खेळाडूचे नाव जाहीर केलेले नाही.

आयपीएलचा बराचसा भाग आता पूर्ण झाला असल्याने त्याला आपला खटला मागे घ्यायचा आहे, असे थुसाराने कोलंबो जिल्हा न्यायालयाला सांगितले. थुसाराने गत आठवड्यात श्रीलंका क्रिकेटला एक लेखी माफीनामा देखील पाठविला होता, यात त्याने आपला खटला मागे घेण्याची इच्छा दर्शविली होती.

◂(वृत्तसंस्था)

# सचिन तेंडुलकर देतोय् छत्तीसगडच्या तरुणांना प्रेरणा

**◆ बस्तर, २३ एप्रिल**

छत्तीसगडचे मुख्यमंत्री विष्णू देव साय यांनी क्रिकेटचा दिग्गज क्रिकेटपटू सचिन तेंडुलकर याच्या बस्तर विभागाच्या दौऱ्याचे कौतुक केले आहे. एकेकाळी नक्षलवाद्यांचा बालेकिल्ला असलेल्या या प्रदेशाचा सचिनने केलेला दौरा हे राज्यासाठी अभिमानास्पद असून, तो येथील बालके व तरुणांसाठी प्रेरणेचा एक मोठा स्रोत असल्याचे मुख्यमंत्र्यांनी म्हटले आहे.

भारतरत्न पुरस्काराने सन्मानित व मुंबईस्थित असलेल्या या क्रिकेटपटूने तळागाळातील खेळांना चालना देणाऱ्या एका उपक्रमाचा भाग म्हणून दंतेवाडा जिल्ह्याला एक दुर्मिळ भेट दिली. मुख्यमंत्र्यांनी छत्तीसगडला 'नक्षलमुक्त' घोषित केल्यानंतर अवघ्या तीन आठवड्यांतच हा दौरा पार पडला.





तेंडुलकरचा दौरा बस्तरमधील परिवर्तनाचे प्रतीक

दंतेवाडा जिल्ह्यातील छिंदनार गावाला सचिन तेंडुलकरने दिलेली भेट ही संपूर्ण बस्तर विभागामध्ये होत असलेल्या परिवर्तनाचे प्रतिबिंब आहे. हा प्रदेश आता भीतीकडून विकासाकडे, संधींकडे आणि आत्मविश्वासाकडे वाटचाल करीत असल्याचे साय यांनी समाज माध्यमावरील एका पोस्टमध्ये नमूद केले.

अशा उपक्रमांमुळे तरुणांना योग्य दिशा मिळेल आणि प्रेरणा मिळेल. त्याच वेळी, सचिन तेंडुलकरने मुलांशी साधलेला संवाद खेळांना प्रोत्साहन देईल, तसेच मुलांमध्ये आत्मविश्वास, शिस्त, सांघिक भावना आणि सकारात्मक ऊर्जा निर्माण करेल, असेही त्यांनी आपल्या संदेशात म्हटले आहे.

सचिन तेंडुलकर फाऊंडेशन आणि मानदेशी फाऊंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित करण्यात आलेली मैदान कप मोहीम हे क्रीडा पायाभूत सुविधांच्या विशेषतः आदिवासी भागांमधील बाबतीत एक दूरदृष्टीपूर्ण पाऊल असून, ती सर्वांगीण विकासाला हातभार लावणारी आहे, असेही ते म्हणाले.

◂(वृत्तसंस्था)

# आयुष म्हात्रेच्या जागी आकाश मधवाल

**◆ चेन्नई, २३ एप्रिल**

दुखापतीमुळे आयुष म्हात्रे आयपीएलमधून बाहेर पडल्यामुळे चेन्नई सुपर किंग्सने आपल्या गोलंदाजी फळीला बळ देण्यासाठी आकाश मधवालला संघात सहभागी करून घेतले आहे.

आयपीएल २०२६ साठी दुखापतग्रस्त आयुष म्हात्रेचा पर्यायी खेळाडू म्हणून चेन्नई सुपर किंग्सने आकाश मधवालशी करार केला आहे.

भारताला १९ वर्षांखालील विश्वचषक जिंकवून देणारा कर्णधार आयुष म्हात्रे डाव्या पायाच्या दुखापतीमुळे स्पर्धेबाहेर झाला आहे. उजव्या हाताने गोलंदाजी करणारा वेगवान गोलंदाज आकाश मधवाल, ३० लाख रुपयांच्या मोबदल्यात संघात दाखल झाला आहे.

मधवालने आयपीएलच्या १७ सामन्यांमध्ये २३ बळी घेतले असून, यामध्ये एका सामन्यात पाच बळी घेण्याच्या कामगिरीचाही समावेश आहे.



भारताच्या १९ वर्षांखालील विश्वचषक विजेत्या संघाचा कर्णधार असलेल्या म्हात्रेने, सीएसकेसाठी या हंगामाची सुरुवात अत्यंत प्रभावीपणे केली होती. त्याने सहा सामन्यांमध्ये दोन अर्धशतके झळकावली होती. मात्र, सनरायझर्स हैदराबादविरुद्धच्या सामन्यादरम्यान त्याला डाव्या पायाच्या दुखापत झाली.

◂(वृत्तसंस्था)

## महत्वाचे...

### रेणुका महागांवकर यांच्या ‘हृदयस्थ’ काव्यसंग्रहाचे उद्या प्रकाशन






**सोलापूर, दि. २३ एप्रिल-**

महाराष्ट्र साहित्य परिषद शाखा दक्षिण सोलापूरच्या अध्यक्षा तथा कवयित्री रेणुका अविनाश महागांवकर यांच्या हृदयस्थ या काव्य संग्रहाचे प्रकाशन ज्येष्ठ कवी अशोक नायगांवकर यांच्या हस्ते आणि गायिका सन्मिता धापटे - शिंदे यांच्या प्रमुख उपस्थितीत शनिवार ि२५ एप्रिल रोजी सायंकाळी ६. २५ वाजता लोकमान्य टिळक सभागृह चार हुतात्मा पुतळा चौक सोलापूर (ॲम्फी थिएटर ) येथे होणार असल्याची माहिती कार्याध्यक्ष प्रशांत बडवे यांनी दिली. कवयित्री महागांवकर यांचे तिसरे पुस्तक प्रकाशित होत असताना यापुर्वी सन २०१६ मध्ये तुमच्यासाठी आणि सुजाण पालकत्व अशी दोन पुस्तके प्रकाशित झाली होती. ‘हृदयस्थ‘ची नीता नितीन हिरवे यांच्या संवेदना प्रकाशन संस्थेकडून प्रकाशनाची जबाबदारी घेण्यात आली आहे. या काव्य संग्रहामध्ये हृदयाला थेट भिडतील अशा कवितांचा समावेश आहे. जुन्या काळातील अनेक परंपरा आणि संस्कृती तसेच आधुनिक काळातील बदल असा अनोखा संगम तसेच निसर्ग कविता, प्रेमकविता आणि सामाजिक भान असलेल्या कविता या हृदयस्थ या काव्यसंग्रहात वाचायला मिळणार आहे. कवी अशोक नायगांवकर यांची प्रस्तावना लाभली आहे. या कार्यक्रमाला रसिक श्रोत्यांनी मोठ्यासंख्येने उपस्थित राहावे असे आवाहनही यावेळी करण्यात आले.

### पूर्व वैमनस्यातून प्राणघातक हल्ला; चौघांवर गुन्हा दाखल

**सोलापूर, दि. २३ एप्रिल-**

पूर्व वैमनस्याचा राग मनात धरून बेस बॉल बॅट, हॉकी स्टिक आणि लोखंडी पाईपने खुनी हल्ला करून एकास गंभीर जखमी केल्याप्रकरणी चार जणांविरुद्ध सलगरवस्ती पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. साईनाथ साईनाथ ऊर्फ साहिल हरिदास गायकवाड, ध्रुव हरीदास गायकवाड, एमपीडीए कारवाई झालेला हरिदास गायकवाड, प्रथमेश ऊर्फ काल्या गैबू गायकवाड (रा. सेटलमेंट सोलापूर) असे गुन्हा दाखल करण्यात आलेल्या आरोपींची नावे असून याबाबत अशोक वीरभद्राप्पा जाधव (वय ४५, रा. सेटलमेंट कॉलनी) यांनी फिर्याद दिली आहे. यातील फिर्यादी अशोक जाधव हे २० एप्रिल २०२६ रोजी सायंकाळी साडू प्रकाश जाधव यांच्यासह दुचाकी वरून लग्नाचे सामान आणण्यासाठी जात होते. राचप्पा पिठाच्या गिरणीजवळ आरोपी प्रथमेश ऊर्फ काल्या गायकवाड आणि हरिदास गायकवाड हे त्यांच्या समोर आले. मोटारसायकल थांबवताच पाठीमागून आलेल्या साईनाथ ऊर्फ साहिल गायकवाड आणि ध्रुव गायकवाड यांनी ‘तुमची एवढी हिम्मत वाढली का? आमच्या नातेवाईकांविरुद्ध गुन्हा दाखल करता काय?‘ असे म्हणून हल्ला चढवला. आरोपी साईनाथने बेस बॉल बॅटने फिर्यादीच्या डोक्यावर वार केला. ध्रुव गायकवाड याने हॉकी स्टिकने तर प्रथमेशने लोखंडी पाईपने फिर्यादीच्या पायावर आणि हातावर बेदम मारहाण केली. यावेळी आरोपी हरिदास गायकवाड याने ‘याला जिवंत सोडू नका‘ अशी चिथावणी दिली . यादरम्यान फिर्यादीने आरडाओरडा केल्यावर नातेवाईक आणि परिसरातील नागरिक मदतीला धावून आले, तेव्हा आरोपींनी तिथून पळ काढल्याचे फिर्यादीत म्हटले आहे. दरम्यान हल्लयात जखमी झालेल्या अशोक जाधव यांना एका खाजगी दवाखान्यात उपचारासाठी दाखल करण्यात आले असून फौजदार सुरज कुतवळ हे गुन्ह्याचा पुढील तपास करीत आहेत.



### बार्शीत बेकायदेशीर दारु विक्रीवर पोलिसांचा छापा; ७० हजारांचा मुद्देमाल जप्त

**बार्शी, दि. २३ एप्रिल -**

बार्शी शहरात बेकायदेशीररित्या देशी-विदेशी दारु विक्री करणाऱ्या इसमावर पोलिसांनी धाड टाकून मोठी कारवाई केली आहे. या कारवाईत सुमारे ७०,१९५ रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला असून आरोपीला ताब्यात घेण्यात आले आहे. दि. २२ एप्रिलल रोजी मिळालेल्या गोपनीय माहितीनुसार, आगळगाव रोड रिंग रोडवरील एम.एस.ई.बी. कार्यालयासमोर असलेल्या श्री गणेश पान शॉप येथे एक व्यक्ती बेकायदेशीररित्या देशी-विदेशी दारु विक्री करत असल्याची माहिती पोलिसांना मिळाली. त्यानुसार सोलापूर ग्रामीण विशेष पथक व बार्शी शहर पोलीस ठाण्याचे प२थकाने संयुक्त कारवाई केली. पोलीस पथकाने पंचांसमक्ष छापा टाकला असता, तेथे अक्षय दिपक सरकाळे (वय ३५, रा. झाडबुके मैदान, बार्शी) हा इसम दुकानात दारु विक्री करताना आढळून आला. त्यास तात्काळ ताब्यात घेण्यात आले. दुकान व फ्रीजची तपासणी केली असता विविध प्रकारच्या देशी व विदेशी दारुच्या बाटल्या मोठ्या प्रमाणात आढळून आल्या. यात बिअर, व्हिस्की, वोडका तसेच देशी दारुच्या विविध ब्रँडचा समावेश होता. तसेच एक ४५० लिटर क्षमतेचा फ्रीजमधील बिअरच्या बाटल्यांसहीत फ्रीज देखील जप्त करण्यात आला. सदर सर्व मुद्देमालाची एकूण किंमत ७०,१९५ रुपये इतकी असून पंचनामा करुन तो जप्त करण्यात आला आहे. नमुना म्हणून काही बाटल्या सीलबंद करुन ताब्यात घेण्यात आल्या आहेत. याप्रकरणी आरोपी अक्षय सरकाळे याच्याविरुद्ध महाराष्ट्र दारुबंदी कायदा कलम ६५ (ई) अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. ही कारवाई सोलापूर ग्रामीण पोलिसांचे विशेष पथक व बार्शी शहर पोलीस ठाणे पथकाच्या संयुक्त प्रयत्नातून पार पडली असून पुढील तपास सुरु आहे.

**सोलापूर ग्रामीण पोलीस पथकाची संयुक्त कारवाई**

# माचणूर व रहाटेवाडी येथे एकाच रात्री दोन घरफोड्या

**3 लाख ५५ हजाराचा मुद्देमाल चोरट्यांनी पळविला**

**तभा वृतसेवा**
**मंगळवेढा २३ एप्रिल-**

माचणूर व रहाटेवाडी परिसरात चोरट्यांनी दोघांच्या घरात प्रवेश करुन कपाटात ठेवलेले सोन्याचे दागिने व रोख रक्कम असा एकूण ३ लाख ५५ हजार रुपये किंमतीचा मुद्देमाल चोरुन नेण्याचा प्रकार घडला असून या प्रकरणी अज्ञात चोरट्याविरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे. दरम्यान चोरट्यांनी ग्रामीण भागात नंगानाच सुरु केला असून पोलीस मात्र त्यांना पकडण्यात अपयशी ठरत असल्याने नागरिकामधून तीव्र संताप व्यक्त होत आहे.

पोलीस सुत्रांनी दिलेली माहिती अशी,यातील फिर्यादी सोमनाथ पोपट नांदे (रा.माचणूर) हे रहाटेवाडी रोडवरील शेतात रहावयास असून दि.२३ एप्रिल रोजी रात्री १ वाजता शेती पंपाची मोटर लाईट आल्याने सुरु करुन ते झोपी गेले. उष्णतेचा उकाडा जास्त असल्याने एका खोलीचा दरवाजा उघडा ठेवला होता. सकाळी ६ वाजता कुटूंबातील सर्वजण झोपेतून उठल्यानंतर घरातील कपाट व आतील ड्रॉव्हर उघडे दिसले. तसेच सर्व साहित्य अस्ताव्यस्त पडले होते. फिर्यादीने कपाटात टेवलेले सोन्याचे दागिने व पैसे चेक केले असता त्यामध्ये मिळून आले नाहीत. त्यामुळे त्यांची खात्री पटली की कोणी तरी अज्ञात चोरट्याने चोरुन नेले असावे असे दिलेल्या फिर्यादीत म्हटले आहे. दरम्यान चोरट्याने सोबत येतानाच चाव्यांचा पुंजका सोबत आणला होता. त्यांच्या जवळील चाव्यांनी कपाटाचे लॉक उघडले. तसेच आतील छोट्या कपाटाचे ही लॉक त्यांच्या चावीने उघडल्याचे निदर्शनास आले. चोरट्यांनी आणलेल्या चाव्यांचा पुंजका घाई गडबडीत सदर ठिकाणीच टाकून गेले आहेत. या घटनेवरुन असे दिसून येते की, चोरट्यांनी चावीवाल्याकडून चाव्या आणून चोरी केल्याचे उघड झाले आहे. यांच्या शेजारी असलेल्या अरुण जाधव या शेतर्कयाचेही एक डझन कोंबड्या अज्ञात चोरट्यांनी चोरुन नेल्याची घटना घडली आहे. रहाटेवाडी येथील जयसिंग काशिनाथ पवार यांच्याही घरात चोरट्यांनी प्रवेश करुन कपाटातील लॉकरमध्ये ठेवलेले सोन्याचे दागीने व रोख रक्कम असा दोघांचा मिळून ३ लाख ५५ हजार रुपयाच्या मुद्देमालाची चोरी झाल्याची फिर्यादीत नोंद झाली आहे. या चोरीच्या घटनेनंतर स्वत: पोलीस निरीक्षक दत्तात्रय बोरीगिड्डे यांनी धावती भेट देवून घटनास्थळांची पाहणी केली. आत्तापर्यंत मंगळवेढा शहर,बोराळे, रहाटेवाडी व माचणूर या परिसरात चोंया होवूनही चोरटे पकडण्यात पोलीसांना अपयश आल्याने चोरटे मुजोर होवू पाहत आहे. पोलीसांनी आधुनिक कौशल्याचा वापर करुन चोरट्यांचा शोध घेवून त्यांना जेरबंद करावे अशी मागणी होत आहे.



**सोलापूरचे श्वान पथक; परंतु यश नाही**

चोरट्यांनी चोरी करुन जाताना नांदे यांच्या चपल्या व पँट ही घेवून गेले आहेत. चोरट्यांनी येताना चावीचा पुंजका आणून त्या चाव्यांनी कपाट उघडून चोरी केली आहे. सदरच्या चाव्या सोबत न नेता गडबडीत कपाटालाचे ठेवून गेले आहेत. सोलापूरहून श्वान पथक मागविण्यात आले मात्र चोरट्याचा मागोवा घेण्यात यश आले नाही.



## केम येथे वादळी वाऱ्यासह गारपीट शेतकऱ्याचे प्रचंड नुकसान

**तभा वृत्तसेवा,**
**जेऊर दि.२३ एप्रिल-**

केम (ता.करमाळा) येथे बुधवारी २२ एप्रिल रोजी सायंकाळी साडेपाच ते सहाच्या सुमारास अचानक काळे ढग आले सुरूवातीला भोगेवाडी येथे वादळीवाऱ्यासह जोरदार पावसाला सुरुवात झाली या मध्ये गारपीट झाली त्यांनंतर जोरदार वारे सुटल्याने हा पाऊस पठाडाच्या शिवारात वादळीवाऱ्यासह जोरदार गारपीट झाली या मध्ये शेतकऱ्यांचे आंबा व उन्हाळी कांदा पिकाचे लाखो रू नुकसान झाले या मध्ये उत्तरेश्वर सावता राम तळेकर यांचे दिड एकर आंबा ची बाग आहे या बागेतील आंबे आता काढायला आली व्यापारी बघुन गेले होते गारपीट व वाऱ्यामुळे आंबे खाली पडून पसरंग झाली या मध्ये सुमारे सात लाख रू नुकसान झाले तसेच केमेश्वर सुरवसे यांची दिड एकर बाग अंदाजे सात लाख रुपये पांडुरंग जाधव यांची एक एकर आंबा च्या बागेचे सहा लाख रुपये नुकसान तसेच बिभीषण तळेकर यांचे आंबाचे नुकसान झाले तसेचे केमेश्वर सुरवसे यांची दिड एकर कांदा भुईसपाट झाला आहे अंदाजे सहा लाख रू नुकसान संजय जाधव यांची पण एक एकर कांदा अंदाजे दोन लाख संतोष तळेकर दिड एकर कांदा अंदाजे चार लाख र नुकसान ऊत्तरेश्वर बिचितकर कांदा दिड एकर अंदाजे पाच लाख भैरू बिचितकर एक एकर कांदा तीन लाख रू नुकसान झाले मोठ्या प्रमाणावर पठाडशिवारात शेतकऱ्यांचे नुकसान झाले आहे

# बार्शीत जनगणना प्रशिक्षणाला सुरुवात

**२५१ कर्मचाऱ्यांचा सहभाग**

**अचूक व योग्य माहिती देऊन सहकार्य करावे : मुख्याधिकारी मुलाणी**



**तभा वृत्तसेवा**
**बार्शी दि.२३ एप्रिल-**

बार्शी शहरातील आगामी जनगणना प्रक्रियेसाठी प्रशासकीय तयारीला वेग आला असून, मुख्याधिकारी तैमुर मुलाणी यांच्या उपस्थितीत प्रगणक व पर्यवेक्षकांचे प्रशिक्षण सुरु करण्यात आले आहे. बार्शीतील सुलाखे हायस्कूल येथे २३, २४ व २५ एप्रिल या कालावधीत प्रशिक्षणाच्या पहिल्या टप्प्याला प्रारंभ झाला.

केंद्र सरकारच्या मार्गदर्शक तत्वांनुसार जनगणनेची प्राथमिक प्रक्रिया सुरु करण्यात आली असून, शहरासाठी एकूण १९६ प्रगणक, ३३ पर्यवेक्षक व २२ राखीव कर्मचारी अशी २५१ जणांची टीम तयार करण्यात आली आहे. या सर्वांना तीन टप्प्यांत प्रशिक्षण देण्यात येणार आहे. पहिल्या टप्प्यासाठी १०० प्रशिक्षणार्थींची निवड करण्यात आली होती. त्यापैकी ९८ कर्मचारी प्रशिक्षणासाठी उपस्थित राहिले, तर अनुपस्थित राहिलेल्या दोन कर्मचाऱ्यांना मुख्याधिकारी तैमुर मुलाणी यांनी कारणे दाखवा नोटीस बजावली आहे.

प्रशिक्षणाबाबत माहिती देताना मुख्याधिकारी तैमुर मुलाणी यांनी सांगितले की, प्रशिक्षणाचे तीन टप्पे नियोजित केले असून पहिला टप्पा २३ ते २५ एप्रिल, दुसरा टप्पा २७ ते २९ एप्रिल आणि अंतिम टप्पा ४ ते ६ मे दरम्यान पार पडणार आहे. या माध्यमातून सर्व २५१ कर्मचाऱ्यांना जनगणनेचे सविस्तर प्रशिक्षण दिले जाणार आहे. जनगणना प्रक्रियेविषयी नागरिकांना माहिती देताना त्यांनी सांगितले की, १ मे ते १५ मे दरम्यान जनगणनेची रुपरेषा निश्चित केली जाईल. त्यानंतर १६ मे ते १४ जून या कालावधीत प्रगणक घरोघरी भेट देऊन घरांची व इमारतींची नोंदणी करतील. या काळात नागरिकांनी अचूक व संपूर्ण माहिती देऊन सहकार्य करावे, असे आवाहन करण्यात आले.

भारत की जनगणना 2027 CENSUS OF INDIA जनगणना से जन कल्याण

देशाच्या विकासासाठी आणि भविष्यातील नियोजनासाठी जनगणनेतील माहिती अत्यंत महत्त्वाची ठरते. पायाभूत सुविधा, विविध योजना आणि विकासकामे यासाठी ही माहिती आधारभूत ठरत असल्याने नागरिकांनी जबाबदारीने सहभाग नोंदवावा, असेही प्रशासनाने स्पष्ट केले.

या प्रशिक्षण शिबिरास उपमुख्याधिकारी राजाराम नरोटे, सुलाखे हायस्कूलचे प्राचार्य रामकृष्ण इंगळे, उपप्राचार्य प्रसन्न देशपांडे तसेच प्रशिक्षण अधिकारी वैभव पायगुडे, शुभम गुजर, संजय इंगोले व पवन परिहार उपस्थित होते.

## प्रताप क्रीडा मंडळाच्या मोफत उन्हाळी क्रीडा व कला प्रशिक्षण शिबिराचा प्रारंभ



**तभा वृत्तसेवा**
**अकलूज, दि. २३ एप्रिल-**

ग्रामीण भागातील खेळाडूंना खेळांचे व्यासपीठ उपलब्ध व्हावे, त्यांना उत्कृष्ट प्रशिक्षण मिळावे तसेच त्यांच्या अंगी असलेल्या सुप्त कलागुणांना वाव मिळावा या उद्देशाने प्रताप क्रीडा मंडळ, शंकरनगर-अकलूज यांच्या वतीने मंडळाचे संस्थापक अध्यक्ष जयसिंह मोहिते-पाटील, अध्यक्षा स्वरूपाराणी मोहिते-पाटील, स्पर्धा संयोजन समिती प्रमुख सयाजीराजे मोहिते पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली२३ ते २६ एप्रिल या कालावधीत मोफत उन्हाळी क्रीडा व कला प्रशिक्षण शिबीराचा प्रारंभ झाला.

सहकार महर्षी शंकरराव मोहिते पाटील अभियांत्रिकी महाविद्यालय शंकरनगरच्या मैदानावर या स्पर्धेचे उद्घाटन प्राचार्य डॉ. प्रवीण ढवळे यांच्या हस्ते झाले. या वेळी मंडळाचे उपाध्यक्ष पोपटराव भोसले पाटील, संजय झंजे,सागर फुले, राष्ट्रीय खेळाडू सार्थक काळे, सुजल धडांबे,सचिव बिभीषण जाधव आदी उपस्थित होते.

सदरचे हे ४५ वे उन्हाळी क्रीडा प्रशिक्षण शिबीर असून शिबिरामुळे अनेक राज्य व राष्ट्रीय खेळाडू तयार झाले आहेत. प्रताप क्रीडा मंडळाने राज्यात वेगळा ठसा उमटवलेला आहे. सदरचे शिबिर विद्यार्थ्यांसाठी मोफत असूनया शिबिरात रोज सकाळी ७ ते १० या वेळेत वेटलिफ्टिंग, हॉलीबॉल, ॲथलेटिक्स, कबड्डी व योगासने या खेळांचे प्रशिक्षण दिले जाणार आहे. कला शिबिरामध्ये कागदकाम व रांगोळी कार्यशाळांचे आयोजन करण्यात आले असल्याचे उपाध्यक्ष पोपटराव भोसले पाटील यांनी सांगितले.

क्रीडा प्रशिक्षक म्हणून अरविंद वाघमोडे,संजय राऊत ,उमेश भिंगे, भीमाशंकर पाटील, प्रदीप पांढरे, दादा कोकाटे, निलप्पा बनसगोळकर, यशवंत माने देशमुख, भीमराव दुधाळ, मल्हारी मगर, दादाभाई सय्यद, अनिल मोहिते, अण्णा साळुंखे, रामचंद्र लोंढे, बाळासाहेब भोसले तर कला शिबिरासाठी धन्यकुमार साळवे, सिद्धनाथ टिंगरे, दत्ता शिंदे, तानाजी काशीद, विशाल लिके, लक्ष्मण धोत्रे, शाम कुंभार, माधुरी भांगे आदी मार्गदर्शन करीत आहेत.

सुत्रसंचलन संजय राऊत यांनी केले. प्रशिक्षणार्थिना मंडळाच्या वतीने खाऊ वाटप करण्यात आले.

## धावपटू अमोल आमुनेला आर्थिक सहकार्य



**तभा वृत्तसेवा,**
**सांगोला,दि.२३ एप्रिल -**

एखतपुर (ता. सांगोला) येथील व सध्या सांगोला महाविद्यालयात शिकणारा अमोल आमुने हा धावपटू यास ४६ हजार ५०५ रुपयांचे आर्थिक सहाय्य करण्यात आले.

अमोल बी.ए. तृतीय वर्षाचे शिक्षण घेत आहे. राज्य व राष्ट्रीय स्तरावरील अनेक धावण्याच्या स्पर्धांमध्ये त्याने बक्षिसे मिळवली आहेत. ऑलिम्पिकला जाण्याची त्याची इच्छा आहे, परंतु परिस्थिती नसल्यामुळे त्याला रनिंगसाठी आवश्यक असलेले गार्मीन वॉच, स्पोर्ट शूज तो घेऊ शकत नव्हता. अमोल बाबर यांच्या मदतीने त्याने आपुलकी प्रतिष्ठानशी संपर्क साधला. आपुलकीच्या पुढाकारातून प्रा.महामुनी यांचे सक्सेस क्लासेस त्याचबरोबर समाजातील दानशूर व्यक्तीकडून २१ हजार ५०५ व सांगोला महाविद्यालयातील प्राध्यापक, प्राचार्य, सेवानिवृत्त प्राध्यापक, कर्मचारी यांच्या सहकार्यातून २५ हजार असे एकूण ४६ हजार ५०५ रुपये २४ तासात देणगी जमा झाली होती.

त्यातून त्याला रनिंगसाठी आवश्यक असलेले २४ हजार ९०० रुपयांचे गार्मिन वॉच घेऊन देण्यात आले तर शूज साठी २१ हजार ६०५ रुपयाचा धनादेश संस्था सहसचिव साहेबराव ढेकळे, सदस्य सुरेश फुले यांच्या हस्ते प्राचार्य डॉ.सुरेश भोसले, आपुलकीचे अध्यक्ष राजेंद्र यादव यांच्या उपस्थितीत देण्यात आला. तसेच त्याला वैयक्तिक मासिक खर्चासाठी दरमहा ६ हजार रुपये देण्याची जबाबदारी आपुलकीचे सदस्य शशिकांत येलपले यांनी स्वीकारली. प्रास्ताविक प्रा.डॉ.विधिन कांबळे यांनी केले.

**सांगोला तालुक्याचे नाव उज्वल करू**


या प्रसंगी अमोल आमुने याने मनोगतात मिळालेली देणगी लाख मोलाची असून ती कायम स्मरणात राहील तसेच आगामी विविध स्पर्धामध्ये घवघवीत यश संपादन करू आणि सांगोला तालुक्याचे नाव उज्वल करू असा आत्मविश्वास व्यक्त केला.

## वरळेगाव येथे रविवारी कुस्ती मैदान

**सोलापूर, दि. २३ एप्रिल-**

भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त क्रांती बहुउद्देशीय मागासवर्गीय सामाजिक संस्थेच्यावतीने वरळेगाव (ता. दक्षिण सोलापूर) येथे रविवार २६ एप्रिल रोजी दुपारी ३ वाजता शहर व जिल्ह्यातील मल्लांसाठी कुस्ती मैदान आयोजिल्याची माहिती संस्थेचे संस्थापक अध्यक्ष किशोर चौधरी व सखाराम वाघ यांनी दिली.

डॉल्बी व डिजेला फाटा देवून या स्पर्धा भरविण्यात येत आहेत. लोप पावत असलेल्या कुस्ती या खेळाला प्रोत्साहन देण्यासाठी संस्थेच्यावतीने हा उपक्रम राबवण्यात येत आहे. १०० रुपये ते ३१ हजार रुपयेपर्यंतच्या कुस्त्या लावण्यात येणार आहेत. यावेळी स्पर्धेत विजयी होणाऱ्या मल्लांना रोख बक्षीस व ट्रॉफी देण्यात येणार आहे. विजेत्या मल्लांना देण्यात येणाऱ्या बक्षीसापैकी २० टक्के रक्कम ही उपविजेत्या मल्लांना देण्यात येणार आहे. सुमारे ४०० स्पर्धक सहभागी होणार आहेत. यावेळी कुस्ती पंच म्हणून वस्ताद भरत मेकाले (उपमहाराष्ट्र केसरी विजेता) व पै. आप्पासाहेब साखरे (बोरामणी), महेश सरवदे (लाल आखाडा तालीम सोलापूर) तसेच छत्रगुण माने (संपर्क प्रमुख संभाजी बिग्रेड), सखाराम वाघ (उपप्रमुख शिवसेना उबाठा दक्षिण सोलापूर) हे काम पाहणार आहेत. या पत्रकार परिषदेला शत्रुघ्न माने, अप्पा साखरे, गौतम चौधरी उपस्थित होते.



## सोलापूर विद्यापीठाचा ‘गतका’ संघ अखिल भारतीय स्पर्धेसाठी रवाना

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २३ एप्रिल-**

राजस्थानमधील कोटा येथे २५ आणि २६ एप्रिल रोजी होणाऱ्या ‘अखिल भारतीय आंतरविद्यापीठ गतका स्पर्धे’साठी पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठाचा संघ सज्ज झाला आहे. या स्पर्धेसाठी निवड झालेल्या खेळाडूंचे सराव शिबिर नुकतेच छत्रपती शिवाजी रात्र महाविद्यालयात झाले असून हा संघ गुरुवारी स्पर्धेसाठी रवाना झाला. या संघाला छत्रपती शिवाजी नाईट कॉलेजचे प्रा. संतोष गवळी यांचे मोलाचे तांत्रिक मार्गदर्शन लाभले आहे.



संघास विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. प्रकाश महानवर, प्रभारी कुलसचिव तथा क्रीडा व शारीरिक शिक्षण विभागाचे संचालक डॉ. अतुल लकडे, मराठा समाज सेवा मंडळाचे अध्यक्ष माजी महापौर मनोहरपंत सपाटे, छत्रपती शिवाजी रात्र महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. नितीन मोटे आणि प्रा. अमोल वाघमोडे यांनी संघाला यशासाठी शुभेच्छा दिल्या.

**संघ :** रमेश धोडमणी, आर्यन चव्हाण, रोहित तेलंग, बसवराज शेंडगे (छत्रपती शिवाजी नाईट कॉलेज), सुमित बनसोडे (केबीपी, पंढरपूर), शंकर धोत्रे व गुरुप्रसाद स्वामी (डीएसजी कॉलेज, मोहोळ) संघ व्यवस्थापक : प्रा. विशाल गाडेकर.

# नगराध्यक्षांची शून्य कामगिरी; नगरसेवकांना करावी लागत आहे पदरमोड : समीर मुलाणी

**तभा वृत्तसेवा,**
**कुर्डुवाडी, दि.२३ एप्रिल-**

कुर्डुवाडी नगरपरिषदेच्या नगराध्यक्षा जयश्री भिसे यांनी शहर विकासाचा एकही विषय पटलावर न घेता केवळ नागरिकांची दिशाभूल सुरु केली आहे. त्यांची आजवरची कामगिरी शून्य आहे, असा खळबळजनक आरोप राष्ट्रवादी (अजित पवार गट) व रिपाइंचे गटनेते समीर मुलाणी यांनी केला आहे.

नगरपरिषदेत राष्ट्रवादी व रिपाइं युतीचे १३ उमेदवार निवडून आले असून स्पष्ट बहुमत आमच्याकडे आहे. मात्र, नगराध्यक्षा आमच्या गटाच्या नसल्यामुळे त्या आकसापोटी कामे रोखत आहेत. गेल्या दोन सभांमध्ये आम्ही १० प्रभागांतील ६२ महत्त्वाचे विषय दिले होते. मात्र त्यांनी एकही विषय अजेंड्यावर घेतला नाही. शहरातील वार्षिक टेंडर्स अद्याप फोडण्यात आलेली नाहीत. त्यामुळे पथदिवे, पाण्याचे व्हॉल्व्ह, पाईपलाईन आणि घंटागाडी



दुरुस्तीसाठी नगरसेवकांना पदरमोड करावी लागत आहे. विशेष म्हणजे, सोलापूर डिपीओ यांना पत्र देऊनही नगराध्यक्षांनी त्याकडे जाणूनबुजुन दुर्लक्ष करीत आहेत.

जिथे घरे नाहीत अशाठिकाणच्या रस्ते कामांसाठी ४ कोटी रुपये खर्च केले जाणार आहेत. केवळ श्वान नसबंदी, करमाफी यांसारखे विषय घेऊन शहर विकासाला फाटा दिला जात आहे. चार विषय प्रलंबित असताना केवळ अनुकंपा या एकाच विषयाचा समावेश करण्यात आला, असेही त्यांनी सांगितले. यावेळी आरपीआयचे राज्य उपाध्यक्ष बापूसाहेब जगताप, पाणीपुरवठा सभापती अमर माने, शिक्षण सभापती संजय टोणपे, आरोग्य सभापती डॉ.मोहसीन मकनू, नगरसेवक जगन्नाथ क्षीरसागर, आनंद कदम, वसीम मुलाणी, निवृत्ती गोरे, राष्ट्रवादी शहराध्यक्ष दत्ताजी काकडे, महेश गांधी, ॲड. हरिश्चंद्र कांबळे, श्रीकांत पाटील आदी उपस्थित होते.

# ठेकेदारांशी हातमिळवणी करुन त्यांनी केली तीनशे कोटींची निकृष्ट कामे : नगराध्यक्षा

## त्यांनी दिलेल्या कामांची शहानिशा केल्याशिवाय मंजुरी देणार नाही

**तभा वृत्तसेवा,**
**कुर्डुवाडी, दि.२३ एप्रिल-**

माझ्यावर नाहक आरोप करणारे गटनेते व तत्कालिन नगराध्यक्षांनी त्यांच्या कार्यकाळात ठेकेदारांशी हातमिळवणी करुन तीनशे कोटींची कामे तेही निकृष्ट दर्जाचे केली आहेत, असा पलटवार नगराध्यक्षा जयश्री भिसे यांनी केला.

आपण स्वतः दररोज पहाटे उठून शहरात सर्वत्र फिरुन काम करत आहे. नागरिकांच्या मुलभूत गरजावर यशस्वीपणे लक्ष देवून जनतेची कामे करत आहे. दहा दिवसाआड येणारे येणारे पिण्याचे पाणी एकदिवसाआड पाणी मिळत आहे. मुस्लिम बांधवांसाठी आ.नारायण पाटील यांनी १० लाख रुपये मंजूर केले ते काम का



केले नाही? असा सवाल उपस्थित करत त्या लोकांनी दिलेल्या कामांची पुर्णतः शहानिशा केल्याशिवाय मंजुरी दिली जाणार नाही, असे त्यांनी स्पष्ट केले. कुर्डुवाडी शहरात एम आयडीसी मंजूर आहे. मात्र येथील व्यवसाय-उद्योग वाढीसंदर्भात समीर मुलाणी आणि इतरांनी एकतरी पत्र दिले आहे का? याबाबत त्यांनी आत्मपरीक्षण करावे, असा उपरोधिक सल्लाही त्यांनी दिला. त्यांच्या कार्यकाळात २१ गाळे आधीच रिकामे असतांना साडेतीन कोटी रुपये खर्चूच ५२ गाळे कशासाठी बांधले? त्या शॉपिंग सेटरला झाकीर हुसेन किंवा एपीजे अब्दुल कलाम यांचे का नाव दिले नाही? असा सवालही उपस्थित केला.

तत्कालीन नगराध्यक्षांनी कुर्डु हद्दीत बेंद ओढ्याच्या पुढे रस्ता त्यांच्या शेतात जाण्यासाठी केला आहे का? असा सवालही त्यांनी उपस्थित केला. यावेळी नगरसेविका अंजली गावडे, अबोली चौधरी, सरस्वती क्षीरसागर, रेश्मा गोरे उपस्थित होते.

# स्मार्ट सिटी योजना झाली बंद

## १६०० कोटींमधून ४६ प्रकल्प पूर्ण

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.२३ एप्रिल-**

केंद्र शासनाच्या स्मार्ट सिटीची योजना शासनाकडून बंद करण्यात आली आहे. या योजनेअंतर्गत सोलापुरात एकूण ४६ प्रकल्प पूर्ण केले आहेत. त्याचे हस्तांतरणही महापालिकेकडे झाले आहे. १६०० कोटी रुपयांचा निधी यासाठी खर्च करण्यात आला आहे. यामध्ये उजनी दुहेरी जलवाहिनी कामाचाही समावेश आहे, असे सोलापूर स्मार्ट सिटी कार्पोरेशन कंपनीचे मावळते चेअरमन तथा मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. सचिन ओम्बासे यांनी सांगितले.

स्मार्ट सिटीच्या विशेष उद्देश वाहनाचीची स्थापना केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सूचना व महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियममधील तरतुदीनुसार करण्यात आली होती. या विशेष वाहनाच्या संरचना व कार्यपद्धतीबाबत महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ च्या तरतुदीनुसार वेळोवेळी निर्देश देण्याचे अधिकार राज्य शासनाकडे असतील, अशी नगर विकास विभागाच्या शासन निर्णयान्वये तरतूद करण्यात आली आहे.

केंद्र शासन, राज्य शासनाने दिलेल्या सूचना, आदेश सदर विशेष उद्देश वाहन वर बंधनकारक राहतील, असेही निर्देश देण्यात आले आहेत. पुढील कालावधीत या अभियानाकरिता केंद्र




शासनाकडून निधी प्राप्त होणार नसल्याने तसेच स्मार्ट सिटी स्मार्ट अभियानांतर्गतचे प्रकल्प डिसेंबर २०२५ पर्यत पूर्ण करण्याची केंद्र शासनाने दि.७ एप्रिल २०२५ च्या कार्यालयीन ज्ञापनाव्दारे दिलेली कालमर्यादाही संपुष्टात आली आहे. राज्य शासनाच्या नागरिकास विभागाने या संदर्भात शासन निर्णय जारी केला आहे. यानुसार अध्यक्ष, स्मार्ट सिटी SPV व इतर संचालक, स्मार्ट सिटी डझत यांना कार्यमुक्त करुन त्यांचे अधिकार संबंधित महानगरपालिकेच्या आयुक्तांकडे देण्यात येत आहे.

२०१६ मध्ये कंपनी स्थापन झाली होती. त्याचे कामकाज २०२५ पर्यंत हे कामकाज चालले. अखेर शासनाच्या आदेशानुसार ही कंपनी बंद करण्यात आली आहे. स्मार्ट सिटीची मालमत्ता हस्तांतर केल्यानंतर स्मार्ट सिटी मिशन करिता कंपनी कायद्यानुसार स्थापन करण्यात आलेली कंपनी बंद करण्याची स्वतंत्रपणे कार्यवाही संबंधित स्मार्ट सिटीचे मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी करावी, असे आदेश दिले आहेत.

# जिल्हाधिकाऱ्यांनी उच्चस्तरीय समितीच्या बैठकीत

## सव्वादोन तास पंढरपूर कॉरिडॉरचे केले प्रेझेंटेशन

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २३ एप्रिल-**

श्रीक्षेत्र पंढरपूरच्या श्री विठ्ठल-रुक्मिणी मंदिरातील कॉरिडॉर भूसंपादनासाठी पालकमंत्री जयकुमार गोरे, सोलापूरचे माजी जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांनी अथक परिश्रम करुन व्यापारी, रहिवाशांच्या बैठका घेवून चर्चा केली आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनीही या कॉरिडॉरबाबत आढावा घेतला. याबाबत उच्चस्तरीय समितीमध्येही नुकतीच विस्तारित चर्चा झाली आहे. या कॉरिडॉरबाबत मी स्वत: तब्बल सव्वादोन तास उच्चस्तरीय समिती सदस्यांसमोर प्रेझेंटेशन केले असल्याने या कामाला आता गती येईल, असा आशावाद जिल्हाधिकारी कार्तिकेयन एस. यांनी दैनिक तरुण भारतशी बोलनाना व्यक्त केला.

श्री विठ्ठल-रुक्मिणी मंदिर परिसरात वाराणसीच्या धर्तीवर सुमारे ४ हजार कोटींचा भव्य 'कॉरिडॉर' प्रकल्प नियोजित आहे, ज्याची मंजुरी अंतिम टप्प्यात आली आहे. उच्चस्तरीय समितीच्या मंजुरीनंतर प्रकल्पास शिखर समितीची मान्यता मिळणार आहे. यानंतरच या कॉरिडॉरचे काम सुरू होणार आहे. या प्रकल्पामुळे प्राचीन मठ-मंदिरे आणि घरांचे नुकसान होईल; यामुळे स्थानिक रहिवासी, व्यापारी यांनी याला तीव्र विरोध केला होता. याबाबत मागील जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांनी सलग २ ते ३ वेळा बैठका घेवून स्थानिक नागरिक, स्थानिक महाराज मंडळी यांच्याशी विस्ताराने चर्चा केली आहे. जिल्हा प्रशासनाने जबरदस्तीने भूसंपादन करणार नाही, असेही यापूर्वी स्पष्ट केले आहे आणि यापुढेही आम्ही याच भूमिकेत राहून स्थानिकांना विश्वासात घेवून हे काम मार्गी लावणार आहे. पंढरपूर



विकास आराखड्यानुसार, विठ्ठल मंदिर परिसराच्या विकासासाठी कॉरिडॉरची योजना असून, शिखर समितीच्या मान्यतेनंतर आणि स्थानिकांना विश्वासात घेवून लवकरच निविदा प्रक्रिया पूर्ण होईल. स्थानिकचे काही नागरिक व व्यापाऱ्यांचा मठांच्या पाडकामाला विरोध असून, भूसंपादन करताना कोणावरही जबरदस्ती केली जाणार नाही, असेही त्यांनी स्पष्ट केले.

### जलपर्यटन, आयटी पार्कबाबत बैठक

उजनी जलपर्यटन, आयटी पार्कच्या कामाची विस्ताराने माहिती घेण्यासाठी आमच्या अधिकाऱ्यांशी आणि त्याच्याशी संबंधित कर्मचाऱ्यांची आढावा बैठक शनिवार, २५ एप्रिल रोजी घेणार आहे, असेही नूतन जिल्हाधिकारी कार्तिकेयन एस यांनी एका प्रश्नाला उत्तर देताना सांगितले.



# डी मार्ट, डॉ.आंबेडकर उद्यान परिसरातील अतिक्रमण हटविले

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.२३ एप्रिल-**

सोलापूर महापालिका अतिक्रमण प्रतिबंधक विभागाच्या वतीने हाती घेण्यात आलेल्या अतिक्रमण हटाव मोहिमेतंर्गत जुळे सोलापुरातील डी मार्ट आणि न्यू बुधवार पेठ येथील डॉ.बाबासाहेब आंबेडकर उद्यान परिसरातील अतिक्रमण हटविले. या कारवाईत दोन खोके, पत्रा शेड जागेवरच निष्काषित करण्यात आल्याची माहिती अतिक्रमण प्रतिबंधक विभागाचे अधीक्षक जगन्नाथ बनसोडे यांनी दिली.

पोलिस बंदोबस्तात ही कारवाई मोहीम राबविण्यात आली. या कारवाईच्या वेळी नागरिकांनी मोठी गर्दी केली होती.

दरम्यान, रस्त्याला अडथळा निर्माण होईल आणि सार्वजनिक ठिकाणी अतिक्रमण केल्यास जप्ती आणि इतर कारवाई करण्यात येईल, असा इशाराही महापालिका अतिक्रमण प्रतिबंधक विभागाचे अधीक्षक बनसोडे यांनी दिला आहे.

श्रीमान भाऊसाहेब गांधी जन्मशताब्दीनिमित्त

# 'डब्ल्यूआयटी'मध्ये आज मंगल आशीर्वचन सोहळा

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २३ एप्रिल-**

सोलापूरच्या शैक्षणिक क्षेत्राला दूरदृष्टी, शिस्त आणि मूल्याधिष्ठित कार्याचा भक्कम पाया घालणारे शिक्षणतपस्वी श्रीमान भाऊसाहेब गांधी यांच्या जन्मशताब्दी वर्षानिमित्त शुक्रवार, दि.२४ एप्रिल रोजी सकाळी ७.३० वाजता 'डब्ल्यूआयटी' मध्ये मंगल आशीर्वचन सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे.



२४ एप्रिल हा त्यांचा २४ वा स्मृतिदिन असल्याने या सोहळ्याला अधिकच भावपूर्ण आणि प्रेरणादायी स्वरुप प्राप्त झाले आहे. संतशिरोमणी आचार्य विद्यासागर महाराज यांचे परम शिष्य प.पू. मुनीश्री वीरसागरजी महाराज यांचे मंगल आशीर्वचन लाभणार आहे. त्यांच्या ओजस्वी व चिंतनशील मार्गदर्शनातून उपस्थितांना आत्मशुद्धी, संयम आणि मूल्यनिष्ठ जीवन जगण्याची प्रेरणा मिळणार आहे. मुनीश्री विशालसागरजी महाराज, धवलसागरजी महाराज, मंथनसागरजी महाराज, मननसागरजी महाराज, विरलसागरजी महाराज तसेच क्षुल्लकश्री विजितजी महाराज यांची पावन उपस्थिती या सोहळ्याची आध्यात्मिक उंची अधिकच अधोरेखित करणार आहे.हा कार्यक्रम सर्वांसाठी खुला असून, सोलापूरकरांनी उपस्थित रहावे, असे आवाहन आयोजकांनी केले आहे.




# निर्मलाताई ठोकळ : संघर्ष, संवेदना आणि सामाजिक बांधिलकीचा दीपस्तंभ

**जेष्ठ स्वातंत्र्यसैनिक, गांधीवादी विचारांचे पुरस्कर्ते आणि माजी खासदार स्व. तुळशीदास दादा जाधव यांच्या कन्या, माजी आमदार स्व. निर्मलाताई ठोकळ यांची जयंती ही केवळ स्मरणाची नव्हे, तर चिंतनाची आणि प्रेरणेची संधी आहे. त्यांच्या आयुष्याचा प्रवास हा एका व्यक्तीचा इतिहास नसून, तो स्वातंत्र्योत्तर भारतातील सामाजिक, राजकीय आणि सांस्कृतिक परिवर्तनाचा साक्षीदार आहे. संघर्षातून उभा राहिलेला हा प्रवास केवळ यशाचा आलेख नाही, तर तो मूल्यांचा, विचारांचा आणि जनसेवेच्या निष्ठेचा दीपस्तंभ आहे.**

### स्वातंत्र्याची पहाट, देशभक्तीचे संस्कार

निर्मलाताईंना स्वतंत्र भारताची पहिली पहाट पाहण्याचे भाग्य लाभले. त्यांच्या बालपणीच देशभक्तीचे बाळकडू त्यांना घरातून मिळाले. वडील स्वातंत्र्यसैनिक असल्यामुळे देशासाठी जगण्याची आणि झटण्याची प्रेरणा त्यांना लहानपणापासून मिळाली. स्वातंत्र्यपूर्व काळात तुळशीदास दादा जाधव यांनी केलेल्या कार्याची दखल घेत पंडित जवाहरलाल नेहरू यांनी त्यांना लोकसभेत काम करण्याची संधी दिली. या वातावरणात वाढलेल्या निर्मलाताईंच्या विचारांमध्ये सामाजिक बांधिलकी आणि जनसेवेची तळमळ नैसर्गिकपणे रुजली.



### सामाजिक कार्यातून राजकारणात प्रवेश

निर्मलाताईंचा राजकारणात प्रवेश हा सत्तेच्या मोहातून नव्हता, तर समाजकारणाच्या नैसर्गिक विस्तारातून झाला. त्या आधीपासूनच विविध सामाजिक उपक्रमांमध्ये सक्रिय होत्या. त्यांच्या कार्याची दखल घेऊन पक्षाने त्यांना सोलापूर नगरपालिकेत काम करण्याची संधी दिली. १९६१ ते १९७१ या कालावधीत त्यांनी नगरपालिकेत काम करताना शहराच्या विकासाला नवे आयाम दिले. त्यांच्या कार्यपद्धतीत शिस्त, पारदर्शकता आणि जनतेशी असलेले थेट नाते ही वैशिष्ट्ये होती. त्यांनी विकासाला केवळ पायाभूत सुविधांपुरते मर्यादित ठेवले नाही, तर मानवी विकासालाही तितकेच महत्त्व दिले.

### विधानसभेतील प्रभावी नेतृत्व

निर्मलाताईंच्या कामाची दखल घेत इंदिरा गांधी यांनी त्यांना विधानसभेत प्रतिनिधित्व करण्याची संधी दिली. सोलापूर शहरातून त्या प्रचंड मताधिक्याने निवडून आल्या. विरोधकांचे डिपॉझिट जप्त होणे हे त्यांच्या लोकप्रियतेचे द्योतक होते. आमदार म्हणून त्यांनी महिला सक्षमीकरण, झोपडपट्टी निर्मूलन, अंधश्रद्धा निर्मूलन, स्त्रीभ्रूणहत्या आणि दुष्काळ यांसारख्या ज्वलंत प्रश्नांवर प्रभावी आवाज उठवला. त्यांच्या प्रश्नांची सरासरी संख्या दरवर्षी १६५ पेक्षा जास्त होती, जी त्यांच्या अभ्यासू वृत्तीची साक्ष देते.

### संवेदनशील नेतृत्वाची परीक्षा

१९७२ च्या भीषण दुष्काळाने महाराष्ट्र होरपळून निघाला होता. शेतकरी उपासमारीच्या उंबरठ्यावर होते. अशा वेळी निर्मलाताईंनी नागपूर अधिवेशनात शेतकऱ्यांची अवस्था दाखवण्यासाठी त्यांनी खात असलेली भाकरी सभागृहात सादर केली. हा केवळ प्रतीकात्मक नव्हे, तर अत्यंत प्रभावी आणि हृदयस्पर्शी प्रयत्न होता. त्यांच्या या कृतीमुळे शासन यंत्रणा तत्काळ हलली आणि मदतीची चक्रे वेगाने फिरली. सोलापूरला परतण्यापूर्वीच अन्नधान्य, पाणी आणि चाऱ्याची व्यवस्था करण्यात आली. हे त्यांच्या संवेदनशील नेतृत्वाचे उत्तम उदाहरण आहे.

### शिक्षण क्षेत्रातील भरीव योगदान

महाराष्ट्र शिक्षण प्रसारक मंडळाच्या माध्यमातून त्यांनी बहुजन समाजातील मुला-मुलींसाठी शैक्षणिक संकुल उभारले. तंत्रज्ञान शिक्षणाचे महत्त्व ओळखून त्यांनी सोलापूर जिल्ह्यात पहिले तंत्रनिकेतन महाविद्यालय सुरू केले होते संस्थेच्या माध्यमातून हजारो अभियंते घडवले ही संस्था त्यांच्या दूरदृष्टीची साक्ष देते. शिक्षण हे सामाजिक परिवर्तनाचे प्रभावी साधन आहे, यावर त्यांचा ठाम विश्वास होता.

### साहित्य, सांस्कृतिक क्षेत्रातील योगदान

२००६ मध्ये ७९ वे अखिल भारतीय साहित्य संमेलन सोलापूर येथे यशस्वीपणे आयोजित करण्यात त्यांनी पुढाकार घेतला. या संमेलनाचे वैशिष्ट्य म्हणजे एका महिलेने केलेले नेतृत्व. यापूर्वी कोणत्याही साहित्य संमेलनात महिला नेतृत्व नव्हते. या कार्याबद्दल सोनिया गांधी आणि शरद पवार यांनी गौरवोद्गार काढले. त्यांनी हे संमेलन केवळ यशस्वीच नव्हे, तर संस्मरणीय बनवले. आज त्या आपल्यात नसल्या तरी त्यांच्या कार्यातून त्या जिवंत आहेत. त्यांच्या जयंतीनिमित्त आपण केवळ त्यांना अभिवादन न करता त्यांच्या विचारांचा वारसा पुढे नेण्याचा संकल्प केला पाहिजे.

**- डॉ. नितीन रंगनाथ आवताडे**
महाराष्ट्र शिक्षण प्रसारक मंडळ, बाळे




हे पत्र मुद्रक व प्रकाशक दिलीप शिवमुर्ती दुलंगे यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लिमिटेड करिता, सोलापूर तरुण भारत कार्यालय १९/२० औद्योगिक वसाहत, होटगी रोड, सोलापूर येथे छापून सोलापूर, धाराशिव, लातूर,संपूर्ण मराठवाडा तसेच पश्चिम महाराष्ट्र सातारा,सांगली,कोल्हापूर येथील सोलापूर तरुण भारतच्या विभागीय कार्यालयातून प्रकाशित करून वितरीत केले. ● प्रबंध संपादक : विवेक कृष्णाजी घळसासी. ● समूह मुख्य संपादक : दिलीप यशवंत पेठे.● मुख्य संपादक :प्रशांत वसंतराव माने दैनिक सोलापूर तरुण भारत रजि.नं.G2/RNP/SLP/D/32/2024-26.RNI Reg.No.46878/87. दूरध्वनी -संपादकीय-(०२१७)-२६००४९८ ● जाहिरात विभाग (०२१७)-२६००३९८. E-mail starunbharatgmail.com. ● Website:http://dainiktarunbharat/ या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक/संचालक सहमत असतीलच असे नाही. (पी. आर. बी. कायद्यानुसार जबाबदारी)

Mr. Dilip Shivmurthi Dulange is the publisher on behalf of the Company **Solapur Tarun Bharat Media Limited.**, and Daily Solapur Tarun Bharat. We print/publish and distribute these Editions like Solapur, Dharashiv, Latur Nanded, Parbhani, Hingoli, Jalna, and Beed from Register Address 19/20, Industrial Estate, Hotgi Road, Solapur – 413003. ● **Mr. Vivek Krishnaji Ghalsasi** - Dissertation Editor / ● **Mr. Dilip Yeshwant Pethe** - Group Chief Editor ● **Mr. Prashant Vasantrao Mane** - Chief Editor, Daily Solapur Tarun Bharat Postal Register No. G2/RNP/SLP/D32/2024-26. RNI Register No. 4687/87. Editorial Department Tel. No. – 0217-2600398) **Email ID starunbharat@gmail.com** and Advertisement Department Tel. No. – 0217-2600498, ● Website: **https://dainiktarunbharat.com/**, ● Epaper: **https://epaper.dainiktarunbharat.com/.** The Editors / Directors do not necessarily agree with the views expressed in the news and articles published in this issue. (responsible as per PRB Act)

सोलापूर
# तरुण भारत
न मे कर्मफले स्पृहा
SOLAPUR TARUN BHARAT


## महत्वाचे...

### प्रा.परमेश्वर कमळे यांना पीएच.डी. प्रदान

**सोलापूर, दि. २३ एप्रिल-**

वालचंद कॉलेज ऑफ आर्टस् अ‍ॅन्ड सायन्सचे प्रा.परमेश्वर कमळे यांना पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठाकडून पीएच. डी. पदवी प्रदान करण्यात आली. जिल्ह्यातील मत्स्य व्यवसायाचा चिकित्सात्मक आर्थिक अभ्यास या विषयावर त्यांनी शोधनिबंध सादर केले होते. याकामी त्यांना दयानंद कला व शास्त्र महाविद्यालयाचे प्राचार्य प्रा.डॉ.बी.एच.दामजी यांचे मार्गदर्शन लाभले. वालचंदचे प्राचार्य डॉ. संतोष कोटी, उपप्राचार्य डॉ.मनोहर जोशी, डॉ. राजशेखर हिप्परगी आदींनी अभिनंदन केले.



### भाजपा वैद्यकीय आघाडी सहसंयोजकपदी डॉ.पाटील

**सोलापूर, दि. २३ एप्रिल-**

भारतीय जनता पक्षाच्या वैद्यकीय आघाडीच्या पश्चिम महाराष्ट्र विभागाच्या सहसंयोजकपदी डॉ.शैलेश पाटील यांची नियुक्ती करण्यात आली आहे. वैद्यकीय आघाडीचे महाराष्ट्र प्रदेश प्रभारी तथा खासदार डॉ.अजित गोपछडे यांच्या स्वाक्षरीने नियुक्तीपत्र देण्यात आले. वैद्यकीय आघाडीचे संयोजक डॉ.बाळासाहेब हरपळे यांनी ही नियुक्ती जाहीर केली.



# राज्यातील धरणांमध्ये गतवर्षीच्या तुलनेत १०१.७७ टीएमसी अधिकचा पाणीसाठा

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २३ एप्रिल-**

राज्यातील विविध धरणांमध्ये सुमारे ६५३.६३ टीएमसी पाणीसाठा उपलब्ध असल्याची माहिती आज झालेल्या राज्य मंत्रिमंडळाच्या बैठकीत देण्यात आली. गतवर्षीच्या तुलनेत यंदा १०१.७७ टीएमसी पाणीसाठा अधिकचा आहे. गतवर्षी हा साठा ५५१.८६ टीएमसी होता.

मात्र यंदा एल निनोच्या प्रभावामुळे पावसाच्या अनियमततेमुळे पुढील वर्षी टंचाईचा मुकाबला करता यावा; यासाठी पाणी जपून वापरा, असे आवाहन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केले. दरम्यान, राज्यातील सर्व धरणांतील पाणीसाठा व एन निनोचा प्रभाव याविषयी जलसंपदा विभागाचे अतिरिक्त मुख्य सचिव दीपक कपूर यांनी सादरीकरण केले. एल-निनोच्या प्रभावामुळे पाणीसाठ्यात २०१४ मध्ये १२ टक्के तर २०१५ मध्ये सुमारे १४ टक्के घट झाली होती. त्यामुळे दोन्ही वर्षी पाणीटंचाई निर्माण झाली होती. १५ ऑक्टोबर २०१४ रोजी ८७२ टीएमसी तर याचदिवशी २०१५ ला ६२५ टीएमसी पाणीसाठा होता. त्या तुलनेत २०२५ मध्ये १५ ऑक्टोबरला १३३०.९७ टीएमसी पाणीसाठा होता. हा पाणीसाठा २१ एप्रिल २०२६ रोजी ६५३.६३ टीएमसी आहे. गतवर्षीच्या गेल्या वर्षीच्या तुलनेत यंदा सुमारे १०१.७७ टीएससी पाणीसाठा अधिकचा आहे. धरणांतील पाणीसाठा आणि एल निनोचा प्रभाव याचा विचार करता पाण्याचा वापर काटकसरीने करावा, असे आवाहन यावेळी करण्यात आले.

**महसूल विभागनिहाय पाणीसाठा**

| महसूल | धरणांची संख्या | यंदाचा उपयुक्त पाणीसाठा | गतवर्षीचा पाणीसाठा (टीएमसीमध्ये) |
|---|---|---|---|
| नागपूर | ३८७ | ८०.७९ | ६३.४० |
| अमरावती | २७६ | ७३.७२ | ६५.१३ |
| छत्रपती संभाजीनगर | ९२९ | १२९.३७ | ९७.०९ |
| नाशिक | ५३९ | १०१.९६ | ८९.२८ |
| पुणे | ७२४ | २०६.५५ | १७४.०४ |
| कोकण | १७३ | ६१.२४ | ६२.९२ |
| एकूण | ३०२८ | ६५३.६३ | ५५१.८६ |

**प्रमुख धरणांतील पाणीसाठा**

| | धरण | यंदाचा उपयुक्त पाणीसाठा | गतवर्षीचा पाणीसाठा (टीएमसीमध्ये) |
|---|---|---|---|
| १. | कोयना | ३३.६२ | ३६.७६ |
| २. | जायकवाडी | ४२.०३ | ३४.४४ |
| ३. | उजनी | १३.३९ | ०० |
| ४. | पेंच प्रकल्प समूह | २६.५७ | २६.३५ |
| ५. | इसापूर | २१.४५ | १७.८२ |
| ६. | भातसा | १५.७० | १४.९१ |
| ७. | गोसीखुर्द | १४.३१ | ५.९३ |
| ८. | खडकवासला धरण | ११.३२ | ९.८२ |
| ९. | मुळा | ९.५४ | १०.५३ |
| १०. | अप्पर वर्धा | १०.२१ | ९.५३ |
| ११. | अप्पर वैतरणा | ६.५२ | ५.९५ |
| १२. | भंडारदरा | ५.२५ | ६.०४ |



# ‘सिध्देश्वर’चा २०० कोटींचा कर्ज प्रस्ताव ‘एनसीडीसी’कडून नामंजूर

### जिल्ह्यातील शेतकऱ्यांची ३० कोटी देणी बाकी

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २३ एप्रिल-**

सोलापूरच्या सिध्देश्वर सहकारी साखर कारखान्याचा २०० कोटी रुपयांचा कर्ज प्रस्ताव ‘एनसीडीसी’ने नामंजूर केला आहे. चालू वर्षातील ऊस उत्पादक शेतकऱ्यांची ३० कोटी रुपयांची देणी अद्याप बाकी आहेत. कारखान्याकडे यापूर्वीची देणीही प्रलंबित आहेत. आता ‘एनसीडीसी’नेही कर्ज प्रस्ताव नामंजूर केल्याने सिध्देश्वर कारखान्याच्या व्यवस्थापनासमोर मोठा आर्थिक प्रश्न उभा राहणार असल्याचे दिसून येते.

राज्यातील साखर कारखान्यांना विशेषतः आर्थिक अडचणीत असलेल्या सहकारी साखर कारखान्यांना राज्य आणि केंद्र सरकारच्या एनसीडीसी अर्थात नॅशनल को-ऑपरेटिव्ह डेव्हलपमेंट कॉर्पोरेशन माध्यमातून सवलतीचे कर्ज आणि आर्थिक मदत पुरवली जाते. या कर्जाचा मुख्य उद्देश कारखान्यांकडून ऊस उत्पादक शेतकऱ्यांना वेळेवर देयके देणे हा असतो. या कर्जासाठी राज्य सरकार कर्जहमी देत असते. राज्यातील एकूण १४ सहकारी साखर कारखान्यांचे प्रस्ताव सरकारने ‘एनसीडीसी’कडे दाखल केले होते. त्यात सोलापूर जिल्ह्यातील श्री सिध्देश्वर सहकारी साखर कारखान्याचा १९९ कोटी ९४ लाख रुपयांचा कर्ज प्रस्तावाचा समावेश होता. १४ पैकी केवळ ७ कारखान्यांचे प्रस्ताव मंजूर करण्यात आले आहे. कर्ज प्रस्ताव नामंजूर करण्यात आलेल्या ७ साखर कारखान्यांमध्ये सोलापूरच्या सिध्देश्वर साखर कारखान्याचाही समावेश आहे.

**‘सिध्देश्वर’वर कर्जाचा डोंगर**

बाहेरील मोठ्या व्याजदराचे कर्ज सिध्देश्वर साखर कारखान्याच्या दृष्टीने परवडणारे नाही. गेल्या काही वर्षांपासून शेतकऱ्यांच्या उसाची रक्कम थकवली जात आहे. कारखान्याचा वार्षिक लेखापरीक्षण अहवाल पाहता सिध्देश्वर साखर कारखान्यावर कर्जाचा डोंगर वाढत आहे. आता ‘एनसीडीसी’च्या या निर्णयामुळे सिध्देश्वर साखर कारखाना आणखीन आर्थिक गर्तेत सापडणार असल्याचे बोलले जात आहे.

# पशुधन वाढीसाठी प्रयत्न करा : सभापती चिवडशेट्टी


**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.२३ एप्रिल-**





जिल्ह्यातील पशुधन संख्या दिवसेंदिवस कमी होत आहे. ती वाढविण्यासाठी जिल्हा परिषदेच्या पशुसवंर्धन विभागाकडून विविध योजना राबवून पशुधन वाढीसाठी प्रयत्न करा, अशा सूचना जिल्हा परिषदेचे कृषी व पशुसंवर्धन विषय समित्याचे सभापती रामप्पा चिवडशेट्टी यांनी अधिकाऱ्यांना दिले.

पशुसंवर्धन विभागाच्या बैठकीत ते बोलत होते. यावेळी पशुसंवर्धन विभागाचे आयुक्त डॉ.अनिल तांबे, सहाय्यक आयुक्त डॉ.विशाल येवले यांच्यासह नंदकुमार वाघमारे, अस्लम चौधरी, गौतम माने, पृथ्वीराम सावंत, रुपाली गोडसे, विकास बुळ्ळा, निलावती टवरे, वनिता गुळवे उपस्थित होते. जिल्ह्यातील पशुवैद्यकीय दवाखान्यांची संख्या किती? किती इमारत धोकादायक झाल्या आहेत? किती इमारती नवीन बांधावे लागणार आहे?




जिल्ह्यातील पशुवैद्यकीय अधिकाऱ्यांच्या किती जागा रिक्त आहेत? याविषयी माहिती घेण्याच्या सूचना अधिकाऱ्यांना दिल्या आहेत. ही सर्व माहिती आल्यावर सोलापूर जिल्ह्यात शेळ्या, मेंढ्यासह कुक्कुटपालन योजनेत वाढ करण्यात येणार आहे. त्याचा फायदा शेतीसह इतर जोडधंदा केल्यास शेतकऱ्यांना मोठा फायदा होणार आहे, असेही चिवडशेट्टी यांनी सांगितले.

### पंडित दीनदयाळ उपाध्याय प्रशिक्षण महाअभियानद्वारे

# ‘भाजपा’चे जुने-नवे पदाधिकारी येणार ॲक्टिव्ह मोडवर

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २३ एप्रिल-**



केंद्र शासनाच्या वतीने देशभरात पंडित दीनदयाळ उपाध्याय प्रशिक्षण महाअभियान हाती घेण्यात आले. सोलापुरात आयोजित केलेल्या या मोहिमेत प्रदेश पातळीवरील पदाधिकारी मार्गदर्शन करणार आहेत. या अभियानद्वारे ‘भाजपा’चे जुने-नवे पदाधिकारी ॲक्टिव्ह मोडवर येणार आहेत, असे भारतीय जनता पार्टीचे जिल्हाध्यक्ष शशिकांत चव्हाण यांनी सांगितले.

भारतीय जनसंघाचे संस्थापक पंडित दीनदयाळ उपाध्याय यांनी दिलेला ‘एकात्म मानववाद’ आणि ‘अंत्योदय’ हा विचार समाजातील शेवटच्या घटकापर्यंत पोहोचवण्यासाठी भारतीय जनता पार्टी सज्ज झाली आहे. भाजपा महाराष्ट्र प्रदेशाच्या वतीने ‘पंडित दीनदयाळ उपाध्याय प्रशिक्षण महाभियाना’चा औपचारिक शुभारंभही करण्यात आला. हे महाभियान केवळ राजकीय नसून ते समाजसेवा आणि संघटनात्मक बांधणीवर आधारित आहे. भाजपच्या प्रत्येक कार्यकर्त्याला पक्षाची विचारधारा, पंडितजींचे तत्वज्ञान आणि केंद्र व राज्य सरकारच्या लोककल्याणकारी योजना सामान्य जनतेपर्यंत कशा पोहोचवायच्या; याचे प्रशिक्षण या माध्यमातून भाजपा पदाधिकाऱ्यांना दिले जाणार आहे. डिजिटल इंडिया, आत्मनिर्भर भारत, मेक इन इंडिया, हर घर मे नल, घर तिथे शौचालय यांसारख्या योजना यशस्वी झाल्या आहेत. भारतीय जनता पार्टीप्रणित केंद्र व राज्य शासनाच्या वतीने हाती घेण्यात आलेल्या विविध योजना तळागाळापर्यंत पोहोचविण्याच्या अनुषंगाने सदर मोहीम हाती घेण्यात आली, असेही एका प्रश्नाला उत्तर देताना सांगितले.

### दोन मालट्रकची धडक, चालकाचा मृत्यू

**सोलापूर :** दोन मालट्रकच्या धडकेत जखमी झालेल्या एका ट्रकचालकाचा उपचारादरम्यान शासकीय रुग्णालयात गुरुवार, २३ एप्रिल रोजी सकाळी ७ वाजता मृत्यू झाला. धर्मेंद्रसिंग (वय-३५, रा.उत्तर प्रदेश) असे त्या मयत ट्रकचालकाचे नाव आहे. धर्मेंद्रसिंग हा आपला ट्रके घेऊन गुजरातकडून तामिळनाडूकडे निघाला होता. बुधवार, २२ एप्रिल रोजी दुपारी ४ वाजता सदर ट्रक उमदी गावाजवळ आली असता समोरुन येणाऱ्या दुसऱ्या ट्रकने धडक दिली होती. या धडकेत जखमी झाल्याने धर्मेंद्रसिंग यास मदतनीस शिवा कोळी यांनी उपचाराकरिता येथील शासकीय रुग्णालयात दाखल केले होते. मात्र उपचार सुरु असताना गुरुवारी त्याचा मृत्यू झाला, असे डॉक्टरांकडून सांगण्यात आले. सिव्हील पोलिस चौकीत या घटनेची नोंद करण्यात आली आहे.

४१ वे पुण्यस्मरण



कालकथित
मच्छिंद्र हरिबा साखरे (मामा)
(मृत्यू दि.२४/०४/१९८५)
ज्योत अनंतात विलीन झाली, स्मृती आठवणींनी दाटून आली,
भाव सुमनांची ओंजळ भरुनी, वाहती आम्ही श्रध्दांजली.
शोकाकुल
श्रीमती शांताबाई मच्छिंद्र साखरे (पत्नी), सौ. संगीता दत्तात्रय ओव्हाळ (मुलगी). सौ. राजश्री भालचंद्र साखरे, भालचंद्र साखरे, दत्तात्रय ओव्हाळ,चांगदेव सोनवणे, सतीश वाघमारे, संतोष साखरे, प्रकाश थोरे, सुव्हेन माने,सोनाली ओव्हाळ, संयोगिता ओव्हाळ, शशिकला डावरे, संकेत ओव्हाळ, भूषणचंद्र साखरे, प्रफुल्लचंद्र साखरे, तेजस सुरवसे व समस्त ओव्हाळ, सुरवसे, वाघमारे, सोनवणे, साखरे परिवार, सोलापूर

विनम्र अभिवादन!



महाराष्ट्र शिक्षण प्रसारक मंडळ या संस्थेच्या अध्यक्षा
माजी आमदार
स्व. निर्मलाताई ठोकळ
यांच्या ८८ व्या जयंतीनिमित्त विनम्र अभिवादन !
भव्य रक्तदान शिबिर
दि. २४ एप्रिल २०२६ , वेळ सकाळी ८ ते ११
स्थळ : जनाई सभागृह, तुळशीदासनगर, बाळे
सर्व नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून रक्तदान करावे ही नम्र विनंती.!
अभिवादक
जिजामाता प्राथमिक शाळा
तुळशीदास नगर, कोंडी, ता.उत्तर सोलापूर

सोलापूर जिल्हा सहकार भारती आयोजित
महिला उत्पादित वस्तुंची विक्री व प्रदर्शन
कला स्वाद व संस्कृतीची अनोखा संगम
व्हीजन एक्सपो
महिला सक्षमीकरणासाठी
दिनांक २४, २५, व २६ एप्रिल २०२६
✻ कार्यक्रमाचे स्थळ ✻
नॉर्थकोट मैदान, पार्क चौक, सोलापूर
कार्यक्रमाचे उद्घाटन समारंभ - दि. २४ एप्रिल २०२६ सायं. ५ वा.
✻ शुभहस्ते ✻
सौ. मेघनाताई बोर्डीकर
(सार्वजनिक आरोग्य कुंटूब कल्याण पाणी पुरवठा महिला बाल विकास कल्याण राज्य मंत्री)
✻ कार्यक्रमाचे अध्यक्ष ✻
मा.आ. सौ. चित्राताई वाघ
(आमदार, महिला भा.ज.पा. प्रदेश अध्यक्षा)
मा. श्री. विवेक जुगादे (महामंत्री, सहकार भारती महाराष्ट्र प्रदेश)
✻ प्रमुख उपस्थिती ✻
मा. श्री. विनायक कोंड्याल (महापौर, सोलापूर)
मा. श्री. बिपीनभाई पटेल (चेअरमन, अश्विनी हॉस्पिटल)
मा. सौ. सुहासिनी शहा (प्रिसिजन, संचालक)
मा. श्री. दिलीप माने (कृषी उत्पन्न बाजार समिती सभापती)
मा. श्री. शहाजी पवार (प्रदेश कार्यकारणी सदस्य)
मा. डॉ. किरण गायकवाड (उपनिबंधक, सहकारी संस्था, सोलापूर)
मा. श्री. शरद जाधव (प्रदेश संघटक, सहकार भारती, महाराष्ट्र प्रदेश)
कार्यक्रमाचा समारोप कार्यक्रम - दि. २६ एप्रिल २०२६ सायं. ८ वा.
✻ प्रमुख पाहुणे ✻
मा. श्री. जयकुमार गोरे साहेब (पालकमंत्री सोलापूर जिल्हा)
✻ प्रमुख पाहुणे ✻
मा. आ. श्री. देवेंद्र (दादा) कोठे (आमदार सोलापूर मध्य)
मा. श्री. संजय परमणे (संपर्क प्रमुख, सहकार भारती, महाराष्ट्र प्रदेश)
✻ आपले विनीत ✻
श्री. संतोष गायकवाड (विभाग प्रमुख, सहकार भारती)
श्री. किरण करकमकर (अध्यक्ष, सहकार भारती, सोलापूर जिल्हा)
श्री. नाना वाघमोडे (विभाग सहप्रमुख, सहकार भारती)
श्री. यशवंत बुऱ्हाडे (महामंत्री, सहकार भारती, सोलापूर जिल्हा)
सौ. प्राची धामणगांवकर (कार्यक्रम प्रमुख, महिला प्रकोष्ठ प्रमुख, सहकार भारती, सोलापूर जिल्हा)

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



## ज्ञानामृत आनंदलहरी - १४२१

**सलिली पय जैसे । एक होऊनि मीनले असे ।**
**परी निवडूनि राजहंसे । वेगळे कीजे ॥**

इंद्रियांच्या आधीन गेलेल्या व इंद्रियांना आपल्या आधीन ठेवणा-यांमध्ये मोठा फरक आहे. जो इंद्रियांच्या आधीन गेला तो विषयात अडकतो. विषयात अडकल्याने चित्त मोहपाशात बध्द होते. त्यामुळे स्वार्थ, राग, द्वेष, मत्सर हे सर्व दुर्गुण प्रत्यक्ष कृतीत उतरु लागतात. इंद्रियाचा लळा पुरविण्यामध्ये माणूस कंगाल होतो. मानवाला असा कंगालपणा येणे म्हणजे त्याच्याकडे सत्ता, संपत्ती ईत्यादी असूनही सर्वस्व त्याच्याकडून हरपल्यासारखे होते. पण जो माणूस इंदियांच्या आधीन न जाता इंद्रियांनाच आधीन करतो त्याच्याकडे सत्ता, संपत्ती नसली तरीही ख-या अर्थाने तो धनवान असतो. असा माणूस नाशिवंत सत्ता, संपत्तीच्या मागे लागत नाही. कारण त्याला शाश्वत सत्ता, संपत्ती त्याच्या वर्तनातून प्राप्त झालेली असते. असा व्यक्ती चालते-बोलते तीर्थक्षेत्र झालेला असतो. म्हणून ख-या अर्थाने असा व्यक्ती ब्रम्हरुप समजला जातो. अशा व्यक्तीस भक्ती म्हणूनही काही वेगळयाने करण्याची गरज पडत नाही. कारण त्याच्या आचरणातून सतत सहज भक्ती होत राहते.



इंद्रियांना आपल्या आधीन ठेवणा-या व्यक्तिला विषय स्पर्शही करीत नाहीत. त्याला चांगल्या-वाईटातला फरक कळतो. दुधाचे दूध, पाण्याचे पाणी असे आपण प्रसंगानुरुप बोलून जातो. या बोलण्यामागचा आपला हेतू असा असतो की, एखादी गोष्ट सत्य असल्याचे आपण सिध्द करु इच्छीतो. विषयाधिन किंवा इंद्रियाधिन नसलेल्या व्यक्तीला अशा बाबी सहज साध्य झालेल्या असतात. असा व्यक्ती सत्य, असत्य तत्काळ ओळखतो. एकत्रित असलेल्या गोष्टीपैकी जे योग्य नाही, चांगले नाही, बनावट, फसवे आहे त्याला तो सहज बाजूला काढतो. हे सांगतांना माऊली म्हणतात, राजहंस पक्षापुढे पाणीमिश्रीत दूध ठेवले तर तो पक्षी आपल्या चोंचीने फक्त दूध ग्रहण करतो व पाणी शिल्लक ठेवतो. दुधातून पाणी वेगळे करणे ही अवघड बाब असते. पण हा पक्षी हे करतो. पाणी दुधात असे मिसळून जाते की पाणीच दूध होऊन जाते. आपल्या जीवनातही असे अनेक प्रसंग येत असतात. ज्यामुळे आपल्या जीवनातील चांगल्या गोष्टीत बरेच चुकीचे मिसळले जाते. ते वेगळे करण्याची क्षमता अनेकांत नसते, त्यामुळे नकळत वाईटाचाही अंगीकार होतो. पण ज्याला इंद्रियांची, विषयांची मुळीच भीती नाही किंवा इंद्रिय, विषय ज्याच्या आधीन झाले आहेत, त्या व्यक्तीला दुधाचे दुध, पाण्याचे पाणी सहज करता येते. दुधात पाणी टाकले काय नि पाण्यात दूध टाकले काय, राजहंस पक्षी जसे फक्त दूधच सेवन करतो याप्रमाणे असा ब्रम्हरुप झालेला व्यक्ती चांगले तेवढेच स्विकारतो. अयोग्य, वाईट त्यांच्या वाटयालाही जात नाही. इंद्रिय, विषय त्याला अजिबात सतवत नाहीत. अशा व्यक्ति सोनाराप्रमाणे सोने तापवून त्यातील हीन काढून टाकतात किंवा दहयाला घुसळुन जसे लोणी काढतात किंवा कोंडायुक्त धान्यातून भुसा उडवून फक्त धान्य जसे वेगळे करतात त्याप्रमाणे मिथ्या, असत्य, वाईट बाबी सहजपणे वेगळया करुन सत्य गोष्टींचा स्वीकार ते करतात. हे ज्ञानवंत अनित्य वस्तुच्या ठिकाणी सत्यताबुध्दी ठेवत नाहीत. कारण उपाधी आणि चैतन्य यांतील सारभूत काय आहे हे त्यांनी जाणलेले असते. प्रयत्नाअंती असे आपणालाही जाणता येऊ शकेल असे आम्हास वाटते.

**जय राम कृष्ण हरी।**

**- ज्ञानदास डॉ. विजयकुमार फड**
**मो. ९४२२२१६४४८**

## सुप्रभात

### आजचा दिवस

वार : शुक्रवार,
दि. २४ एप्रिल २०२६
विक्रम संवत् २०८३ ।
शके -१९४८
संवत्सर - पराभव
मास - वैशाख
ऋतु - वसंत ।
नक्षत्र- पुर्नवसु (२०.५७)
योग - धृति (२७.३२)
करण - गरज (०९.४५)
राहू काल : शुक्रवार
दु. १.३० ते ३.००

दिनविशेष : दुर्गाष्टमी
शंकर महाराज पु. ति.
१९९०: अंतराळात हबल ही दुर्बीण सोडण्यात आली.
१९७०: गाम्बिया देश प्रजासत्ताक बनले.
१९६८: मॉरिशस देशाचा संयुक्त राष्ट्रांचाप्रवेश.
१९६७: वेळेवर पॅराशूट न उघडल्यामुळे व्लादिमीर कोमारोव्ह हे मरण पावणारे पहिले अंतराळवीर आहेत.

# महापालिका आवारात पार्किंगला लागणार शिस्त; देणार रंग-कोड

- अस्ताव्यस्त पार्किंगला आळा बसणार
- क्यू आर कोडसह स्मार्ट पार्किंगची अंमलबजावणी
- महापालिका आयुक्त डॉ. सचिन ओम्बासे यांनी दिले आदेश

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २३ एप्रिल-**

महानगरपालिका परिसरातील वाहनांच्या वाढत्या गर्दीला आळा घालण्यासाठी प्रशासनाने पार्किंगसाठी रंग-कोड आधारित नवी शिस्त लागू केली आहे. यामुळे विविध घटकांसाठी स्वतंत्र पार्किंग झोन निश्चित करण्यात आले असून, परिसरातील अनियमित पार्किंगला मोठा प्रतिबंध बसणार आहे, या संदर्भात महापालिका आयुक्त डॉ. सचिन ओम्बासे यांनी आदेश दिले आहेत.

शहरासह जिल्ह्यातून मोठ्या प्रमाणावर नागरिक महापालिकेत येत असल्याने परिसरात वाहने अस्ताव्यस्त लावली जात होती. या पार्श्वभूमीवर प्रशासनाने अधिकारी, पदाधिकारी,




कर्मचारी, पत्रकार आणि नागरिक यांच्यासाठी स्वतंत्र पार्किंग व्यवस्था निश्चित केली आहे.या नव्या नियोजनानुसार वाहनतळांवर सीसीटीव्ही कॅमेरे बसविणे, सुरक्षारक्षकांची नियुक्ती करणे तसेच प्रत्येक वाहनाला क्यू आर कोड देण्याचा निर्णय महापालिका आयुक्तांनी घेतला आहे. संबंधित विभागांनी याची काटेकोर अंमलबजावणी करण्याच्या सूचना दिल्या आहेत.महापालिकेचा परिसर अधिक शिस्तबद्ध, सुरक्षित आणि नागरिकाभिमुख करण्यासाठी हा निर्णय महत्त्वाचा ठरणार आहे.

### पार्किंग रंग-कोड राहणार याप्रमाणे

✻ **तपकिरी :** प्रशासकीय अधिकारी (आयुक्त ते इतर वरिष्ठ अधिकारी)
ठिकाण : मुख्य इमारतीच्या उजव्या बाजूला (चारचाकी)
✻ **नारंगी :** पदाधिकारी, नगरसेवक व पत्रकार
ठिकाण : कौन्सिल हॉल परिसर (चारचाकी व दुचाकी)
✻ **आकाशी निळा :** महानगरपालिका अधिकारी
ठिकाण : मागील बाजूस ( शेजारील जागा) (दुचाकी व चारचाकी)
✻ **जांभळा :** नगर अभियंता, पीडब्ल्यूडी व इतर विभाग कर्मचारी
ठिकाण : नगर अभियंता स्टोअर (दुचाकी)
✻ **हिरवा :** लेखा विभाग, अंतर्गत व मुख्य लेखापरीक्षक कार्यालय, सामान्य प्रशासन विभाग
ठिकाण : पार्किंग (दुचाकी)
✻ **नागरिकांसाठी स्वतंत्र झोन :**
ठिकाण : हुतात्मा स्मृती मंदिर व मागील परिसर ( शेजारी) दुचाकी व चारचाकी.




## अमृतवचन : जैन मुनी वीरसागर महाराज

### स्वत:च्या प्रगतीसाठी आरशाप्रमाणे आत्म-अवलोकन करा



''माणूस बाह्य सौंदर्यासाठी आरशात आपला चेहरा वारंवार पाहतो, पण स्वत:ला आतून पाहण्याचा प्रयत्न मात्र करत नाही. ज्याप्रमाणे आपण सोन्याची शुद्धता हॉलमार्कवरून पारखतो, त्याचप्रमाणे स्वत:च्या प्रगतीसाठी दररोज आत्म-अवलोकन करून मनातील दोष आणि वाईट विचारांचा कचरा साफ करणे गरजेचे आहे,'' असे प्रतिपादन निर्यापक मुनी १०८ श्री वीर सागर जी महाराज यांनी केले.

गुरुवारी डब्ल्यू. आय. टी. जैन मंदिर येथे ग्रीष्मकालीन वाचन कार्यक्रमांतर्गत प्रवचनात ते बोलत होते. मुनीश्री पुढे म्हणाले की, ''स्वच्छ भारत अभियानांतर्गत आपण परिसरातील कचरा साफ करतो, मात्र आपल्या मनातील नकारात्मकतेचा, रागाचा आणि द्वेषाचा कचरा तसाच राहतो. गाडी चालवताना ज्याप्रमाणे आपण समोरील अडथळे पाहून वेग नियंत्रित करतो, त्याचप्रमाणे जीवनातील अडथळे ओळखून सुरक्षित मार्ग काढता आला पाहिजे. आपल्यातील कमतरता ओळखून त्या स्वीकारल्या तरच खऱ्या अर्थाने प्रगती शक्य आहे.'' आजच्या धावपळीच्या युगात मानसिक रोग आणि डिप्रेशन वाढत चालले आहे, यावर भाष्य करताना महाराज म्हणाले की, ''स्वत:चे विश्लेषण न केल्यास विचारांचा अर्धांगवायू होणे अटळ आहे.'' अतिविचार, भीती, इतरांकडून असलेल्या अवास्तव अपेक्षा आणि लोक काय म्हणतील ही दीनतेची भावना माणसाला कमकुवत बनवते. वर्तमान परिस्थितीत जगायला शिका आणि भविष्याची चिंता सोडून कर्म सिद्धांतावर विश्वास ठेवा, असा मोलाचा सल्ला त्यांनी दिला. मनाला सुसंस्कारित करण्यासाठी मुनीश्रींनी काही व्यावहारिक उपाय सुचवले. नियमित ध्यान (मेडिटेशन) आणि ओम काराचा उच्चार करणे. दीर्घ श्वास घेऊन ईश्वराचे स्मरण करणे. नकारात्मक विचार आल्यास थंड पाण्याने चेहरा धुणे आणि पंचेंद्रियांना स्पर्श करून जाणीव जागृत करणे. कोणत्याही संकटात आत्महत्येचा विचार मनात न आणता जो है सो है, जो हो सो हो या वृत्तीने परिस्थितीचा स्वीकार करणे.

# सोलापूरच्या चर्मोद्योजकांची १४ लाखांची फसवणूक; तामिळनाडूच्या व्यापाऱ्यावर गुन्हा दाखल

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २३ एप्रिल-**

चमड्याने भरलेल्या तीन लॉरी माल घेऊन पैसे न देता सोलापुरातील एका चर्मोद्योजकाची १४ लाख रुपयाची फसवणूक केल्याचा प्रकार उघडकीस आला आहे. याप्रकरणी तामिळनाडूतील एका व्यापाऱ्याविरुद्ध जेलरोड पोलीस ठाण्यात फसवणुकीचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

फाईज पाशा के.एस. (रा. अंबुर, तामिळनाडू) असे गुन्हा दाखल करण्यात आलेल्या आरोपीचे नाव असून याबाबत इकरार महंमद इसाक कुरेशी (वय ६०, रा. बेगम पेठ, सोलापूर) यांनी फिर्याद दिली आहे.

यातील फिर्यादीचा चामड्याचा व्यवसाय आहे. त्यांच्या ओळखीचे आरोपी फाईज पाशा के.एस. यांचाही चामड्याचाच व्यवसाय असल्याने त्यांच्यात व्यापारी संबंध निर्माण झाले होते. आरोपीने केलेल्या मागणीनुसार, कुरेशी यांनी २६ मे २०२४ ते २७ ऑक्टोबर २०२४ या कालावधीत एम्पायर ट्रेडिंग कंपनीमार्फत एकूण चार वेळा चामड्याने भरलेल्या लॉरी तामिळनाडूतील पत्त्यावर पाठवल्या होत्या.


चामड्याचा माल मिळाल्यानंतर फिर्यादी कुरेशी यांनी पैशांची मागणी आरोपीकडे वारंवार केली. मात्र, ''पैसे देतो, देतो'' असे म्हणून आरोपीने वेळकाढूपणा केला आणि पैसे देण्यास स्पष्ट नकार दिला. आपली आर्थिक फसवणूक झाल्याचे लक्षात येताच कुरेशी यांनी पोलिसांकडे धाव घेऊन आरोपी विरुद्ध तक्रार दाखल केल्याचे फिर्यादीत म्हटले आहे. सहाय्यक पोलीस निरीक्षक चानकोटी हे गुण्याचा पुढील तपास करत आहेत.

# स्टेडियमला दिलेले डॉ. आंबेडकर यांचे चुकीचे नाव बदला

### विश्वरत्न बहुद्देशिय सामाजिक संस्थेची मागणी

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २३ एप्रिल-**

रेल्वे मैदानावरील डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे चुकीचे नाव स्टेडियमला देण्यात आले आहे. ते नाव भारतरत्न डॉ. बाबासाहेब 'अम्बेडकर' रेल क्रीडा संकुल मंडळ असे दिले आहे. त्याऐवजी भारतरत्न डॉ. बाबासाहेब 'आंबेडकर' रेल क्रीडा संकुल मंडळ असे नाव बदलण्यात यावे. अन्यथा विश्वरत्न बहुद्देशिय सामाजिक संस्थेच्या वतीने तीव्र आंदोलन करण्यात






येईल, असा इशारा त्यांना देण्यात आला आहे.

विश्वरत्न बहुद्देशिय सामाजिक संस्थेला तीन ते चार दिवसांचा वेळ दिलेला असून त्यांनी दुरुस्त करून घेतो, असे आश्वासन दिलेले आहे. यावेळी प्रफुल्ल फडतरे, समाधान अष्टुळ, महेश झगडेकर, अनिश गायकवाड आदी उपस्थित होते.

# प्रज्ञाशोध परीक्षेत कडलासची स्वाती गायकवाड जिल्ह्यात प्रथम

**तभा वृत्तसेवा,**
**सांगोला,दि.२३ एप्रिल -**



प्राथमिक शिक्षण विभाग, जिल्हा परिषद यांचे तर्फे चालू वर्षी इयत्ता तिसरीतील विद्यार्थ्यांसाठी सोलापूर जिल्हा प्रज्ञाशोध परीक्षेचे आयोजन करण्यात आले होते. या स्पर्धा परीक्षेत जि.प.प्रा.शाळा महांकाळवाडी, कडलास (ता. सांगोला) येथील विद्यार्थिनी स्वाती सुधीर गायकवाड हिने २०० पैकी २०० गुण मिळवून सोलापूर जिल्ह्यात प्रथम क्रमांक पटकावला. यापूर्वी तिने मंथन, प्रज्ञाशोध, एटीएस, अभिरूप अशा विविध स्पर्धा परीक्षेत राज्यस्तरीय गुणवत्ता यादीत स्थान मिळवले आहे. तसेच या शाळेतील शर्वरी समाधान माने व आर्यन संतोष जाधव हे विद्यार्थी उत्कृष्ट गुण मिळवून प्रज्ञापत्र ठरले आहेत. या सर्व विद्यार्थ्यांना वर्गशिक्षक संतोषकुमार निंबाळकर व सहशिक्षक अनिल शिंदे यांचे मार्गदर्शन लाभले.

# सिंहगड पब्लिक स्कूलमध्ये 'जागतिक पृथ्वी दिन' उत्साहात साजरा

### उपमहापौर ज्ञानेश्वरी देवकर यांच्या हस्ते वृक्षारोपण

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २३ एप्रिल-**

पर्यावरण संवर्धनाचा प्रभावी संदेश देत सिंहगड पब्लिक स्कूल अँड ज्युनिअर कॉलेज, केगाव येथे 'जागतिक पृथ्वी दिन' उपमहापौर ज्ञानेश्वरी महेश देवकर व सावित्रीबाई फुले शिक्षण प्रसारक मंडळाचे सहसचिव व सिंहगड इन्स्टिटयूट, केगावचे कॅम्पस डायरेक्टर संजय नवले यांच्या उपस्थितीत साजरा झाला.

महापालिका, शाळा प्रशासन आणि इको नेचर क्लब यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित या उपक्रमांतर्गत शाळा परिसरात देशी औषधी वृक्षांची लागवड करण्यात आली. हरित सजावटीने नटलेला परिसर आणि विद्यार्थ्यांचा उत्साह



यामुळे कार्यक्रमाला विशेष रंगत आली. विद्यार्थ्यांनी सादर केलेली घोषवाक्ये, पोस्टर प्रदर्शन आणि भाषणे विशेष आकर्षण ठरली. 'सेव्ह अर्थ, सेव्ह फ्यूचर'चा संदेश देणाऱ्या उपक्रमांना उपस्थितांकडून उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. यासोबतच स्वच्छता अभियान राबवून विद्यार्थ्यांनी प्रत्यक्ष कृतीतून पर्यावरणप्रेम दाखवून दिले.

जागतिक पृथ्वी दिनानिमित्त पूर्व-प्राथमिक विभागात रंगभरण स्पर्धा आयोजित करण्यात आली होती. तसेच पूर्व-प्राथमिक ते इयत्ता आठवीपर्यंतच्या विद्यार्थ्यांनी रोपांचे वाटप करून जनजागृती केली. घरोघरी जाऊन कागदी पिशव्यांच्या वापराला प्रोत्साहन देण्यात आले. यावेळी विद्यार्थ्यांनी हरित प्रतिज्ञा घेऊन पर्यावरण संरक्षणाचा संकल्प केला. प्रास्ताविकात मुख्याध्यापिका शाहीन शेख यांनी पृथ्वी दिनाचे महत्त्व विशद केले. विशेष कार्यकारी अधिकारी महेश देवकर, पर्यावरण दूत डॉ. मनोज देवकर, उपमुख्याध्यापक प्रकाश नवले, उपमुख्याध्यापिका निकहत शेख आदी उपस्थित होते. पर्यावरण संरक्षणाच्या सामूहिक संकल्पाने समारोप करण्यात आला.

# नळातून पाणी आले, तरच 'महाप्रकल्प' यशस्वी अन्यथा हा केवळ आणखी एक आकडा ठरेल..!

सोलापूर महापालिकेच्या सर्वसाधारण सभेत १३७८ कोटींच्या सुधारित पाणीपुरवठा योजनेला मंजुरी मिळाली, पण ही मंजुरी जितकी ऐतिहासिक, तितकीच वादळी ठरली. करवाढ न करता एवढ्या मोठ्या प्रकल्पाला हिरवा कंदील देणे हे नक्कीच नागरिकांसाठी दिलासादायक आहे मात्र त्यामागील आर्थिक शाश्वतता, कर प्रणालीतील बदल आणि पारदर्शकतेचे प्रश्न अजूनही अनुत्तरित आहेत.



सभागृहात मांडण्यात आलेल्या प्रेझेंटेशनमध्ये २४७ पाणीपुरवठ्याचे स्वप्न रंगवण्यात आले. नवीन जलशुद्धीकरण केंद्रे, १११७ किमी वितरण जाळे, सौर ऊर्जा प्रकल्प अशा भव्य योजना कागदावर प्रभावी वाटतात. पण प्रत्यक्षात नागरिकांना नियमित, स्वच्छ आणि दाबाने पाणी मिळणार का, हा खरा प्रश्न आहे. कारण सोलापूरकरांनी याआधीही अनेक योजना पाहिल्या, पण नळातून पाणी आले नाही, ही वस्तुस्थिती आहे.

यावेळी सर्वात महत्त्वाचा मुद्दा ठरला तो म्हणजे भांडवली मूल्य आधारित कर प्रणाली. सत्ताधाऱ्यांनी स्पष्ट केले की करवाढ होणार नाही पण कर प्रणाली बदलली की परिणाम होत नाहीत, असे म्हणणे वास्तववादी नाही. पुणे, मुंबईच्या उदाहरणांचा दाखला देताना सोलापूरच्या आर्थिक आणि सामाजिक परिस्थितीचा विचार कितपत झाला, याचे उत्तर प्रशासनाने स्पष्ट द्यायला हवे.

योजनेची अंमलबजावणी. २४७ पाणीपुरवठ्याचे स्वप्न नवीन नाही. याआधीही अशा घोषणा झाल्या, पण अनेक भागांत अजूनही पाण्यासाठी टँकरवर अवलंबून राहावे लागते. १११७ किमी नवीन पाइपलाईन, जलशुद्धीकरण केंद्रे, सौर प्रकल्प हे सर्व कागदावर चांगले दिसते; पण प्रत्यक्षात कामाची गुणवत्ता, वेळेत पूर्णता आणि देखभाल यावरच यश अवलंबून आहे. पारदर्शकता आणि लोकसहभाग महत्त्वाचा आहे. सभेत अनेक नगरसेवकांनी प्रश्न उपस्थित केले, सूचना दिल्या. यावरून स्पष्ट होते की अजूनही काही बाबी अस्पष्ट आहेत. इतक्या मोठ्या प्रकल्पात प्रत्येक प्रभागाचा समावेश, कामांचा तपशील आणि खर्चाची पारदर्शक माहिती सार्वजनिक करणे गरजेचे आहे.

सभागृहातील गोंधळ आणि निलंबनाची




कारवाई हा या बैठकीचा दुसरा ठळक पैलू. महापौर विनायक कोंड्याल यांचा ' रुद्रावतार' पाहायला मिळाला. विरोधी पक्षातील शिवसेनेचे अमोल शिंदे आणि काँग्रेसचे चेतन नरोटे या दोन नगरसेवकांना निलंबित करण्यात आले. विकासाच्या प्रश्नावर चर्चा होणे अपेक्षित असताना घोषणाबाजी आणि आरोप-प्रत्यारोप यामुळे मूळ विषय बाजूला पडल्याचे दिसले. सभागृहाबाहेर सत्ताधारी आणि विरोधकांची समांतर आंदोलने झाली, हे चित्रही काही नवीन नाही. मात्र यामुळे नागरिकांच्या मनात एकच प्रश्न निर्माण होतो तो म्हणजे हा लढा खरोखर पाण्यासाठी आहे की राजकारणासाठी? या संपूर्ण प्रकरणात सकारात्मक बाब म्हणजे अखेर योजना एकमताने मंजूर झाली. पण आता खरी कसोटी आहे अंमलबजावणीची. कंत्राटदार, प्रशासन आणि लोकप्रतिनिधी यांच्यात समन्वय राहिला, तरच ही योजना यशस्वी होईल. अन्यथा, हा प्रकल्पही कागदावरच 'यशस्वी' ठरेल. सोलापूरकरांना घोषणांपेक्षा परिणाम हवेत.

नळातून पाणी आले, तरच योजना यशस्वी अन्यथा हा केवळ आणखी एक आकडा ठरेल..!

# महसूलचे १०० तर आरोग्य विभागाचे ७० टक्के कर्मचारी संपावर

### ३ दिवसांपासून प्रशासकीय सेवा ठप्प; नागरिकांचे हाल

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २३ एप्रिल-**

राज्य सरकारी कर्मचाऱ्यांच्या मध्यवर्ती संघटनेने आपल्या विविध मागण्यांसाठी मंगळवारपासून बेमुदत संप पुकारला आहे. शासकीय, निमशासकीय कर्मचाऱ्यांच्या विविध प्रलंबित मागण्यांसाठी गेल्या ३ दिवसांपासून सोलापुरातही शासकीय कर्मचारी संपावर असल्याने प्रशासकीय काम काज ठप्प झाले आहे आणि सर्वसामान्य नागरिकांना विविध शासकीय कार्यालयाकडे फेऱ्या मारण्याची वेळ आली आहे. दरम्यान, संपाच्या आजच्या तिसऱ्या दिवशीही महसूलचे १०० टक्के तर आरोग्य विभागाचे ७० टक्के कर्मचारी संपावर असल्याची माहिती महसूल संघटना अध्यक्ष रवी नष्टे यांनी दिली.

राज्य सरकारी कर्मचाऱ्यांच्या मध्यवर्ती संघटनेने आपल्या विविध मागण्यांसाठी मंगळवारपासून बेमुदत संप पुकारला असून, या संपाचा फटका आता सर्वसामान्य नागरिकांना बसत असल्याचे दिसत आहे. या संपामुळे राज्याचे प्रशासकीय केंद्र असलेल्या मंत्रालयातील कामकाजावरही या संपाचा परिणाम दिसून आला. सोलापूर येथील जिल्हाधिकारी कार्यालयात नागरीकांची वर्दळ असते. जिल्ह्याभरातून नागरीक लहान मोठी कामे कार्यालयात घेवून येत असतात. अर्ज, निवेदने देण्यासाठी तक्रारदारांची सतत ये-जा सुरु असते. महसुली दाव्यांची सुनावणीसाठी वकील मंडळी आणि पक्षकांरी गर्दी असते. शासकीय योजनांच्या आढाव्यासाठी निरनिराळ्या बैठकांचे सत्र सुरु असते. यासाठी जिल्ह्यातील अधिकारी मोठ्या संख्येनी कार्यालयाला भेट देत असतात. मात्र गेल्या दोन दिवसांपासून कार्यालये ओस पडली आहेत. त्यामुळे शासकीय कामे खोळंबली आहेत. कामे घेऊन येणाऱ्या लोकांना हताश होऊन परतावे लागत असल्याचे पहायला मिळत आहे. महसूल, कृषी वन विभागाच्या कार्यालयात सध्या शुकशुकाट आहे.




### संप नेमका कशासाठी ?

विविध प्रलंबित मागण्यांसाठी राज्य सरकारचे कर्मचारी सध्या संपावर गेले आहेत. सरकारी कर्मचाऱ्यांना सुधारित राष्ट्रीय निवृत्ती वेतन योजनेबाबत स्पष्ट नियम जाहीर करणे, १ मार्च २०२४ पासून निवृत्त झालेल्या कर्मचाऱ्यांना तात्पुरते निवृत्ती वेतन द्यावे. राज्य शासकीय कर्मचाऱ्यांचे निवृत्तीचे वय ६० वर्षे करावे, चतुर्थश्रेणी व वाहन चालकांच्या भरतीवर घातलेली बंदी उठवावी. सतत १० वर्षे कम करीत असलेल्या कंत्राटी कर्मचाऱ्यांना नियमित करावे. सर्व कर्मचाऱ्यांसाठी व्यापक रोकडविरहित (कॅशलेस) आरोग्य विमा योजना लागू करावी. जुनी निवृत्ती वेतन योजना लागू करणे, नगरपालिका व नगरपरिषदांतील कर्मचाऱ्यांच्या आकृतीबंधाचा प्रश्न सोडवावा, नवीन राष्ट्रीय शिक्षण धोरणाचा पुनर्विचार करावा आदींसह इतर काही मागण्यांसाठी हा संप पुकराण्यात आला आहे.

CMYK
सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले. विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



## महत्वाचे...

### पोरांना मोठ्याने का रागवतेस म्हणून पत्नीला कुकरच्या झाकणाने मारहाण

**सोलापूर, दि. २३ एप्रिल-**

घरामध्ये मुलांना मोठ्याने का रागवतेस म्हणून एका पतीने आपल्या पत्नीला कुकरच्या झाकणाने व लाथाबुक्याने मारहाण करून जखमी केल्याची घटना कुमठा नाका भागातील भारत नगरात बुधवारी घडली. पूजा राजू पारदे (वय २५ वर्ष, रा. भारत नगर, सोलापूर ) असे त्या जखमी पत्नीचे नाव असून बुधवारी सकाळी मुलांना मोठ्याने का रागवतेस या कारणावरून पतीने तिला कुकरच्या झाकणाने व लाथाबुक्क्यांनी मारहाण केली. यात डोक्याला, गळ्याला व पोटास मार लागल्याने तिला जिल्हा रुग्णालयात प्रथम उपचार करून येथील शासकीय रुग्णालयात जाऊ करिष्मा हिने सायंकाळी दाखल केले.



### एटीएममधील पैसे काढण्यावरून वाद; अज्ञातांकडून फायटर व दगडाने मारहाण

**सोलापूर, दि. २३ एप्रिल-**

एटीएम मधील पैसे काढण्याच्या कारणावरून झालेल्या वादात दोघा तरुणांना काही अज्ञात तरुणांनी फायटर व लाथा बुक्याने बेदम मारहाण केल्याची घटना सात रस्ता येथील एसबीआय एटीएम समोर बुधवारी रात्री घडली. अदनान नजीर अहमद बोडे (वय २७ वर्ष) आणि समीर अमीर इनाम दार (वय २२ वर्ष, दोघे रा. भारतरत्न इंदिरानगर, ७० फूट रोड, सोलापूर) अशी मारहाण झालेल्या त्या तरुणांची नावे असून बुधवारी संध्याकाळी ते दोघे बिग बाजार समोरील एसबीआय बँकेच्या एटीएम मध्ये असताना एटीएम मधून पैसे काढण्यावरून वाद झाल्याने त्यांना अज्ञात आठ ते दहा जणांनी मिळून फायटर, दगड व लाथा बुक्क्याने मारहाण केली. यात मार लागून जखमी झाल्याने या दोघांना उपचारांसाठी येथील शासकीय रुग्णालयात भाऊ शकील बोडे यांनी रात्री दाखल केले.



### पोलिस केस माघारी घे म्हणून तरुणाला लाथाबुक्क्याने मारहाण

**सोलापूर, दि. २३ एप्रिल-**

पोलीस केस माघारी घे असे मिळून एका तरुणाला लाथा बुक्क्याने मारहाण करण्यात आलेली घटना मिलन बिअर शॉपी च्या मागे बुधवारी रात्री घडली . शिवाजी कृष्ण भोसले (वय ३७ वर्ष, रा. जोशी गल्ली, रविवार पेठ सोलापूर) असे त्या मारहाण झालेल्या तरुणाचे नाव असून तो बुधवारी रात्री १० वाजता मिलन बियर शॉपीच्या मागे थांबला असताना त्याला आमच्यावर केलेली पोलीस केस माघारी घे असे म्हणून रोहित भोळे यांनी लाथा बुक्याने मारहाण केली. त्यामुळे तो उपचारासाठी येथील शासकीय रुग्णालयात रात्री अकरा वाजता स्वतः दाखल झाला.

### शेतामध्ये ॲसिड पिलेल्या तरुणाचा उपचारादरम्यान मृत्यू

**सोलापूर, दि. २३ एप्रिल-**


अज्ञात कारणावरून शेतामध्ये ऍसिड पिलेल्या यतनाळ गावच्या तरुणाचा उपचारादरम्यान येथील शासकीय रुग्णालयात बुधवारी रात्री अकरा वाजता मृत्यू झाला. शिलीसिद्ध शावरसिद्ध वाघमोडे (वय २५ वर्ष, रा. यतनाळ, दक्षिण सोलापूर ) असे त्या मयत तरुणाचे नाव असून त्याने २० एप्रिल रोजी रात्री आठ वाजता होटगी स्टेशन जवळील शेतामध्ये अज्ञात कारणावरून व्हाईट कॅट नावाचे ऍसिड पिले होते. त्रास होऊ लागल्याने त्याला उपचाराकरिता येथील शासकीय रुग्णालयात भाचा राम चोपडे याने रात्री दाखल केले असता त्याचा बुधवारी रात्री११ वाजता मृत्यू झाला.




### कुंभारी येथील घरकुलमध्ये तरुणाची गळफासाने आत्महत्या

**सोलापूर, दि. २३ एप्रिल-**

अज्ञात कारणावरून एका २९ वर्षीय तरुणाने घरातील खिडकीच्या लोखंडी अँगलला ओढणीच्या सहाय्याने गळफास घेऊन आत्महत्या केल्याची घटना कुंभारी येथील मीनाक्षी साने विडी घरकुल मध्ये आज गुरुवारी सकाळी आठ वाजता उघडकीस आली. प्रभाकर क्यातम (वय २९ वर्ष, रा. ५८५ मीनाक्षी साने विडी घरकुल ,कुंभारी) असे त्या गळफास घेतलेल्या तरुणाचे नाव आहे. आज गुरुवारी सकाळी त्याचा मृतदेह घराशेजारील ५८८ क्रमांकाच्या घराच्या खिडकीला गळफास घेतलेल्या अवस्थेत आढळून आला. ही खबर वळसंग पोलिसांना समजली असता पोलीस हवालदार ए ए शेख यांनी घटनास्थळी पोहोचून सदरचा मृतदेह येथील शासकीय रुग्णालयात श्रवविच्छेदनासाठी सकाळी साडेनऊ वाजता दाखल केला.






### तिलाटी ते अक्कलकोट येथील रेल्वे फाटक २४ ते २६ एप्रिलपर्यंत बंद

**सोलापूर, दि. २३ एप्रिल-**

दुरुस्ती आणि डागडुजीच्या कामाकरिता रेल्वे फाटक क्र. ६१ जो कि रेल्वे की.मी. ४७७/२-३ तिलाटी ते अक्कलकोट रेल्वे मार्गिकेवर स्थित आहे. दिनांक २४ ते २६.०४.२०२६ दरम्यान तीन दिवस सकाळी ९ ते रात्री ७ वाजेपर्यंत बंद राहील. तरी फाटकाच्या नजीक असणाऱ्या गावकर्यांनी आणि वाहतूकदारांनी याची नोंद घ्यावी.

# चिंचोली-भोसे येथे रस्ता दुरुस्ती करण्यासाठी २० लाखांचा निधी मंजूर

**आमदार अभिजीत पाटील यांच्या हस्ते भूमिपूजन संपन्न**



**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि.२३ एप्रिल-**

तालुक्यातील चिंचोली भोसे येथील ग्राम स्थांच्या दीर्घकाळ प्रलंबित असलेल्या रस्ता दुरुस्तीच्या मागणीची गांभीर्याने दखल घेत रस्त्याच्या कामांसाठी २० लाखांचा निधी मंजूर करण्यात आला आहे. या विकास कामाचे भूमिपूजन आमदार अभिजीत पाटील यांच्या हस्ते ग्रामस्थांच्या उत्स्फूर्त व मोठ्या उपस्थितीत संपन्न झाले.

चिंचोलीभोसे परिसरातील रस्त्याची दुरवस्था ही नागरिकांसाठी मोठी समस्या बनली होती. खराब रस्त्यांमुळे वाहतुकीत अडथळे निर्माण होत होते तसेच शेतकरी, विद्यार्थी आणि सर्वसामान्य नागरिकांना मोठ्या गैरसोयींचा सामना करावा लागत होता. मात्र, आता या निधीमुळे रस्त्याचे दर्जेदार दुरुस्ती काम हाती घेतले जाणार असून, लवकरच नागरिकांना सुकर व सुरक्षित वाहतुकीचा लाभ मिळणार आहे.

यावेळी बोलताना आमदार अभिजीत पाटील यांनी सांगितले की, मतदारसंघातील प्रत्येक गावाचा सर्वांगीण विकास हेच आमचे ध्येय असून, नागरिकांच्या मूलभूत गरजा पूर्ण करण्यासाठी आम्ही कायम कटिबद्ध आहोत. रस्ते, पाणी, वीज यांसारख्या सुविधांमध्ये कोणतीही तडजोड होऊ दिली जाणार नाही.

या कार्यक्रमास उमेश पवार, गणेश आवटे, भीमराव पवार, शशिकांत शिंदे, परमेश्वर पवार, बाळासाहेब पवार, रामभाऊ परचंडे यांच्यासह अनेक मान्यवर व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. या कामामुळे परिसराच्या विकासाला गती मिळणार असून, ग्रामस्थांनी आमदार अभिजीत पाटील यांचे आभार व्यक्त केले आहेत.

## हिंगणी-निपाणी ग्रामपंचायतीचे दप्तर गायबप्रकरणी निष्पक्ष तपासाची मागणी

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २३ एप्रिल-**

मोहोळ तालुक्यातील हिंगणी-निपाणी ग्रामपंचायत कार्यालयाचे कुलूप तोडून अज्ञात व्यक्तींनी महत्त्वाचे दप्तर लंपास केल्या प्रकरणी पोलिसांकडे तक्रार दाखल केली असून, निष्पक्ष तपास करून दोषींना शोधून काढावे. या कार्यालयाचे कामकाज पुरवत सुरू करावे. आणि माझी इतरत्र बदली करावी, अशी मागणी ग्रामपंचायत अधिकारी स्वप्नाली कोळी यांनी पत्रकार परिषदेत दिली.

कोळी यांनी सांगितले की, १६ एप्रिल रोजी कार्यालयाचे कुलूप तोडण्यात आले आणि काही महत्त्वाची कागदपत्रे व दप्तर चोरीला गेले. घटनेची माहिती मिळताच त्यांनी तातडीने पोलिसांत धाव घेत तक्रार नोंदवली. मात्र, या प्रकरणात गावातील सरपंच, एक सदस्य आणि इतर काही जणांनी आपल्यावरच खोटे आरोप केल्याचा आरोप त्यांनी केला.आपल्यावर कारवाई व्हावी, यासाठी काही जणांकडून उपोषणाचा इशाराही देण्यात आला आहे. मात्र, आपण संपूर्ण बाब पोलिस प्रशासन आणि वरिष्ठ अधिकाऱ्यांसमोर स्पष्टपणे मांडली आहे, असे कोळी यांनी सांगितले.

यापूर्वी माहितीच्या अधिकारांतर्गत काही कागदपत्रांची मागणी करण्यात आली होती. ती माहिती देण्यासाठी आवश्यक दप्तर तयार ठेवले होते. मात्र, त्याच दप्तराची चोरी झाल्याने संशय अधिक गडद झाला आहे. विशेष म्हणजे, दुसऱ्या दिवशी काही कागदपत्रे वगळता उर्वरित दप्तर कार्यालयासमोर आणून टाकण्यात आल्याचा दावाही कोळी यांनी केला. जे दप्तर माझ्याच ताब्यात असते, ते मीच गहाळ कशासाठी करेन? असा सवाल उपस्थित करत कोळी यांनी स्वतःवरील आरोप फेटाळून लावले.

## झपूर्झा आर्ट गॅलरीत वर्षाव रंगांच्या चित्रप्रदर्शनाचे उद्या आयोजन

**चित्रकुर निरंजन यांच्या पॅलेट नाईफ शैलीतील कलाकृतींचा समावेश**

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २३ एप्रिल-**

येथील प्रसिद्ध चित्रकार वर्षा निरंजन यांच्या वर्षाव रंगांचा या एकल चित्रप्रदर्शनाचे आयोजन २५ एप्रिल ते ३ मे या कालावधीत डफरीन चौक येथील पु. ना. गाडगीळ अँड सन्सच्या झपूर्झा आर्ट गॅलरीत करण्यात आले आहे, अशी माहिती स्वतः वर्षा निरंजन यांनी पत्रकार परिषदेत दिली.



या प्रदर्शनाचे उद्घाटन शनिवार, २५ एप्रिल रोजी सायंकाळी ६ वाजता आमदार देवेंद्र कोठे यांच्या हस्ते होणार आहे. या सोहळ्याला शिल्पकार भगवान रामपुरे, माजी नगरसेवक गुरुशांत धुत्तरगांवकर आणि आर्किटेक्ट शैलेन्द्र सुराणा यांची प्रमुख उपस्थिती राहणार आहे. या प्रदर्शनात निसर्गचित्रे, अथांग समुद्र, ढगांनी व्यापलेले आकाश आणि दगडांच्या पोत असलेल्या कलाकृती राहणार असून ऑईल आणि अॅक्रेलिक माध्यमात पॅलेट नाईफ वापरून तयार केलेली चित्रे हे या प्रदर्शनाचे मुख्य आकर्षण आहे.चित्रकला प्रेमींसाठी २ मे रोजी सायंकाळी ५ वाजता वर्षा निरंजन या चित्र साकारण्याचे प्रात्यक्षिक दाखवणार आहेत. वर्षा निरंजन या गेल्या १५ वर्षांपासून कला क्षेत्रात कार्यरत असून त्यांनी अनेक राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय स्तरावर यश संपादन केले आहे. त्यांना कॅमलिन अवॉर्ड, स्टेट अवॉर्ड (२०१२), ओम नमधील आर्टस्केप्स सन्मान आणि बॉम्बे आर्ट सोसायटीचा विशेष पुरस्कार प्राप्त झाला आहे. सकाळी १०:३० ते रात्री ८:३० ही प्रदर्शनाची वेळ आहे. रसिकांनी या प्रदर्शनास भेट देऊन निसर्ग सौंदर्याचा आस्वाद घ्यावा, असे आवाहन वर्षा निरंजन यांनी केले आहे.

या पत्रकार परिषदेला कांचन गोडाळे उपस्थित होते.

## पंढरपूर सिंहगड कॉलेज ऑफ इंजिनिअरिंगमध्ये वार्षिक पारितोषिक वितरण उत्साहात




**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि.२३ एप्रिल -**

येथील एस.के.एन. सिंहगड कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग महाविद्यालयात वार्षिक पारितोषिक वितरण समारंभ अत्यंत उत्साहपूर्ण आणि भव्य वातावरणात पार पडला.

महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी शैक्षणिक, सांस्कृतिक, क्रीडा तसेच विविध सहशैक्षणिक क्षेत्रांत वर्षभरात केलेल्या उल्लेखनीय कामगिरीचा गौरव करण्यासाठी या समारंभाचे आयोजन करण्यात आले होते. विद्यार्थ्यांच्या यशाचा सन्मान होताच संपूर्ण महाविद्यालयात आनंद, अभिमान आणि प्रेरणादायी वातावरण निर्माण झाले.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. कैलाश करांडे उपस्थित होते. प्रमुख अतिथी म्हणून के. बी. पी. कॉलेज, पंढरपूर येथील डॉ. सुशील कुमार शिंदे, प्रेसिडेंट रनर्स असोसिएशन व टॅक्स कन्सल्टंट विश्वंभर पाटील तसेच सिंहगड कॅम्पसचे इस्टेट मॅनेजर रोहन संजय नवले हे उपस्थित होते.

या समारंभात गुणवंत विद्यार्थ्यांना ट्रॉफी, पदके आणि प्रमाणपत्र देऊन सन्मानित करण्यात आले. विद्यार्थ्यांच्या यशाबद्दल पालक, शिक्षक आणि मित्रपरिवार यांनीही समाधान व आनंद व्यक्त केला. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी उपप्राचार्य डॉ.स्वानंद कुलकर्णी तसेच प्रा.शिवाजी पवार, प्रा.अनिल जाधव, प्रा.महेश झाडे, प्रा. नागनाथ खांडेकर, प्रा. सचिन घाडगे, प्रा. बाळकृष्ण जगदाळे यांनी विशेष परिश्रम घेतले. तसेच विद्यार्थी क्रीडा अध्यक्ष गणेश पवार व त्यांच्या सहकाऱ्यांचेही योगदान लाभले.

**मेहनत, शिस्त व सकारात्मक दृष्टिकोनाच्या जोरावर यश**

प्राचार्य डॉ. कैलाश करांडे यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना सातत्यपूर्ण मेहनत, शिस्त आणि सकारात्मक दृष्टिकोन यांच्या जोरावर यश संपादन करता येते, असे प्रतिपादन केले. तसेच विद्यार्थ्यांनी केवळ अभ्यासापुरते मर्यादित न राहता विविध उपक्रमांमध्ये सक्रिय सहभाग घेऊन आपला सर्वांगीण विकास साधावा, असे आवाहन त्यांनी केले.

## स्वेरीमध्ये 'सिविकॉन ३.0' तांत्रिक महोत्सव उत्साहात




**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि.२३ एप्रिल -**

येथील स्वेरी कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग (ऑटोनॉमस) मध्ये सिव्हिल इंजिनिअरिंग स्टुडंट्स असोसिएशनच्या वतीने नुकतेच 'सिविकॉन ३.0' या तांत्रिक महोत्सवाचे यशस्वी आयोजन करण्यात आले. या उपक्रमाला विद्यार्थ्यांचा उस्फुर्त प्रतिसाद मिळाला.

संस्थेचे संस्थापक व कॉलेज ऑफ इंजिनिअरिंगचे प्राचार्य डॉ. बी.पी.रोंगे यांच्या मार्गदर्शनाखाली, कॅम्पस इनचार्ज डॉ.एम.एम. पवार, उपप्राचार्या डॉ. मिनाक्षी पवार तसेच सिव्हिल इंजिनिअरिंग विभागाचे प्रमुख डॉ. पी. आर. बामणे यांच्या मार्गदर्शनाखाली व पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ, सोलापूरच्या विज्ञान व तंत्रज्ञान विद्याशाखेचे अधिष्ठाता डॉ.पी.एम.पवार यांच्या उपस्थितीत विभागातील प्राध्यापकांच्या सहकार्याने हा उपक्रम संपन्न झाला.

या 'सिविकॉन ३.0' मध्ये आयडीयाथॉन, सॉईल आर्ट, ॲप्टि टेक मास्टर, सिने टेक मास्टर, पोस्टर प्रेझेंटेशन आणि कॅड रेस यांसारख्या विविध तांत्रिक व सर्जनशील स्पर्धांचे आयोजन करण्यात आले होते. शिक्षकांच्या सहकार्यामुळे 'सिविकॉन ३.0' या उपक्रमातील सर्व स्पर्धा व तांत्रिक सत्रे यशस्वीरीत्या पार पडली. यामुळे विद्यार्थ्यांच्या गुणवत्तेला व बुद्धिमत्तेला चालना मिळाली असून याचा विद्यार्थ्यांना भविष्यात फायदा होणार आहे, हे मात्र निश्चित! या स्पर्धेमध्ये राज्यातील इतर इंजिनिअरिंग कॉलेज मधील विद्यार्थ्यांसह जवळपास २०० हून अधिक विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदविला होता.

प्रा. एम. व्ही. डोंगरे यांनी सेसा समन्वयक म्हणून काम पहिले. उत्तम नियोजन, सक्षम व्यवस्थापन, स्पर्धांचे यशस्वी आयोजन हे समितीमधील सर्व सदस्यांचे कौशल्य ठरले. सर्व विद्यार्थ्यांनीही मोठ्या उत्साहाने सहभाग नोंदवून कार्यक्रमाच्या यशात मोलाचा वाटा उचलला. 'सिविकॉन ३.0' हा कार्यक्रम विद्यार्थ्यांसाठी ज्ञानवर्धक, प्रेरणादायी व अत्यंत यशस्वी ठरला.



### चंद्रभागाबाई यलगुलवार प्रशालेत वाचन उपक्रम

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.२३ एप्रिल -**

जागतिक पुस्तक दिनानिमित्त चंद्रभागाबाई यलगुलवार प्रशाला व ज्युनिअर कॉलेजमध्ये सामूहिक वाचनाचा प्रेरणादायी उपक्रम उत्साहात पार पडला.

या उपक्रमामध्ये शाळेतील सर्व विद्यार्थ्यांनी एकाच वेळी विविध प्रकारची पुस्तके वाचून वाचनाचा आनंद लुटला. कथा, कादंबरी, विज्ञान, चरित्र, तसेच प्रेरणादायी साहित्य अशा विविध विषयांवरील पुस्तकांचे वाचन करण्यात आले.

प्राचार्या सीमा श्रीगोंदेकर-यलगुलवार यांच्या कल्पक मार्गदर्शनामुळे हा उपक्रम यशस्वी झाला.ङ्गपुस्तक हेच खरे मित्र असून,वाचन ही सवय आयुष्यभर उपयोगी पडते,ङ्ग या उक्ती प्रमाणे सदर उपक्रमाचे आयोजन करण्यात आल्याचे त्यांनी यावेळी नमूद केले.

## पंढरपूर सार्वजनिक बांधकाम विभागात काम बंद आंदोलन



**राज्य शासकीय कर्मचाऱ्यांचा बेमुदत संप**

**तिसऱ्या दिवशीही काम बंद**

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि.२३ एप्रिल-**

महाराष्ट्र राज्य शासकीय कर्मचारी संघटनेने दिनांक २१ एप्रिल पासून पुकारलेल्या बेमुदत संपात सोलापूर जिल्ह्यासह येथील सार्वजनिक बांधकाम विभाग पंढरपूर येथे गेल्या तीन दिवसांपासून बेमुदत संप करण्यात आला.

यावेळी सार्वजनिक बांधकाम विभाग वपाटबंधारे कर्मचारी संघटनेचे प्रमुख मार्गदर्शक अशोक इंदापूरेयांच्या मार्गदर्शनाखाली सार्वजनिक बांधकाम विभाग पंढरपूर येथे कर्मचाऱ्यांच्या विविधमागण्यांसाठी हे आंदोलन सुरु आहे. यामध्ये जुनी पेन्शनयोजना लागु करणे, सेवानिवृत्तीचे वय ५८ वरुन ६0 करणे, शासनाने रिक्तपदे तात्काळ भरावीत इत्यादी १६ प्रमुख मागण्या आहेत.

यावेळी सार्वजनिक बांधकामविभागाचे प्रथम लिपिक एस.एम.काळे, प्रविण तुपसौंदर, प्रदिप सावंत, शिवानंद दनुरे, सचिन बागल, किशोर दिघोळे, के.ऐ.गोरे, अतुल जाधव, वैभव पंडीत, सुदर्शन कांबळे, नानाभाऊ वाळके, योगेश जाधव, अमोल पवार, गणेश मोरे, विक्रांत पाटील, श्रीमतीएस.बी.वाघमोडे, उत्कर्ष देशमुख, सचिन देठे, ए.ए.हजारे, नानागौडाबिरादार, अजय पाटील, आनंदा लोखंडे, योगेश हवलदार, एस.व्ही. लवटे, बाबा लवटे, अवधुत वाघमारे, एस.व्ही. हाके,एम.एम.यादव, एस.एस.शिंदे, श्रीमती जे.एस.शेख, एस.जी.बारसकर, एस.एम.साळुंखे, एस.ए.शेख आदी कर्मचारी उपस्थित होते.




## मराठा व बहुजन समाजात शिवधर्म पद्धतीच्या शिवविवाहांचे आकर्षण

**तभा वृत्तसेवा,**
**करमाळा, दि. २३ एप्रिल-**

मराठा सेवा संघाच्या माध्यमातून सुरू करण्यात आलेल्या शिवधर्म पद्धतीच्या शिवविवाहांचे आकर्षण मराठा व बहुजन समाजात दिवसेंदिवस वाढत आहे. अशाच पद्धतीचा शिवविवाह करमाळा तालुक्यातील कुंभेज फाटा येथे नुकताच संपन्न झाला.

जेऊर येथील शिवमती पुष्पा व शिवश्री बाळकृष्ण राजाराम निर्मळ रा.जेऊर ता.करमाळा यांचे द्वितीय चिरंजीव शिवमान अतुल व शिवमती अनिता व शिवश्री प्रमोद दादासाहेब भोसले रा.कुंभेज यांची ज्येष्ठ कन्या शिवकन्या हर्षदा यांचा शिवविवाह शिवधर्म पद्धतीने थाटात साजरा करण्यात आला.

राजमाता राष्ट्रमाता जिजाऊंच्या प्रतिमापूजनाने शिव विवाहाची सुरुवात झाली. यावेळी फुले-शाहू-आंबेडकरांचा वारसा पुढे चालवणाऱ्या राष्ट्रसंत जगद्गुरु तुकाराम महाराज, संत ज्ञानेश्वर महाराज, डॉ.ए.पी.जे अब्दुल कलाम, डॉ.बाबासाहेब आंबेडकर, तथाकथ गौतम बुद्ध, साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे, राष्ट्रसंत गाडगेबाबा, संत कबीर, कर्मवीर भाऊराव पाटील, संत रोहिदास, महात्मा ज्योतिराव फुले, अहिल्यादेवी होळकर, क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले, स्वामी विवेकानंद सर्व महापुरुषांच्या प्रतिमांचे पूजन वधूवरांच्या हस्ते करण्यात आले. तसेच महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री स्व.ना.अजित(दादा)अनंतराव पवार यांच्याही प्रतिमेस हार घालून श्रद्धांजली वाहण्यात आली.

CMYK

# आपला जिल्हा

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



## सांगोला-पंढरपूर-शेगाव रेल्वे सेवा सुरू करा

### कामटे संघटनेची मागणी

**तभा वृत्तसेवा,**
**सांगोला, दि. २३ एप्रिल -**

सांगोल्यातील शहीद अशोक कामटे बहुउद्देशीय सामाजिक संघटनेच्या वतीने पदाधिकारी माजी पोनि. हरी बाबर यांनी जोगेश्वरी पूर्वचे खा.रवींद्र वायकर यांची समक्ष भेट घेऊन सांगोला-पंढरपूर-शेगाव रेल्वे सेवा सुरू करण्याचे व इतर मागण्यांचे निवेदन दिले. या निवेदनामध्ये ११०२७ आणि ११०२८ दादर-सातारा-दादर रेल्वे दररोज सुरू करण्यात यावी, सांगोला-पंढरपूर-शेगाव (गजानन महाराज मंदिर) रेल्वे सेवा सुरू करावी त्यामुळे विदर्भातील पंढरी व पश्चिम महाराष्ट्रातील पंढरी याची संयुक्तीता वाढून भावी भक्तांचे सोय होईल अशी मागणी करण्यात आली. दिलेल्या निवेदनावर पाठपुरावा करणार असल्याचे आश्वासन खा. रवींद्र वायकर यांनी यावेळी दिले.



## महत्त्वाचे...



### संत महोत्सव भाग्याने प्राप्त होतो : ज्ञानेश्वर माऊली कदम महाराज

**सोलापूर, दि. २३ एप्रिल-**

संत महोत्सव करणे हे परम भाग्याने प्राप्त होते. असा उत्सव जीवनामध्ये एकदाच येतो, असे प्रतिपादन वारकरी संप्रदायातील थोर विभूती वारकरी वैभव ह भ प ज्ञानेश्वर माऊली कदम महाराज ( छोटे माऊली ) यांनी केले. पुरुषोत्तम मास व सर्व संतांचा महोत्सव निमित्त श्री क्षेत्र पंढरपूर येथे दि. १७ ते २४ मे पर्यंत संत नामदेव महाराज गाथा पारायण व अखंड हरीनाम सप्ताह आयोजित केला आहे. या नियोजन बैठकीत ते बोलत होते. या बैठकीला ५०० पुरुष व १५० महिला भाविक उपस्थित होते. तसेच या बैठकीचे नियोजन सुधाकर इंगळे महाराज, तुकाराम भोसले महाराज यांनी केले व जोतिराम चांगभले, तानाजी बेलेराव महाराज, गुरुसिद्ध गायकवाड आदी पदाधिकारी यांनी केले होते. महाराष्ट्रातील नामवंत कीर्तन कारांची कीर्तन सेवा संपन्न होणार आहे. २५ हजार वाचक गाथा पारायणाला बसणार आहेत. पहिल्या दिवशी महाराष्ट्रातील एक लाख भाविक उपस्थित राहतील असे नियोजन केले आहे. त्यामुळे त्यांना दोन वेळचे जेवण करणेसाठी सोलापूर जिल्हातील प्रत्येक तालुकाने अन्नदान करणेसाठी चर्चा व संवाद घडावा म्हणून श्री संत मुक्ताई मंदिर, सोलापूर येथे शहर व उत्तर सोलापूर तालुका, दक्षिण सोलापूर, अक्कलकोट इ. भागाची बैठक बोलावण्यात आली होती. गावागावातील प्रत्येक घरातून भाकरी मागवली जाणार आहे. ' एशा लाभा जो चुकलों तुका म्हणे वाया गेला 'त्यामुळे प्रत्येक गावातील भाविकांनी पारायणाला बसावे.



### करमाळ्याच्या मुस्कान राजचा नगरसेविका स्वातीताई फंड यांच्या हस्ते सन्मान

**करमाळा, दि. २३ एप्रिल-**

करमाळ्याच्या गंवडी गल्ली येथील मुस्कान राज हिची मुंबई शहर पोलीस दलात निवड झाल्यानिमित्त भाजप नगरसेविका स्वातीताई फंड यांच्या हस्ते तिचा सन्मान करण्यात आला. सामाजिक कार्यकर्ते महादेव आण्णा फंड यांच्या वतीने हा सत्कार करण्यात आला. कुटुंबाची आर्थिक परिस्थिती अत्यंत हलाखीची असतानाही आई-वडिलांनी तिच्या शिक्षणाला प्राधान्य दिले. वडील गफुर हे गवंडी काम करून कुटुंबाचा उदरनिर्वाह करतात, तर आई रिझवाना या गृहिणी असून इतरांच्या घरी स्वयंपाकाची कामे करून कुटुंबाला हातभार लावतात. मुस्कानचे प्राथमिक शिक्षण नगरपालिका प्राथमिक मुलींच्या शाळेत झाले. त्यानंतर पाचवी ते दहावीपर्यंतचे शिक्षण कन्या शाळेत पूर्ण करत तिने अकरावी व एफ.वाय.चे शिक्षण पुणे येथील आबासाहेब गरवारे महाविद्यालयात घेतले. शिक्षणासोबतच तिने पोलीस भरतीची तयारी सातत्याने सुरू ठेवली.पोलीस भरतीसाठी तिने करमाळा येथील युनिव्हर्सल अकॅडमी तसेच जेऊर येथील योद्धा अकॅडमीमध्ये प्रशिक्षण घेतले. या प्रवासात योद्धा अकॅडमीचे नवनाथ नाईक नवरे आणि युनिव्हर्सल अकॅडमीचे तांबे यांचे तिला मार्गदर्शन लाभले.

# पंढरपूरच्या विकासासाठी उपनगराध्यक्षांसह नगरसेवकांचे मुख्यमंत्र्यांना साकडे

## नामसंकीर्तन सभागृह, नगरपरिषद प्रशासकीय इमारत, प्रलंबित रस्ते, सोलर प्रकल्प आणि कॉरिडॉरबाबत महत्त्वपूर्ण मागणी

**तभा वृत्तसेवा**
**पंढरपूर, दि. २३ एप्रिल -**

तीर्थक्षेत्र पंढरपूर शहराच्या सर्वांगीण विकासाला गतीदेण्यासाठी आणि नगरपालिकेपुढील आर्थिक आव्हाने पेलण्यासाठी पालकमंत्री जयकुमारजीगोरे व आमदार समाधान आवताडे यांच्या नेतृत्वाखाली उपनगराध्यक्ष व नगरसेवकांच्या शिष्टमंडळाने राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची भेट घेतली.यावेळी शहराच्या प्रलंबित प्रश्नांबाबत सविस्तर चर्चा करून विविध मागण्यांचे निवेदनही सादर करण्यात आल्याची माहिती पालिकेचे उपनगराध्यक्ष महादेव धोत्रे यांनी दिली.

मुख्यमंत्र्यांच्या भेटी संदर्भात माहिती देताना उपनगराध्यक्ष धोत्रे यांनी सांगितले की, शहरातील नामसंकीर्तन सभागृह आणि उद्यानांचे नूतनीकरण पंढरपूर शहराच्या सौंदर्यीकरणासाठीजुन्या उद्यानांचे नूतनीकरण करून ती विकसित करण्याची गरज आहे. तसेच, भाविक आणिस्थानिकांसाठी महत्त्वपूर्ण असलेल्या नामसंकीर्तन सभागृहाचे काम अंतिमटप्प्यात आहे. या कामासाठी उर्वरित २२ कोटींचा निधी तातडीने वितरित करावा, जेणेकरून येत्याआषाढी वारीत या वास्तूचे लोकार्पण करता येईल, असे नियोजन शिष्टमंडळाने मांडले. या बरोबरच प्रलंबित रस्ते आणि निधीचा प्रश्न पंढरपूर शहरातीलअनेक भागांत रस्त्यांची कामे रखडलेली असून, या सर्व उर्वरित रस्त्यांचा सविस्तर प्रकल्पअहवाल () तातडीने मंजूर करून या कामांना भरघोस निधी उपलब्ध करूनद्यावा, अशी आग्रही मागणी यावेळी करण्यात आली. थकीत वीज बिल माफीआणि सोलर प्रकल्प नगरपालिकेचे वीज बिल मोठ्या प्रमाणावर थकीत असून, यामुळे पालिकेचीआर्थिक कोंडी झाली आहे. हे थकीत वीज बिल माफ करावे आणि भविष्यातील बिलांचा बोजाकमी करण्यासाठी शहरात विशेष अनुदानातून सोलर सिस्टीम बसवावी, असे निवेदनातनमूद केले आहे. या शिष्टमंडळात उपनगराध्यक्ष महादेव धोत्रे, माजी नगराध्यक्ष लक्ष्मणराव शिरसट, युवानेते प्रणवपरिचारक, गटनेते भागवत बडवे, सुजितकुमार सर्वगोड, पाणीपुरवठा सभापती अमोल डोके, नगरसेवक अ‍ॅड.सुनील वाळूजकर, धर्मराज घोडके, भाजपाशहराध्यक्ष रोहित पानकर, तालुकाध्यक्ष सुभाष मस्के, गुरुदास अभ्यंकर,मालोजी शेंबडे,नवनाथ रानगट, आदींचा समावेश होता.



### प्रशासकीय अडथळ्यांबाबत तक्रार

उपनगराध्यक्ष महादेव धोत्रे यांनी यावेळी विकासकामातील राजकीय अडथळ्यांकडेही लक्ष वेधले.''माजी आमदार प्रशांतराव परिचारक व आमदार समाधान आवताडे यांच्या नेतृत्वाखालीशहरात मोठी कामे सुरू आहेत. मात्र, नगराध्यक्षांकडून जाणीवपूर्वकविकासकामांत अडथळे निर्माण केले जात आहेत. ''पंढरपूर शहरात पूर्ण झालेल्याविकासकामांची देयक बिले अदा करण्यासाठी नगराध्यक्ष यांच्याकडून टक्केवारीची मागणी केलीजात असून, आर्थिक तडजोडीसाठी ठेकेदारांची जाणीवपूर्वक अडवणूक केलीजात आहे, अशी तक्रार शिष्टमंडळाने मुख्यमंत्र्यांकडे केली.''

### सकारात्मक पावले उचलणार : मुख्यमंत्री

मुख्यमंत्री फडणवीस यांनी सर्व मागण्या गांभीर्याने ऐकून घेतल्या असून, पंढरपूरच्या विकासासाठी शासन सकारात्मक पावले उचलणार असल्याचे आश्वासन दिल्याची माहिती देखील उपनगराध्यक्ष धोत्रे यांनी दिली.

### नगरपालिकेच्या भव्य प्रशासकीय इमारतीसाठी निधीची मागणी

पंढरपूर नगरपालिकेची सध्याची इमारत अपुरी पडत असून, कामकाजाच्यासोयीसाठी नवीन आणि अद्ययावत प्रशासकीय इमारत उभारण्याची गरज आहे. या इमारतीसाठीमाजी आमदार प्रशांत परिचारक आणि आमदार समाधान आवताडे यांनी यापूर्वीच शासनाकडेपाठपुरावा करून निधीची मागणी केली आहे. याच मागणीचा पुनरुच्चार करत, शहराच्या वैभवातभर टाकणाऱ्या या प्रशासकीय इमारतीसाठी आवश्यक असलेला निधी तातडीने मंजूर करावा, अशी विनंतीशिष्टमंडळाने मुख्यमंत्र्यांना केली.

### कॉरिडॉरबाबत स्थानिकांच्या हिताला प्राधान्य

पंढरपूर मंदिर परिसरातील नियोजित कॉरिडॉर प्रकल्पाबाबत स्थानिकांमध्ये मोठी चिंता आहे. हा प्रकल्प राबवताना स्थानिकनागरिक आणि व्यापाऱ्यांना पूर्णपणे विश्वासात घ्यावे. कोणावरही अन्याय होऊ न देतालोकहिताचा विचार करूनच पावले उचलावीत, अशी भूमिका मुख्यमंत्र्यांकडेस्पष्ट करण्यात आली.

# बळीराजाच्या आर्थिक उन्नतीसाठी आगामी खरीप हंगामात २५ प्रकारच्या मोहिमा राबविणार

### जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी शुक्राचार्य भोसले

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २३ एप्रिल-**

आगामी खरीप हंगामामध्ये विविध २५ प्रकारच्या मोहिमा राबवायच्या आहेत. त्यातील महत्त्वाच्या मोहिमांची प्रात्यक्षिकेया कार्यशाळेमध्ये आयोजित केलेली आहेत. सदरील प्रशिक्षणाची प्रात्यक्षिके सर्व कृषी सहाय्यक, कृषी पर्यवेक्षक, मंडळ कृषी अधिकारी यांनी स्वतः करून पहावयाची आहेत. त्यातील कौशल्य, ज्ञान, माहिती आत्मसात करून येणाऱ्या खरीप हंगामात शेतकऱ्यांना त्यांचे उत्पादन वाढीसाठी मोहिमांचे आयोजन करावे व खरीप हंगाम २०२६ यशस्वी करून दाखवावा, असे आवाहन जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी शुक्राचार्य भोसले यांनी केले.

महाराष्ट्र शासनाच्या कृषी विभागातील उपविभागीय कृषी अधिकारी सोलापूर अधिनस्त मोहोळ, अक्कलकोट, दक्षिण सोलापूर, उत्तर सोलापूर तालुक्यातील क्षेत्रीय अधिकारी व कर्मचारी यांची खरीप हंगाम पूर्व २०२६ ची कार्यशाळा कृषी विज्ञान केंद्र खेड, बार्शी रोड सोलापूर येथे उत्साहात पार पडली. यावेळी भोसले हे बोलत होते. तर यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून सोलापूर केव्हीकेचे प्रमुख शास्त्रज्ञ डॉ.लालासाहेब तांबडे हे होते. यावेळी डॉ. तांबडे यांनी संतुलित खताचा वापर, खत बचत, माती परीक्षण इत्यादी बाबत मार्गदर्शन केले.

प्रास्ताविक उपविभागीय कृषी अधिकारी देवेंद्र ढगे यांनी केले. प्रास्ताविकेमध्ये त्यांनी कार्यशाळेचा उद्देश व उपविभागातील सर्व अधिकारी कर्मचारी यांनी शेतक-यासाठी hands on training ची प्रात्यक्षिके गाव पातळीवर आयोजित करणेबाबत क्षेत्रीय कर्मचारी यांना सूचना दिल्या. कृषिभूषण पुरस्कार प्राप्त शेतकरी जगन्नाथ मगर यांनी सेंद्रिय शेती पद्धती बाबतसविस्तर मार्गदर्शन केले.

या कार्यशाळेमध्ये विविध तांत्रिक विषयावर मार्गदर्शन करण्यात आले तसेच प्रत्यक्ष प्रशिक्षण कौशल्य आत्मसात करण्यासाठी उपविभागातील दक्षिण, अक्कलकोट, उत्तर, मोहोळ तालुक्यातील एकूण १४ मंडळ कृषी अधिकारी यांनी त्यांचे उपकृषी अधिकारी व सहाय्यक कृषी अधिकारी यांची टीम स्थापन करून विविध मोहिमा अंतर्गत प्रात्यक्षिकांचे प्रशिक्षण आयोजित केले होते. त्यामध्ये मंडळ कृषी अधिकारी उत्तर सोलापूर यांचेकडे उसाचे सुपर केन नर्सरी, नान्नज मंडळाकडे जलतारा प्रकल्प, दक्षिण सोलापूर तालुक्यातील मंडळ दक्षिण यांनी दशपर्णी अर्क तंत्रज्ञान, मंद्रूप मंडळ कृषी अधिकारी यांनी हुमणी किड नियंत्रण, वळसंग टीम यांनी सीआरएफ पद्धतीने फळबाग लागवड तंत्र, बोरामणी टीम यांनी सेंद्रिय खते प्रकार व वापर, मोहोळ तालुक्यातील मोहोळ मंडळ कृषी अधिकारी यांनी सेंद्रिय कीडनाशक अग्निअस्त्राचा वापर, नरखेड मंडळ यांनीबीबीएफ तंत्राद्वारे पेरणी तंत्रज्ञान, कुरुल मंडळ यांनी जीवामृत तयार करणे, पेनुर टीमने ब्रम्हास्त्र जैविक कीडनाशकचे प्रात्यक्षिक केले, अक्कलकोट तालुक्यांमधील मंडळ कृषी अधिकारी टीमने बीज प्रक्रिया मोहीम, अक्कलकोट मंडळ यांनी बियाणे उगवण चाचणी, तडवळ मंडळ माती नमुना काढणे, तर मैदर्गी मंडळ यांनी ऊस पाचट व्यवस्थापनाचे प्रात्यक्षिक सादर केले. सूत्रसंचालन केव्हीकेचे शास्त्रज्ञ प्रदीप गोंजारी यांनी केले. तालुका कृषी अधिकारी रामचंद्र माळी यांनी आभार मानले.



## नृसिंह जयंतीनिमित्त कर्देहळ्ळीत आजपासून अखंड हरिनाम सप्ताह

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २३ एप्रिल-**

दक्षिण सोलापूर तालुक्यातील कर्देहळ्ळी येथील ग्रामदैवत श्री नृसिंह महाराजांच्या जयंतीनिमित्त शिवप्रेमी तरुण मंडळाच्यावतीने २४ एप्रिल ते १ मेपर्यंत अखंड हरिनाम सप्ताहाचे आयोजन करण्यात आले असून, या अंतर्गत दररोज विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे.

पहाटे ४ ते ६ या वेळेत काकडा आरती, सकाळी ६ ते ९ ज्ञानेश्वरी पारायण, सकाळी १० ते १२ संत तुकाराम गाथा भजन, सायंकाळी ४ ते ६ हरिपाठ, रात्री ८.३० ते १०.३० या वेळेत कीर्तनसेवा आणि रात्री ११ वाजता हरिजागराचा कार्यक्रम होणार आहे. शुक्रवार, २४ एप्रिल रोजी ह.भ.प. गहिनीनाथ महाराज औसेकर यांच्या कीर्तनाने कीर्तन सेवेची सुरुवात होणार आहे. शनिवार, २५ एप्रिल रोजी ह.भ.प. रामहरी शेंडगे महाराज (वडाळा, उत्तर सोलापूर), रविवार, २६ एप्रिल रोजी ह.भ.प. प्रल्हाद महाराज सरडे (तुळजापूर, जि. धाराशिव), सोमवार, २७ एप्रिल रोजी ह.भ.प. अच्युत महाराज पुरी (गावडी दारफळ), मंगळवार, २८ एप्रिल रोजी ह.भ.प. रोहिदास महाराज घुगे (बीड), बुधवार, २९ एप्रिल रोजी ह.भ.प. माऊली महाराज दिंडेगावकर (तुळजापूर, धाराशिव) यांची कीर्तने होणार आहेत. गुरुवार, ३० एप्रिल रोजी सायंकाळी पाच वाजता ह.भ.प. सुधाकर महाराज इंगळे (सोलापूर) यांचे गुलालाचे कीर्तन होणार आहे. रात्री ९ वाजता भारुडाचा जुगलबंदी कार्यक्रम होणार आहे. शुक्रवार, १ मे रोजी सकाळी ८ वाजता दिंडी मिरवणूक काढण्यात येणार आहे. सायंकाळी पाच वाजता जगद्गुरू श्री संत तुकाराम महाराजांचे १५ वे वंशज कान्होबा महाराज देहूकर (पंढरपूर) यांचे काल्याचे कीर्तन होणार आहे. महाप्रसाद वाटपाने सप्ताहाची सांगता होणार आहे. या सर्व कार्यक्रमास भाविकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन आयोजकांनी केले आहे.



### बार्शीत 'द फोक आख्यान'चा जल्लोष

### ८५ पारंपरिक वाद्यांच्या निनादात रंगला सांस्कृतिक सोहळा

# अभंग, लोकगीत, शिवचरित्र, स्वराज्याच्या सादरीकरणांनी वातावरण भक्तीमय

**तभा वृत्तसेवा**
**बार्शी, दि. २३ एप्रिल-**

बार्शी येथे श्री भगवंत महोत्सव २०२६ अंतर्गत 'The Folk आख्यान' या कार्यक्रमाने सांस्कृतिक वैभवाचा भव्य आविष्कार साकारला. तब्बल ८५ पारंपरिक वाद्यांच्या निनादात आणि लोककलेच्या सादरीकरणातून उपस्थित प्रेक्षक अक्षरशः मंत्रमुग्ध झाले. डीजे आणि रिमिक्सच्या युगात पारंपरिक लोकसंगीताचा ठेका अनुभवण्यासाठी नागरिकांनी भगवंत मैदानावर मोठ्या संख्येने हजेरी लावली आणि कार्यक्रमाला उत्स्फूर्त प्रतिसाद दिला.

कार्यक्रमाच्या शुभारंभप्रसंगी जिल्हा परिषद अध्यक्ष दिपक वैद्य, नगराध्यक्षा तेजस्विनी कथले, अक्कलकोटचे नगराध्यक्ष मिलींद कल्याणशेट्टी, भाजपा नेते मल्हार पाटील, दिग्विजय बागल, पृथ्वीराज माने, रणवीर राऊत, उपनगराध्यक्ष रोहित पाटील, पोलीस निरीक्षक बालाजी कुकडे, आख्यान प्रमुख हर्ष कथले, नगरसेवक शाहूराजे निंबाळकर यांची प्रमुख उपस्थिती होती.

यावेळी 'गोपाळा रे गोपाळाः', 'राधे राधेः', 'हे माय पंढरी उभी राहीः', 'विठू रखुमाईः' अशा पारंपरिक अभंग आणि लोकगीतांच्या सादरीकरणावर तरुण-तरुणी, महिला आणि नागरिकांनी ठेका धरत जल्लोष केला. हलगी, ढोल, ताशा, झांज, खंजिरी, बासरी यासारख्या वाद्यांच्या गजराने संपूर्ण परिसर भारावून गेला. हलगीच्या नादाने हृदयाची धडधड वाढते, मग डीजेची गरजच काय? असा सूर उपस्थितांमधून उमटला. स्वराज्य, शिवचरित्र आणि मराठी अस्मितेवर आधारित सादरीकरणांनी विशेष दाद मिळवली. ङ्गउधळी गुलाल माझ्या शिवबा-शंभूच्या नावानेःङ्ग अशा घोषणांनी वातावरण देशभक्ती आणि अभिमानाने दुमदुमून गेले. यावेळी बोलताना रणवीर राऊत यांनी सांगितले की, २०१८ पासून सुरू झालेल्या भगवंत महोत्सवात युवकांना जाणीवपूर्वक संधी दिली जात आहे. यंदाचा संपूर्ण कार्यक्रम युवकांच्या नेतृत्वाखाली आणि त्यांच्या सहभागातून उभा केला आहे. महोत्सवासाठी सुमारे १ ते सव्वा कोटी रुपयांचे बजेट निश्चित करण्यात आले असून, दानशूर नागरिकांनी मोठ्या प्रमाणात वर्गणी दिल्याची माहिती त्यांनी दिली. मल्हार पाटील यांनी 'ढहश ऋेश्रज्ञ आख्यान'चे कौतुक करताना सांगितले की, 'हा कार्यक्रम खऱ्या अर्थाने संस्कृती जपणारा उपक्रम असून, यात तरुण आणि महिलांचा उत्स्फूर्त सहभाग पाहायला मिळाला.' कार्यक्रमाचे प्रास्ताविक श्रीधर कांबळे यांनी केले, तर भगवंत देवस्थानचे सरपंच दादा बुडख यांनी ङ्गजगाचा लोकोत्सव - भगवंत लोकोत्सवङ्ग या संकल्पनेविषयी माहिती दिली. सूत्रसंचालन मंगेश दहीहांडे यांनी केले.



